



# जनमाध्यम


e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठीत सवय
■ अमरावती, मंगळवार १४ ऑक्टोबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०







## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक

# महायुती एकत्रित लढणार!

**नागपूर/प्रतिनिधी:**आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व पदवीधर मतदारसंघ निवडणूकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत नागपुरात बैठक घेण्यात आली. यात पूर्व विदर्भातील सर्व जिल्ह्यांतील पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीदरम्यान स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत महायुती एकत्रित लढणार असल्याचे संकेत देण्यात आले. मात्र जेथे स्थानिक समीकरणांमुळे महायुती होणे शक्य होणार नाही, तेथे मैत्रीपूर्ण लढती होण्याची शक्यता पदाधिका-यांसमोर वर्तविण्यात आली.



अत्रे ले आउट परिसरात भाजपची बैठक झाली. यात मुख्यमंत्र्यांसोबतच महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण प्रामुख्याने उपस्थित होते. बैठकीच्या अगोदर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये भाजप आणि महायुतीची काय भूमिका राहील याचाही विचार केला जात आहे. येणा-या निवडणुकीमध्ये भाजपला ५१ टक्के मतं मिळाली पाहिजे अशी तयारी आहे. प्रत्येक ठिकाणी महायुतीची तयारी ठेवा, असे सांगितले गेले आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. सरकारने शेतक-यांना नुकसान भरपाई म्हणून दिलेल्या ३१ हजार कोटीच्या पॅकेजचा लाभ दिवाळीपूर्वी प्रत्येक नुकसानग्रस्त शेतक-याला मिळाला पाहिजे. यासाठी भाजपच्या पदाधिका-यांनी प्रशासनासोबत काम करून शेतक-यांपर्यंत लाभ पोहोचविण्यात पुढाकार घेतले पाहिजेत, अशी सूचनादेखील करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

**कांग्रेस-वडेट्टीवारांनी ओबीसींची दिशाभूलच केली-** काँग्रेस आणि वडेट्टीवार यांनी नेहमी दिशाभूल केली केली आहे. काँग्रेसने कधीच मराठा आणि ओबीसींना न्याय दिला नाही. उलट फक्त त्यांच्यात भांडणे लावली. जरांगेच्या आंदोलनात मराठ्यांना ओबीसी मधून आरक्षण द्या असे वडेट्टीवार म्हणाले होते. मात्र आता त्यांनी भूमिका बदलवली आहे. मुख्यमंत्र्यांनी ओबीसी आरक्षणला धक्का न लावता मराठ्यांना आरक्षण दिले. याबाबतचे जीआर फक्त चार जिल्ह्यांसाठी असताना तो संपूर्ण राज्यासाठी आहे असे खोटे चित्र दावा वडेट्टीवार निर्माण करत आहेत, असे बावनकुळे म्हणाले.




## 17 ऑक्टोबरपर्यंत हरकती व सूचनांसाठी मुदतवाढ

**नगरपरिषदा, नगरपंचायती प्रारूप मतदार यादी अंतिम यादी 31 ऑक्टोबरला जाहीर करणार**

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्यातील नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सदस्यपदाच्या व थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठीच्या प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादीवरील हरकती व सूचनांसाठी १७ ऑक्टोबर पर्यंत राज्य निवडणूक आयोगाने मुदतवाढ दिली आहे. नगरपरिषदा व नगरपंचायत निवडणुकांसाठी प्रभागनिहाय प्रारु प मतदार यादी ८ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यावर आता १३ ऑक्टोबरऐवजी १७ ऑक्टोबरपर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील. प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी २८ ऑक्टोबरऐवजी ३१ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.

# आरक्षणाचा अनेक नेत्यांना धक्का

**अकोला/वाशीम/प्रतिनिधी:** : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पडघम वाजू लागले असून अकोला आणि वाशीम जिल्हा परिषद गटांच्या आरक्षणाची सोडत सोमवारी काढण्यात आली. यामध्ये अनेक दिग्गज नेत्यांचे मतदारसंघ आरक्षित झाल्याने त्यांना धक्का बसला, तर काहींचे मतदारसंघ कायम राहिल्याने त्यांना दिलासा मिळाल्याचे चित्र आहे.



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेला गती आली आहे. अकोला व वाशीम जिल्हा परिषदेच्या प्रत्येकी ५२ गटांसाठी आज आरक्षण सोडत काढण्यात आली. अकोला जिल्हा परिषदेची आरक्षण सोडत जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या उपस्थितीत नियोजन भवनात काढण्यात आली. त्यानुसार प्रारू प आरक्षणाची अधिसूचना आज प्रसिद्ध झाली. अकोला जिल्हा परिषद गटांच्या आरक्षण सोडतीनुसार, अनसूचित जातीसाठी एकूण १२ जागा (महिलांसाठी सहा), अनुसूचित जमाती एकूण पाच जागा (महिलांसाठी तीन), नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग १४ जागा (सात महिला), सर्वसाधारण २१ जागा (महिला १०) अशा प्रकारे एकूण ५२ (महिला २६) आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. जिल्हा परिषद गट आरक्षणामध्ये माजी उपाध्यक्ष, माजी सभापती, माजी विरोधी पक्ष नेते आदींसह अनेक नेत्यांचे गट आरक्षित झाल्याने त्यांची चांगलीच कोंडी झाली. त्यांना आता पर्यायी गटाचा शोध घ्यावा लागेल. माजी अध्यक्षांसह काही नेत्यांच्या गटाचे आरक्षण कायम राहिल्याने मोठा दिलासा मिळाला. वाशीम जिल्हा परिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी आरक्षण सोडत आज जिल्हाधिकारी तथा पिठासिन अधिकारी जि.प.निवडणूक योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आली. वाशीम जिल्हा परिषद गटांमध्ये अनुसूचित जाती एकूण ११ जागा सर्वसाधारण पाच, महिला सहा, अनुसूचित जमाती एकूण चार जागा सर्वसाधारण व महिला प्रत्येकी दोन, नागरिकांचा मागास प्रवर्ग एकूण १४ जागा सर्वसाधारण व महिला प्रत्येकी सात, सर्वसाधारण एकूण २३ जागा सर्वसाधारण १२, महिला ११ अशा एकूण ५२ जागांसाठी आरक्षण सोडत काढण्यात आली. वाशीम जिल्ह्यात सुद्धा आरक्षणामुळे अनेक दिग्गज नेत्यांना धक्का बसल्याचे दिसून येत आहे. पर्यायी गटाचा शोध सुरू झाला, तर काहींसाठी ही आरक्षण सोडत दिलासादायक ठरली. जिल्हा परिषद गट प्रारू प आरक्षण अधिसूचना आज प्रसिद्ध झाली. त्यावर हरकती असल्यास १७ ऑक्टोबरपूर्वी तहसीलदारांकडे सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतरच्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, असे प्रशासनाने स्पष्ट केले.

## बोर्डाच्या परीक्षेच्या तारखा जाहीर

# बारावी 10 तर दहावीची 20 फेब्रुवारीपासून सुरूवात

**पुणे /प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून फेब्रु वारी-मार्च २६ मध्ये घेण्यात येणा-या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) आणि माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षांच्या तारखांचे प्रकटन जारी करण्यात आले आहे.इयत्ता १२ वीची लेखी परीक्षा १० फेब्रु वारीपासून सुरू होउन १८ मार्च २६ पर्यंत चालणार आहे, तर इयत्ता १० वीची लेखी परीक्षा २० फेब्रु वारी ते १८ मार्च २६ पर्यंत चालणार असल्याची माहिती मंडळाकडून सांगण्यात आली. राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नउ विभागीय मंडळांमार्फत या परीक्षा आयोजित केल्या जाणार आहेत. बारावीची परीक्षा १० फेब्रु वारी ते १८ मार्चदरम्यान होणार असून एनएसक्यूएफअंतर्गत व्यावसायिक विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षांसह प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन शुक्रवार २३ जानेवारी ते सोमवार ०९ फेब्रु वारी २६ पर्यंत आयोजित केले जाणार आहे. यात माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षांचा देखील समावेश आहे. दहावीसाठीची प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षा सोमवार २ फेब्रु वारी ते बुधवार १८ फेब्रु वारी २६ पर्यंत चालतील. यामध्ये शारीरिक शिक्षण, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षांचा समावेश असेल. दरम्यान, शाळा आणि कनिरु महाविद्यालयांनी व विद्यार्थ्यांनी त्यांच्या अभ्यासक्रमाचे नियोजन करण्यासाठी दोन्ही फेब्रु वारी-मार्च २६ परीक्षेच्या प्रात्यक्षिक व लेखी परीक्षांच्या तारखा विचारात घेउन कार्यवाही करावी, असे आवाहन करण्यात आले.



# एसटी कर्मचा-यांना 6 हजार रुपये बोनस

**मुंबई/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ तथा एसटीच्या सुमारे ८५ हजार कर्मचारी आणि अधिका-यांना दिवाळी भेट म्हणून ६ हजार रु पये सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवार दि. १३ ऑक्टोबर रोजी जाहीर केला. तसेच कर्मचा-यांच्या वेतन वाढीचा फरक देण्यासाठी महामंडळाला सरकारकडून ६५ कोटी रु पये देण्याचे आणि पात्र कर्मचा-यांना दिवाळी अग्रीम म्हणून १२ हजार ५०० रु पये देण्यात येणार असल्याचेही शिंदे यांनी घोषित केले. उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत आज सह्याद्री अतिथीगृह येथे एसटीच्या सर्व कर्मचारी संघटनांची आणि कृती समितीची बैठक पार पडली. यावेळी शिंदे म्हणाले, राज्यात अतिवृष्टीमुळे बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. तरीही एसटी कर्मचा-यांची दिवाळी गोड झाली पाहिजे म्हणून सरकारने आज हा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर एसटीला आर्थिकदृष्टया समृद्ध करणे गरजेचे आहे. एसटी महामंडळाचे उत्पन्न वाढण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यासाठी खासगी शासकीय सहभागी तत्वावर एसटीच्या जागांचा विकास करण्यात येणार आहे. एसटीचे सर्व कर्मचारी आणि अधिका-यांना दिवाळी भेट म्हणून ६ हजार रु पये देण्यासाठी सरकारने सुमारे ५१ कोटी रु पये अनुदान देण्याचे मान्य केले आहे. तसेच सन २०२०-२४ दरम्यानच्या वेतन वाढतील फरकाची रक्कम कर्मचा-यांना दरमहा वेतनासोबत देण्यात येणार असून यासाठी सरकारने ६५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. याशिवाय जे पात्र कर्मचारी सण अग्रीम घेण्यास इच्छुक आहेत त्यांना देखील पूर्वीप्रमाणे १२ हजार ५०० रुपये देण्यात येणार आहेत. त्यासाठी शासनाकडे ५४ कोटी रु पयांची मागणी एसटी महामंडळाने केल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी दिली. या बैठकीला उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीन सोना, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता, परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, एस. टी महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक माधव कुसेकर तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.




# पंतप्रधान मोदींकडून इस्त्रायली ओलिसांच्या सुटकेचे स्वागत

**डोनाल्ड ट्रम्प यांचे केले खास कौतुक**



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** - इस्त्रायल आणि हमास यांच्यातील युद्ध संपुष्टात आले आहे. हमासने इस्त्रायलच्या ओलीस ठेवलेल्या २० नागरिकांना सोडून दिले आहे. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व ओलिसांच्या सुटकेच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. भारत या भागात शांतता प्रस्थापित करण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या गाझा शांतता प्रस्तावाच्या पहिल्या टप्प्याचा भाग म्हणून हमासने दोन वर्षांपेक्षा जास्त काळापासून बंधनात ठेवलेल्या इस्त्रायली ओलीसांना सोमवारी मुक्त केले आहे. त्यानंतर अखेर हे जिवंत इस्त्रायलमध्ये परतले आहेत. या युद्धविरामानंतर अखेर दोन वर्ष चाललेले युद्ध थांबले आहे.

पंतप्रधान मोदींनी हजारो लोकांचे प्राण घेणा-या या युद्धाच्या समाप्तीनंतर सोशल मीडियावर पोस्ट केली आहे. दोन वर्षांहून अधिक काळ बंदिवासात असलेल्या सर्व ओलिसांच्य सुटकेचे आम्ही स्वागत करतो, असे पंतप्रधान मोदी सोशल मीडिया प्लॅटफार्म एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हणाले आहेत. त्यांची सुटका ही त्यांच्या कुटुंबीयांच्या धाडसाला, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या अविचल शांतता प्रयत्नांना आणि पंतप्रधान नेतान्याहू यांच्या मजबूत निर्धाराला केलेले अभिवादन आहे. या प्रदेशात शांतता प्रस्थापित करण्याच्या राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या प्रामाणिक प्रयत्नांना आमचा पाठिंबा आहे, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले आहेत. ➪(पान २ वर)

# मतचोरीची चौकशी करण्याची मागणी करणारी याचिका फेटाळ्ली

**■ सर्वोच्च न्यायालयाचा सुनावणीवर नकार ■ राहुल गांधींना दिलासा**

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भारतीय निवडणूक आयोग आणि भाजपावर मतचोरीचा आरोप करत खळबळ उडवून दिली होती. राहुल गांधींच्या आरोपांमुळे देशाचे राजकारण ढवळून निघाले आहे. या पार्श्वभूमीवर या प्रकरणी राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपांचा तपास करण्याची मागणी करणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली होती. दरम्यान, या याचिकेवर सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे.सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जायमाल्य बागची यांनी या याचिकेवर सुनावणी करण्यास नकार दिला आहे. तसेच याचिकाकर्त्याने याबाबत भारतीय निवडणूक आयोगाशी संपर्क साधण्याचा पर्याय अवलंबावा, असा सल्लाही सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये बंगळुरू सेंट्रल लोकसभा मतदारसंघातील मतदार यादीत मोठ्या प्रमाणत फेरफार झाल्याचा आरोप केला होता.त्यानंतर आता राहुल गांधी यांनी केलेल्या या आरोपांची चौकशी करण्याची मागणी करणारी याचिका एका विवाने दाखल केली होती. मात्र न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने बंगळुरू सेंट्रल लोकसभा मतदारसंघातील मतदार यादीमध्ये गडबड असल्याच्या आरोपांचा तपास करण्याची मागणी करणा-या याचिकेवर सुनावणी घेण्यास नकार दिला. तसेच काही उद्देशपूर्ण हेतूने सार्वजनिक हितामध्ये दखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी घेण्याचा विचार करण्यात येणार नाही.



**याचिकाकर्त्याल धक्का-**सदर याचिकाकर्त्याने राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपांची निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील समितीकडून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करणारी जनहित याचिका दाखल केली होती. मात्र न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे सदर याचिकाकर्त्याला धक्का बसला आहे.

## दुचाक्यांची धडक! दोन युवक ठार

**बुलढाणा:** दोन दुचाक्यांची समोरासमोर धडक घेवून दोन युवक जागीच ठार झाल्याची धक्कादायक घटना बुलढाणा जिल्ह्यात घडली. खामगाव तालुक्यातील लाखनवाडा आंबेटाकळी मार्गावर काल रविवारी रात्री उशिरा ही भीषण दुर्घटना घडली.या दुर्दैवी घटनेत दगावलेले दोन्ही युवक एकाच गावातील म्हणजे लाखनवाडा ( तालुका खामगाव, जिल्हा बुलढाणा) येथील रहिवासी होते. त्यांच्या अकाली मृत्युमुळे दोन महिलांचे कुंकू पुसल्या गेले असून दोघा चिमुकल्यांचे पितृछत्र हरविले. यामुळे लाखनवाडा परिसरात हळहळ व्यक्तहोत आहे. अपघातग्रस्त युवकांच्या परिवारावर दुखखाचा डोंगर कोसळला आहे. योगेश ज्ञानेश्वर जावळे ( वय ३०वर्षे) , गणेश श्रीराम पांढरे (वय ३९ वर्षे ) अशी मृतांची नावे असून दोघेही लाखनवाडा तालुका खामगाव येथील रहिवासी होत. यातील योगेश जावळे हा त्याच्या सासरवाडी वरून महान पिंजर (जिल्हा अकोला ) येथून रात्री ८.३० वाजताच्या दरम्यान आपले मूळ गाव लाखनवाडा कडे आपल्या दुचाकी ने येत होता.

# मी युद्ध थांबवण्यातला तज्ज्ञ आहे

**डोनाल्ड ट्रम्प यांचे वक्तव्य**

**वाशिंग्टन/वृत्तसंस्था**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात जो संघर्ष वाढतो आहे. त्यामध्ये मध्यस्थी करायची असेल तर मी तयार आहे कारण मी युद्धं थांबवण्यात आणि शांतता प्रस्थापित करण्यात एक्स्पर्ट आहे असं विधान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितलं मी इस्त्रायल आणि हमास यांच्यातला संघर्ष थांबवला आहे. हे आठवं युद्ध आहे जे मी थांबवलं आहे. आता पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांनाही सांगू इच्छितो की तुमच्यातला संघर्ष थांबवून मध्यस्थी करायची असेल तर मी तयार आहे. मी युद्ध थांबवण्यातला तज्ज्ञ आहे आणि शांतता प्रस्थापित करण्यातही तज्ज्ञ आहे. अशा गोष्टी करणं हे ही माझ्यासाठी सन्मानाची आहे.



**पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात संघर्ष**

डोनाल्ड ट्रम्प यांचं हे वक्तव्य तेव्हा आलं आहे जेव्हा पाकिस्तान आणि अफगाणिस्तान या दोन्ही देशांच्या सीमांवर मोठ्या प्रमाणावर गोळीबार आणि सैन्यांच्या चकमकी सुरु आहेत. दोन्ही देशांमध्ये तणाव सुरु आहे. तसंच या दोन्ही देशांचं मोठं नुकसान झालं आहे. तालिबानने हा दावा केला आहे की पाकिस्तानचे ५८ सैनिक आम्ही मारले आहेत. ➪(पान २

# राज्यासमोर मोठे संकट!

**जगभरात थैमान घालणा-या आजाराचा पहिला रुग्ण सापडल्याने खळबळ**

**मुंबई/प्रतिनिधी:** धुळे जिल्ह्यामध्ये महाराष्ट्रातील पहिला मंकीपाक्सचा रु ग्ण आढळून आल्याने आरोग्य यंत्रणा हाय अलर्ट मोडवर आली आहे. हा रु ग्ण सौदी अरेबियातून धुळ्यात आला. त्वचेसंबंधित त्रास जाणवू लागल्याने त्याला तातडीने धुळे शहरातील एका रु ग्णालयात दाखल करण्यात आले, तिथे या रु ग्णाच्या तीन रक्त चाचण्या करण्यात आल्या. या चाचण्यांच्या अहवालातून त्याला मंकीपॉक्सची लागण झाल्याचे ➪(पान २ वर)





## जपानमध्ये इन्फ्लूएंझा महामारी जाहीर

# 4 हजार रुग्ण दाखल

**टोकियो /वृत्तसंस्था-** जपानने देशभरात इन्फ्लूएंझा महामारी जाहीर केली आहे. खरं तर, देशात फ्लूच्या रु ग्णसंख्येत अचानक वाढ झाली आहे. त्यामुळे सुरु वातीपासूनच या प्रकरणांना सामोरे जाण्यासाठी उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत. देशात ४,००० हून अधिक लोक रु ग्णालयात दाखल आहेत आणि अनेक➪(पान २ वर)







# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विचार पुढे न्या - विजयकुमार चौरपगार

**काटपुर/प्रतिनिधी-**देशातील बहुजन समाजाला न्याय समता प्रस्थापित करून देणारे एकमेव नेते म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर होत. कालही आंबेडकरांशिवाय देशाला पर्याय नव्हता आणि आजही आंबेडकरांशिवाय दुसरा पर्याय असूच शकत नसल्याचे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेचे राज्य संघटक विजयकुमार चौरपगार यांनी केले. ते संबोधी बुद्ध विहार काटपुर (ममदापूर) येथे वर्षावासानिमित्त भारतीय बौद्ध महासभे द्वारा आयोजित महिला कार्यकारणी शाखा उद्घाटन तसेच वर्षावास सांगता समारोहा प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात भगवान बुद्ध तसेच बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमांना अभिवादन करून करण्यात आली.भ. बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचन करणारे युवा कार्यकर्ते करण इंगळे, तसेच दान दात्यांचा यथोचित सन्मानही याप्रसंगी करण्यात आला काटपुर येथे मंगलमय प्रसंगी भारतीय बौद्ध महासभा महिला शाखेचे उद्घाटनही राज्य संघटक विजयकुमार चौरपगार तसेच अमरावती जिल्हा महिला कार्यकारिणीच्या अध्यक्षा मायाताई धांडे, सरचिटणीस विद्या वानखेडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभा अमरावती जिल्हा पूर्वचे अध्यक्ष प्रा. प्रकाश बोरकर होते. तर विचार मंचावर भारतीय बौद्ध महासभेचे उपाध्यक्ष पुरुषोत्तम वंजारी, संघटक राजेंद्र भटकर, उपाध्यक्ष विलासराव आठवले, विजय वानखडे, केंद्रीय शिक्षिका मीनाताई आठवले, अमरावती जिल्हा संघटिका राजर्षी मनोहरे, क्षितिजा वासनकर (मोर्शी ) इत्यादी मान्यवर विराजमान होते .



**धम्मक्रांतीमुळेच विकास झाला -प्रा . प्रकाश बोरकर**

अशोका विजयादशमीच्या दिनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी समता, स्वातंत्र्य व बंधुता आणि न्यायाची शिकवण देणा-या तथागत भगवान बुद्धाच्या सद धम्माची दीक्षा दिल्यामुळेच येथील बहुजनांचा विकास झाल्याचे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. प्रकाश बोरकर यांनी केले. याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभेच्या महिला शाखेच्या अध्यक्षा मायाताई धांडे, विद्याताई वानखडे, विलासराव आठवले, पुरुषोत्तम वंजारी, विजय वानखडे, राजेंद्र भटकर यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन करून भारतीय बौद्ध महासभेचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारतीय बौद्ध महासभेचे जेष्ठ पदाधिकारी आणि पत्रकार प्रकाश इंगळे यांनी तर सूत्रसंचालन किरण इंगळे यांनी केले. आभार प्रदर्शन पल्लवी मानकर हिने केले . कार्यक्रमाला काटपुर येथील, तसेच नजीकच्या गाव खेड्यातील मोठ्या प्रमाणात जनसमुदाय उपस्थित होता. वर्षावास समारोच्या यशस्वी करता काटपुर येथील भारतीय बौद्ध महासभा महिला शाखा, भारतीय बौद्ध महासभा पुरुष शाखा, रमाई महिला मंडळ, पंचशील महिला मंडळ, भीमज्योत व्यायाम मंडळ व समस्त बौद्ध उपासक उपासिकांनी परिश्रम घेतले .

# पत्नी, सासू व सास-याला जिवंत जाळण्याचा प्रयत्न

## आराधना लेआऊट येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधी-** गाडगे नगर पोलीस ठाणे हद्दीत येणा-या आराधना लेआऊट समोरील परिसरात राहणा-या ४० वर्षीय इसमाने पत्नी सासू व वडिलांना पेट्रोल टाकून जिवंत जाळण्याचा प्रयत्न केल्याची घटना समोर आली आहे. यामुळे परिसरात खळबळ उडाली. पोलिसांनी आरोपी विरुद्ध कलम १०९ अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. माहितीनुसार नवसारी परिसरातील बामदेव मध्ये प्रिया पार्क परिसरामध्ये राहणा?या चाळीस वर्षीय आरोपीला पत्नी आणि दोन मुले आहेत. आरोपीचे पत्नीसोबत नेहमी भांडण होत होते. यामुळे पत्नी त्याला सोडून आपल्या वडिलांकडे राहायला गेली. रविवारी सायंकाळी पत्नीला आरोपी एका दुस-या महिलेसोबत दुचाकी वर फिरताना दिसला. यानंतर त्याची पत्नी आईला सोबत घेउन आरोपीच्या घरी गेली आणि तिने पतीला विचारले की तो कोणत्या दुस-या महिलेसोबत फिरत होता. यामुळे भडकलेल्या आरोपीने आपल्या दुचाकीच्या डिक्कीतून पेट्रोल ची बॉटल काढली आणि पत्नी आणि स्वतावर टाकले. सासू आणि सासरे मध्यस्थी करण्यासाठी आले तर आरोपीने त्यांच्यावर पण पेट्रोल टाकून जिवंत जाण्याची धमकी दिली. यामुळे पत्नीसह सासू-सासे घाबरले आणि तेथून पळाले. घाबरलेल्या महिलेने प्रकरणाची तक्रार गाडगे नगर पोलीस ठाण्यात दिली. पोलिसांनी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील हल्ल्याचा जिल्हा काँग्रेस कमिटी ग्रामीणने केला तीव्र निषेध



**अमरावती/प्रतिनिधी** -सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील हल्ल्याच्या निषेधार्थ अमरावती येथील जिल्हा काँग्रेस कमिटी ग्रामीण कार्यालयात नुकतीच जाहीर निषेध सभा पार पडली. गेल्या काही वर्षांपासून ज्या पद्धतीने विविध कट्टरवादी संघटना आणि व्यक्तींमार्फत लोकशाही आणि संविधानाची गळचेपी केली जात आहे, त्यावर या बैठकीत चिंता व्यक्त करण्यात आली.

यावेळी काँग्रेस कमिटीच्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी हा हल्ला केवळ एका व्यक्तीवर नसून तो देशाच्या न्यायव्यवस्थेवर आणि लोकशाही मूल्यांवरचा हल्ला आहे, अशी भूमिका घेतली. लोकशाहीला पायदळी तुडवणा-या आणि संविधानाच्या तत्त्वांना आव्हान देणा-या शक्तींविरुद्ध संघटितपणे आवाज उठवण्याची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्तकरण्यात आले. देशाच्या न्यायपालिकेचे स्वातंत्र्य आणि संवैधानिक संस्थांची स्वायत्तता धोक्यात आणण्याचे हे प्रयत्न अत्यंत निंदनीय आहेत, असे प्रतिपादन उपस्थितांनी केले.

या बैठकीत, संवैधानिक मूल्यांचे रक्षण करण्यासाठी आणि शांतता व सुव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी काँग्रेस पक्ष कटिबद्ध राहील, असा ठराव संमत करण्यात आला. अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटी ग्रामीणने या भ्याड हल्ल्याच्या सखोल चौकशीची मागणी केली असून, हल्लेखोरांना कठोर शासन करण्याची मागणी केली आहे. तसेच, भविष्यात अशा घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी सरकारने तातडीने उपाययोजना करावीत, असे आवाहनही करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अनिरुद्ध उर्फ बबलु देशमुख,खासदार बळवंतराव वानखडे, वीरेंद्र जगताप, राजकुमार पटेल,हरिभाउ मोहोड, सुधाकरराव भारसाकळे, प्रकाश काळबांडे, संजय वानखडे,दयाराम काळे,बाळासाहेब हिंगणीकर, उपस्थित होते. तर यावेळी मुकदर पठाण, प्रवीण मनोहर, प्रदीप देशमुख, पंकज मोरे, सुनील गावंडे, प्रदीप देशमुख, सहदेव बेलकर, नामदेव तनपुरे, राजेश काळे, किशोर देशमुख, देवेंद्र पेटकर,श्रीकांत झोडपे, महिंद्र गेलवार, प्रमोद दाळू, हरेराम मालवीय, रोहित पटेल,राहुल येवले, हरीश मोरे, भूषण कोकाटे, प्रदीप देशमुख, इब्राहिम खा रहीम खान, अरुण गनथळे, विनोद देशमुख, बाबूभाई इनामदार, निशांत जाधव अमोल धवसे, वैभव वानखडे, वीरेंद्र जाधव, सेतू देशमुख, मुकुंद देशमुख,श्रीकांत बोंडे,श्याम बेलसरे, आतिश शिरभाते, पवन बेलसरे, राहुल बोडके, श्रीनिवास सूर्यवंशी, अमोल होले, इतेशाम नबील, भागवतराव खांडे यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी एकमुखाने न्या. भूषण गवई यांच्यावरील हल्ल्याचा निषेध केला आणि लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी लढत राहण्याचा संकल्प केला. संविधानाचे पावित्र्य जतन करणे आणि सर्वसामान्यांचे हक्क अबाधित राखणे, ही आजची सर्वात मोठी गरज आहे, यावर सर्वांचे एकमत झाले.या घटनेमुळे देशाची मान शरमेने खाली गेल्याची प्रतिक्रिया आज जिल्हा काँग्रेस कमिटीच्या निषेध सभा व बैठकीदरम्यान व्यक्तकरण्यात आली, व या दुष्कृत्याचा निषेध करत आगामी काळात अशा प्रवृत्तीच्या विरोधात काँग्रेस पक्ष सक्षमपणे उभा राहील असे जिल्हा अध्यक्ष बबलू देशमुख यांनी ठामपने सांगितले.

# स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते नजरकैद

## सीएम फडणवीसांचा ताफा रोखण्याचा होता प्रयत्न

**अमरावती/प्रतिनिधी-** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज एक दिवसीय अमरावती दौ-यावर आले होते. शेतकरी संघटनेचे पदाधिकारी मुख्यमंत्र्यांचा ताफा थांबवण्याचा प्रयत्न करणार असल्याची माहिती पोलिसांना मिळताच पोलिसांनी पदाधिका-यांना नजर कैद केले. माहितीनुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राम मेघे कॉलेज परिसरात विभागीय बैठकीसाठी येणार असल्याची माहिती स्वाभिमानी संघटनेच्या पदाधिका-यांना मिळाली.या मुळे ते राम मेघे कॉलेज जवळ पोहोचले. मुख्यमंत्री यांचा ताफा रोखण्यापूर्वीच पोलिसांनी स्वाभिमानी संघटनेचे अमित अढाउ ,प्रवीण मोहोड, स्वप्निल कोठे, अनिल पवार ,प्रफुल उंबरकर यांना डिटेन केले. मुख्यमंत्र्यांनी बँकेला शेतक-यांना कर्जासाठी तगादा न लावण्याचे निर्देश दिले आहे तरीपण बँकेकडून शेतक-यांना नोटीस दिल्या जात आहे. यामुळे शेतक-यांवर दिवाळी समोर संकट कोसळले आहे. यासंदर्भात शेतकरी संघटनेचे पदाधिकारी मुख्यमंत्र्यांना भेटणार होते. पण त्यापूर्वी त्यांना डिटेन केले.



# मांजरखेड येथे बांबू परिषद उत्साहात

अमरावती/प्रतिनिधी-शेतक-यांची आर्थिक उन्नती व पर्यावरण संतुलनासाठी मांजरखेड, ता. धामणगाव येथे बांबू परिषद उत्साहात पार पडली. या परिषदेला राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी मार्गदर्शन केले. या परिषदेला आमदार प्रताप अडसड, सरपंच पल्लवी देशमुख, नंदूभाउ खेरडे, शैलेश खेरडे, बांबू लागवड तज्ज्ञ संजय चरपे, तालुका कृषी अधिकारी संचित भाकरे, रावसाहेब रोठे, प्रदिप जळीत आदी उपस्थित होते.पाशा पटेल म्हणाले, बांबू लागवडीकडे पंजाब आणि अमेरीकेसारख्या देशाने दुर्लक्ष केले आहे. बांबूमध्ये कार्बनचे प्रमाण कमी करण्याची क्षमता आहे. बांबूचा विविध उपयोग होत आहे. बांबूपासून कपडे, शाल तसेच लोणचेही बनविता येते. मात्र आपल्याकडे याची माहिती आणि महत्व शेतक-यांपर्यंत पोहोचले नाही. आपल्या क्षेत्रात बांबू नसल्याने त्यावर आधारीत उद्योगही कमी आले आहेत. बांबूची लागवड झाल्यास उद्योग येण्यास मदत होणार आहे. रोजगार हमी योजनेतून बांबूची लागवड केल्यास शेतक-यांना चार वर्षात सात लाख रूपयांचे अनुदान मिळणार आहे. त्यामुळे शेतक-यांनी नाल्याकाठी बांबू लागवड करावी. यामुळे जमिनीला पकड राहत असल्याने बांबूचा उपयोग पूर प्रतिबंधक म्हणून होतो. त्यासोबतच वादळाचा सामना करण्यासाठीही बांबू उपयोगी पडत असल्याचे सांगितले.




**सह दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर**
**वारसाचे प्रमाणपत्राबाबत जाहीरनामा**

**आर.एम.जे.सी.क्र.२७३/२०२५** **ने.ता.१८.११.२०२५**

अर्जदार ः
१. **शाकीर मोहमद अब्दुल रज्जाक (मुलगा)**, वय ७२ वर्ष, व्यवसाय- शेतकरी रा.नांदसावंगी, ता.नांदगाव खंडे. जि. अमरावती
२. **मोहम्मद जाकीर अब्दुल रज्जाक (मुलगा)**, वय ५१ वर्ष, व्यवसाय- शेतकरी रा.नांदसावंगी, ता.नांदगाव खंडे. जि. अमरावती
३. **रेहना अयुब खान (मुलगी)**, वय ५४ वर्ष, व्यवसाय- गृहिणी रा.नांदसावंगी, ता.नांदगाव खंडे. जि. अमरावती
४. **मोहम्मद साबीर अब्दुल रज्जाक (मुलगा)** वय ४८ वर्ष, व्यवसाय- शेतकरी रा.नांदसावंगी, ता.नांदगाव खंडे. जि. अमरावती
५. **अब्दुल सादीक अब्दुल रज्जाक (मुलगा)** वय ४८ वर्ष, व्यवसाय- शेतकरी रा.नांदसावंगी, ता.नांदगाव खंडे. जि. अमरावती
६. **अब्दुल हाफिज अब्दुल रज्जाक (मुलगा)** वय ४८ वर्ष, व्यवसाय- शेतकरी रा.नांदसावंगी, ता.नांदगाव खंडे. जि. अमरावती
७. **नाजमा बी अब्दुल रज्जाक (पत्नी)**, वय ४८ वर्ष, व्यवसाय- गृहिणी रा.नांदसावंगी, ता.नांदगाव खंडे. जि. अमरावती
८. **अब्दुल साजिद अब्दुल रज्जाक (मुलगा)** वय ५६ वर्ष, व्यवसाय- शेती रा.नांदसावंगी, ता.नांदगाव खंडे. जि. अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः-** **निरंक**

ज्याअर्थी **मयत अब्दुल रज्जाक मुस्तफा शेख,** रा.नांदसावंगी, ता.नांदगाव खंडे. जि. अमरावती **हे दि.०४.०५.२०१७ रोजी** नांदसावंगी येथे मरण पावले आहेत. त्यांचा कायमचा पत्ता रा.नांदसावंगी, ता.नांदगाव खंडे. जि. अमरावती येथील आहे.त्यांना अर्जदार यांच्या व्यक्तीरिक्त कोणीही वारस नाही.अर्जदार हे उपरोक्त मयतांचे कायदेशीर वारस आहे. उपरोक्त मयतांचे कायदेशिर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परित अंतर्गत दिनांक **२५.०९.२०२५** रोजी अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक **१८.११.२०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर,नांदगाव खंडे. येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १०/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर


# पान 1 व 10 वरून

## पंतप्रधान मोदींकडून इस्त्रायली

सोमवारी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्त्रायल आणि हमासमधील युद्ध संपल्याची अधिकृत घोषणा केली. पत्रकारांशी बोलताना ट्रम्प यांनी युद्धबंदी कायम राहील असा विश्वास व्यक्त केला शुक्रवारी सकाळी युद्धबंदी कराराचा भाग म्हणून हमासने २० जिवंत असलेल्या इस्त्रायली बंधकांना सोडले . या करारानुसार, इस्त्रायलने १,९०० हून अधिक पॅलेस्टिनी कैद्यांना सोडले आणि दुष्काळग्रस्त गाझाला अन्न आणि मदत पुरवठा वाढविण्याचेही मान्य केले.

शुक्रवारी सकाळी लागू झालेली ही युद्धबंदी ट्रम्प यांच्या २० कलमी गाझा शांतता योजनेच्या पहिल्या टप्प्यानुसार करण्यात आले आहे . युद्धबंदी करारांतर्गत , हमास आणि इस्त्रायलने सर्व ओलिसांना सोडले आहे . ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने इस्त्रायलवर केलेल्या हल्ल्यांनी युद्ध सुरू झाले . तेव्हापासून इस्त्रायलने प्रत्युत्तरादाखल केलेल्या लष्करी कारवाईत ६७,००० हून अधिक पॅलेस्टिनी मारले गेले आहेत . युद्धबंदीमध्ये भूमिका बजावल्याबद्दल ट्रम्प यांनी इस्त्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू आणि कतार यांच्या भूमिकेचे कौतुक केले.

## मी युद्ध थांबवण्यातला तज्ज्ञ

तर पाकिस्तानने दावा केला आहे की त्यांनी अफगाणिस्तानच्या चौक्यांवर कब्जा केला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी आजवर अनेकदा ही विधानं केली आहेत. आज त्यांनी पुन्हा एकदा अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यातला संघर्ष मी थांबवायला तयार आहे असं म्हटलं आहे.मी आठव्यांदा युद्ध थांबवलं आहे. तसंच आत्तापर्यंत विविध देशांच्या संघर्षात मी मध्यस्थी केली आहे. युद्धविराम घडवून मी शांतता प्रस्थापित केली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी असंही म्हटलं होतं की भारत आणि पाकिस्तान यांच्यातला युद्धविरामही मीच घडवून आणला आहे. त्यांनी अनेकदा हा दावा केला. अर्थात भारताने ही बाब मान्य केलेली नाही. भारत आणि पाकिस्तान संघर्षात कुणीही मध्यस्थी केली नाही असं भारताने म्हटलं आहे.

**नेत्यानाहू यांच्याकडून डोनाल्ड ट्रम्प यांची स्तुती-**नेतान्याहू यांनी संसदेत बोलताना डोनाल्ड ट्रम्प यांची भरभरून स्तुती केली. नेतान्याहू यांनी ट्रम्प हे व्हाईट हाउसमध्ये इस्त्रायलला लाभलेले आजपर्यंतचे सर्वात महान मित्र असल्याचे म्हटले आहे. ते म्हणाले, कोणत्याही अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाने इस्त्रायलसाठी यापेक्षा अधिक काही केलेले नाही. पुढे बोलताना नेतान्याहू यांनी इस्त्रायलच्या सैनिकांचेही कौतुक केले, सैनिकांनी युद्धात हमासवर आश्चर्यचकित करणारे विजय मिळवले, असे ते म्हणाले.

## राज्यासमोर मोठे

निष्पन्न झाले.मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित रुग्ण २ ऑक्टोबर २०२५ रोजी सौदी अरेबियातून धुळ्यात आला. मात्र, त्यानतंर त्वचेसंबंधित त्रास जाणवू लागल्याने त्याला धुळ्यातील भाउसाहेब हिरे रुग्णालयात दाखल करण्यात आले. पुण्यातील एनआयए प्रयोगशाळेने या चाचण्यांचा अहवाल दिल्यानंतर त्याला मंकीपॉक्सची लागण झाल्याचे निष्पन्न झाले. या रुग्णाच्या संपर्कात आलेल्या दोघांचाही अहवाल निगेटिव्ह आल्याने आरोग्य यंत्रणेला मोठा दिलासा मिळाला. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, मंकीपॉक्स संक्रमित रुग्णाची प्रकृती स्थिर आहे. हा आजार सुरुवातीला आफ्रिकेतून पसरला, पण तातडीने वैद्यकीय उपचार सुरू केल्यास हा आजार पूर्णपणे बरा होतो. कोणत्याही आजाराबाबत भीती न बाळगता त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. ताप, डोकेदुखी, स्नायू दुखणे, थंडी वाजून येणे यांसारखी लक्षणे दिसताच त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

## 4 हजार रुग्ण दाखल

ठिकाणी शाळा बंद करण्यात आल्या आहेत.देशाच्या आरोग्य मंत्रालयाने नागरिकांना खबरदारी म्हणून लवकरात लवकर लसीकरण करण्याचे आवाहन केले आहे. ड?क्टरांनी चेतावणी दिली आहे की, रुग्णसंख्येतील ही सुरुवातीची वाढ रुग्णालय व्यवस्थेवर दबाव आणू शकते. जरी याला हंगामी फ्लूचा प्रकोप म्हटले जात असले तरी, त्याचे प्रमाण आणि वेळ यामुळे भारतासह इतर देशांसाठी धोक्याची घंटा वाजली आहे. जपानच्या ४७ प्रांतांपैकी २८ मध्ये रुग्णसंख्या वाढली आहे. विशेषतः टोक्यो, ओकिनावा आणि कागोशिमा येथे अधिक रुग्ण आढळले आहेत. तेथे १३० हून अधिक शाळा आणि बालसंगोपन केंद्रे तात्पुरती बंद करण्यात आली आहेत. ही एक हंगामी इन्फ्लूएंझा महामारी आहे, जी प्रामुख्याने एच३एन२ नावाच्या स्ट्रेनमुळे होते, ज्यावर अभ्यास झाला आहे.

## स्थानिक पातळीवर होणार युतीचा

लखन मलिक, विधान परिषद सदस्य बाबू सिंह राठोड, माजी आमदार मदन येरावार, अकोला जिलाध्यक्ष संतोष शिवलकर, अकोटचे हरीश टावरी, गोपाल मोहोड, तेल्हारा से गणेश रोठे, मंगेश दुतोंडे सह पाचही जिल्ह्यातील भाजप पदाधिकारी उपस्थित होते.

## अंजनगाव पंचायत समिती

मध्ये समावेश झाला असुन या गणावर आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. यामुळे अंजनगाव सुर्जी पंचायत समितीच्या एकूण ०६ गणांपैकी ०३ जागा महिला उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. यंदाच्या निवडणुकीत महिलांचे प्रतिनिधित्व दिसून येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणुन उपविभागीय अधिकारी राजेश्वर हांडे तर निवडणुक अधिकारी तहसीलदार पुष्पा सोळंके (दाबेराव) ना.तहसीलदार प्रकाष बमनोटे यांनी कामकाज पाहले जाहिर करण्यात आलेल्या गणनिहाय आरक्षणामुळे स्थानिक राजकीय समीकरणांमध्ये मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आता प्रत्येक पक्ष आणि संभाव्य उमेदवार या नव्या आरक्षणानुसार आपली रणनिती आखनार आहे. या सोडती वेळी विविध पक्षाचे प्रतिनिधी तहसील कार्यालयात उपस्थित होते.

## दर्यापूर तालुक्यातील जि. प. व

महिला , रामतीर्थ अनुसूचित जाती राखीव करण्यात आले आहे. गेल्या चार वर्षापासून दर्यापूर पंचायत समिती निवडणूक झाली नसल्याने सर्वच इच्छुक निवडणूक रिंगणात उतरण्यासाठी सज्ज झाले आहेत मात्र आरक्षण सोडतीमुळे काही लोकांचे स्वप्न हवेत विरले आहे.तर काही लोकांना नवी संधी प्राप्त झाली आहे. मागील काळात काँग्रेसचे तीन भाजपाचा एक शिवसेनेचे दोन तर अपक्ष दोन असे पक्षीय बलाबल होते. असे असतानाही सभापती आणि उपसभापती दोन्ही पदावर अपक्षांना संधी देत भाजपा आणि शिवसेनेने त्यांना पाठिंबा दिला होता. त्यामुळे काँग्रेस सत्तेतून बाहेर होती. यावेळी निवडणुकीचे चित्र काय राहणार याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. मात्र जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीवर लक्ष ठेऊन असलेले तालुक्यातील राजकीय दिग्गजाना यावेळेस घरीच बसावे लागणार असून जिल्हा परिषद व पंचायत समितीवर महिलाराज येणार असल्याने या कोण कोण बाजी मारणार याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे. चिमुकलीच्या हस्ते पंचायत समितीचे आरक्षण तहसिलदार रविंद्र कानडजे उपविभागीय अधिकारी राजेश्वर हांडे तर नायब तहसिलदार प्रविण जामदाडे यांनी जाहीर केले.

## दिवाळी खरेदीसाठी बाजारपेठ

लटकवून ठेवलेल्या कंदिलांमुळे रस्तेही सजलेले दिसू लागले आहेत. रस्त्यावर जशी खरेदीसाठी गर्दी आहे तितकीच गर्दी दुकानांमध्ये आहे.खरेदीचा उत्साह ओसंडून वाहत असल्यामुळे ठिकठिकाणी वाहतूक कोंडीतही भर पडली आहे. शहरातील राजकमल चौक, ज्यस्तंभ चौक, गांधी चौक आणि सक्करसाथ परिसरात वाहतुकीची कोंडी पाहायला मिळत आहे जागोजागी जाम लागत आहे.

## दीड वर्षानंतर चांदूर रेल्वे स्टेशनवरील

पाठपुराव्याचा परिणाम म्हणून आता रेल्वे प्रशासनाने मागील दीड-दोन वर्षांपासून बंद असलेले सफाईचे कंत्राट पुन्हा सुरू केले आहे. मागील दोन-तीन दिवसांपासून स्टेशन परिसरात सफाई कामगार नियमितपणे काम करत असल्याने प्लॅटफॉर्मवर व परिसरात स्वच्छता दिसू लागली आहे. तसेच, प्लॅटफॉर्मवर काही ठिकाणी फोकस लाईट लावण्यात आल्याने आधीपेक्षा अधिक उजेड मिळू लागला आहे. मात्र, शेडच्या आतल्या भागात व काही अंधाऱ्या कोपऱ्यांमध्ये अद्याप पुरेशी प्रकाशयोजना झालेली नाही. त्यामुळे आणखी काही लाईट बसविण्याची आवश्यकता असल्याचे रेल रोको कृती समितीचे अध्यक्ष नितीन गवळी यांनी म्हटले.

एकूणच, रेल्वे रोको कृती समितीच्या सततच्या प्रयत्नांमुळे व जनतेच्या सहकार्यामुळे स्थानकाच्या स्थितीत काही प्रमाणात सुधारणा होताना दिसत आहे. स्वच्छता व प्रकाशयोजनेची सुरूवात ही सकारात्मक पावले असली तरी, उर्वरित अपूर्ण कामे लवकर पूर्ण करून स्थानकाला आदर्श दर्जा मिळावा, अशी अपेक्षा नागरिक व प्रवासी व्यक्त करत आहेत.

## रतनगंजात अवैध तलवारींचा

झाले. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त शाम घुगे व रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे, सतीश देशमुख, फिरोज खान, सूरज चव्हाण, शेख नाझीम आणि रणजित यांचा समावेश होता.

## अचलपूर तालुक्यात पंचायत

- परसापूर सर्वसाधारण ,३२ - पथ्रोट सर्वसाधारण ,३३ - शिंदी बु.सर्वसाधारण,३४ - रासेगाव ना.मा.प्र महिला ,३६ - असदपूर ना.मा.प्र साठी आरक्षित करण्यात आले.जिल्हा परिषद, अमरावतीचे आरक्षण प्रक्रिया ही पार पडली. या वेळी जिल्हा परिषद सर्कल आरक्षणानुसार शिंदी बु. ओबीसी महिला (ना.मा.प्र. महिला), धामणगाव गढी या सर्कला अनुसूचित जमाती महिला (एस.टी. महिला), असदपूर या गणाला सर्वसाधारण, पथ्रोट सर्वसाधारण , कांडली सर्वसाधारण महिला तर धोतरखेडा ओबीसी महिला राखीव झाल्याने अनेक इच्छुकांचा हिरमुळ झाला आहे.

## प्रविण पोटे यांच्या द्वारा मराठवाडा

वस्तूंनी भरलेले मदतीचे ट्रक सोलापूर व धाराशिव जिल्ह्यांतील पूरग्रस्त भागांसाठी रवाना करण्यात आले.

या पूरग्रस्तांसाठी भरलेल्या मदतीच्या ट्रकला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महसूल मंत्री व पालक मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण व भाजपाला पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत हिरवी झेंडी दाखवण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी राज्यमंत्री प्रविण पोटे पाटील व श्रेयश पोट पाटील यांच्या सामाजिक बांधिलकीचे पुन्हा एकदा कौतुक केले आणि अशा कार्यातूनच समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते, असे प्रतिपादन केले.

या मदतीच्या ट्रकमध्ये तांदूळ, डाळी, गहू पीठ, तेल, साखर, तिखट, मीठ, बिस्किटे, मुरमुरे, पिण्याचे पाणी, ब्लँकेट्स, प्राथमिक औषधे तसेच दिवाळीनिमित्त लागणाऱ्या विशेष वस्तू – पणत्या, फराळ साहित्य इत्यादींचा समावेश आहे. या वस्तू पूरग्रस्त गावांमध्ये स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने वितरित केल्या जाणार आहेत. ही सर्व सामग्री सोलापूर , धाराशिव जिल्ह्यातील पूरग्रस्त गावांमध्ये वितरित केली जाणार असून, गरजूंना तात्काळ मदत मिळावी यासाठी विशेष व्यवस्था सुद्धा करण्यात आली आहे. प्रविण पोटे पाटील यांनी सांगितले की, 'आपत्तीच्या काळात एकमेकांच्या मदतीला धावून जाणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. महाराष्ट्र हे आपले घर असून संकटाच्या काळात आम्ही आमच्या बांधवांसोबत खंबीरपणे उभे राहायला हवे.' या उपक्रमामुळे सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील पूरग्रस्त कुटुंबांना सणासुदीच्या काळात दिलासा मिळणार असून, प्रशासनानेही या मदतीचे स्वागत केले आहे. यावेळी आ. राजेश वानखडे, आ. प्रवीण तायडे, शिवराय कुळकर्णी, जयंत डेहनकर, किरणताई महल्ले, किरण पातुरकर, रवींद्र खांडेकर,चेतन पवार, तुषार भारतीय, नितीन गुडधे, राजेश साहू, सतीश करेसिया उपस्थित होते.


**जाहीर नोटीस**

**वि.२ रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१५२९/२०२५ ने.ता.१०.१०.२०२५

**अर्जदार -**
१. **नलिनी पुंडलिकराव समदुरकर,** वय ७७ वर्षे,व्यवसाय-घरकाम
२. **संजय पुंडलिकराव समदुरकर,** वय ५७ वर्षे,व्यवसाय-खाजगी नोकरी दोघे रा. हाउस नं.६ कॉंग्रेस नगर, अमरावती

**गैरअर्जदार -** **निरंक**

ज्याअर्थी अर्जदार यांनी भारतीय वारसा कायदा १९२५ च्या कलम ३७२ अन्वये या न्यायालयात उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, **मयत पुंडलिकराव लक्ष्मणराव समदुरकर यांचे निधन दि.११/०८/२००९ रोजी झाले** असून वरील अर्जदार त्याचे कायदेशिर उत्तराधिकारी आहेत व इतर कोणीही मय्यतास उत्तराधिकारी नाही, सबब उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी जाहीर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकिला मार्फत **वि.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), अमरावती** या न्यायालयामध्ये हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोद घ्यावी.

आज दि.१६/०९/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहाय्यक अधीक्षक (प्रशासन )**
**दिवाणी न्यायालय,(व.स्तर) अमरावती**



**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**

वि.श्रीमती एन.सी.सोरटे ६वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

**जाहीरनामा/सायटेशन**

किरकोळ अर्ज - २२९२/२०२५
श्रीमती रेश्मा अधिक दोन विरुध्द निरंक
पुढील तारीख २४.११.२०२५

अर्जदार :
1) **Smt. Reshma Atul Raut,** Age 33 yrs., Occu.- Household
2) **Aarav Atul Raut,** Age 9 yrs., Occu.- Nil, Plot No. 1 & 2, C/o. Atul Raut, Flat No.1-24, Akoli Road, New Mhada Colony, Sai Nagar, Amravati Tq. & Dist. Amravati
3) **Kokila Murlidhar Raut,** Age 65 yrs., Occu.- Household R/o. Jawara Molvan, Tq. Nandgaon Khandeswar, Dist. Amravati

-- विरुध्द -

**गैरअर्जदार ः -** **निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अतुल मुरलीधर राउत हे दि.०२/१०/२०२४ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार रेश्मा अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती रेश्मा अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०८.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, १४ ऑक्टोंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## सोनखास येथे ग्रंथ वाचन समारोप



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

शहरा लगत असलेल्या जुने सोनखास येथे सार्वजनिक बौद्ध विहार येथे ग्रंथ वाचक अशोक तिडके यांनी मागील एक महिना बौद्ध धर्माचा प्रसार प्रचार व सामाजिक सांस्कृतिक आणि एकात्मतेचा संदेश देणारा ग्रंथ वाचन सतत करत त्या उत्सवाचा समारोप दि. ८ आक्टोंबर बुधवार रोजी प्रसिद्ध गायक जिवन वानखेडे यांचे फुले शाहु आंबेडकर व सर्व धर्म गित गायनाने करण्यात आला.

यावेळी जुने सोनखास येथील समस्त गावकरी मंडळी व ग्रंथ वाचन व ऐकण्यासाठी परिसरातील येणाऱ्या धार्मिकांची उपस्थीती होती, यावेळी निळे वादळ मीत्र मंडळाच्या वतीने या समारोपाचे भव्य दिव्य आयोजन करण्यात आले होते, तर यावेळी उपस्थित हजारो श्रोत्यांना खिचळी वाटपाचा कार्यक्रम रमाई महिला मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आला होता, तर याकरिता समाजातुन व गावातुन विविध जाती धर्मातील तरूण ज्यांनी या धार्मिक कार्यक्रमा करीता वाटेल व मीळेल ती मदत करत समारोप यशस्वी करण्यासाठी शाम जाधव, सागर पट्टे बहादुर, गौतम वाकोडे, प्रफुल्ल इंगळे, अंकुश वानखेडे, रवी पट्टे बहादुर, राहुल जाधव, अमोल जाधव, विलास तिडके, विकास तिडके, गौतम तिडके, सचिन जाधव आदींनी परिश्रम घेतले.

## जि.प. सार्वत्रिक निवडणूक २०२५

# ५२ जि.प.गटासाठी आरक्षण सोडत जाहीर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जि.प. सार्वत्रिक निवडणूक २०२५ एकुण ५२ जि.प.गटासाठी आरक्षण सोडत आज दि.१३ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी तथा पिठासिन अधिकारी जि.प.निवडणूक योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी तथा प्रभारी अधिकारी जि.प.निवडणूक राजेंद्र जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

वाशिम जि.प.गटासाठी विभागीय आयुक्त अमरावती यांनी मान्यता दिलेले आरक्षण पुढीलप्रमाणे आहे. अनुसूचित जाती एकूण ११ जागा सर्वसाधारण ५, महिला ६, अनुसूचित जमाती एकूण ४ जागा सर्वसाधारण २, महिला २, नागरिकांचा मागास प्रवर्ग एकूण १४ जागा सर्वसाधारण ७ महिला ७, सर्वसाधारण एकूण २३ जागा सर्वसाधारण १२, महिला ११ अश्या एकूण ५२ जागांसाठी आरक्षण सोडत उत्साहात पार पडली. लोकसंख्येच्या उतरत्या क्रमानुसार अनुसूचित जातीसाठी १७ पारवा, ३५ गोवर्धन, २९ ब्राम्हणवाडा, ४८ आडोळी, ४९ तोंडगाव, ५० उकळीपेन, ३६ रिठद, ३७ डोंगर किन्ही, २ भामदेवी, २२ कंझरा हे



११ गट आरक्षित होते. यामध्ये सर्वसाधारण ५ आणि महिला ६ जागेचा समावेश आहे. महिला आरक्षणात १७ पारवा, २९ ब्राह्मणवाडा, ३१ डोंगर किन्ही, ३६ रिठद, ३५ गोवर्धन, ०२ भामदेवी गट आरक्षण चिठ्ठयाद्वारे सोडत काढण्यात आली. लोकसंख्येच्या उतरत्या क्रमानुसार अनुसूचित जमातीसाठी २६ किन्ही राजा, २५ राजुरा, १४ शेंदुरजना, ३० मेडशी हे ४ गट आरक्षित होते. त्यापैकी २५ राजुरा, १४ शेंदुरजना, महिला आरक्षण २६ किन्हीराजा, ३० मेडशी चिठ्ठयाद्वारे सोडतीचे आरक्षण निश्चित करण्यात आले.

अनुसूचित जाती व जमाती आरक्षित गट वगळून उर्वरित ३७ जि.प.गटासाठी १ धनज बु, ३ मनभा, ४ उंबर्डा बाजार, ५ कामरगाव, ६ काजळेश्वर, ७ पोहा, ८ धामणी, ९ इंझोरी, १० कुपटा, १२ आसोला खूर्द, १३ गिरोली, १५ फुलउमरी, १६ पोहरादेवी, मंगरूळपीर तालुक्यातील १८ कवठळ, १९ दाभा, २० तराळा, २१ शेलू खूर्द, २३ कासोळा, २४ आसेगाव, मालेगाव तालुक्यातील २७ जऊळका रेल्वे, २८ पांगरी नवघरे, रिसोड तालुक्यातील ३४ केनवड, ३८ हराळ, ३९ गोभणी, ४० वाकद, ४१ भर जहाँगीर, ४२ चिचंबा भर, वाशिम तालुक्यातील ४३ काटा, ४४ पाथर्डी टकमोर, ४५ वारा जहाँगीर, ४६ कळंबा महाली, ४७ तामसी, ,५१ अनसिंग, ५२ वारला या गटातील आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली.यामधून १४ नागरिकांचा मागास प्रवर्ग आरक्षण चिठ्ठयाद्वारे निश्चित करण्यात आले.यामधे १८ कवठळ, ७ पोहा, २० तरहाळा, २४ आसेगाव, ६ काजळेश्वर, २७ जऊळका, १३ गिरोली, १ धनज बु, ३९ गोभणी, ३३ तिवळी, २३ कासोळा, ४३ काटा, ३ मनभा, १० कुपटा आरक्षण निश्चित करण्यात आले. त्यापैकी ७ नामाप्र महिला आरक्षण निश्चित करण्यात आले. यामध्ये १ धनज बु , १० कुपटा, १८ कवठळ, ६ काजळेश्वर, २४ आसेगाव, ३३ तिवळी, २३ कासोळा सोडतीव्दारे आरक्षण निश्चित करण्यात आले. सर्वसाधारण गटासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी राखीव गट वगळून उर्वरित २३ गट सर्वसाधारण निश्चित करण्यात आले. यामध्ये सर्वसाधारण १२ गटात ४ उंबर्डा बाजार , ५ कामरगाव, ८ धामणी, ११ तळप बु, १५ फुलउमरी, १९ दाभा, ३२ शिरपूर , ३४ केनवड , ४० वाकद, ४१ भरजहाँगीर, ४५ वारा जहाँगीर, ४६ कळंबामहाली, व महिला सर्वसाधारण आरक्षणासाठी ११ गटांसाठी ९ इंझोरी, १२ आसोला खुर्द, १६ पोहरादेवी, २१ शेलू खुर्द, २८ पांगरी नवघरे, ३८ हराळ, ४२ चिचंबाभर, ४४ पार्डी टकमोर , ४७ तामसी, ५१ अनसिंग, ५२ वारला या गटाचे आरक्षण सोडत पद्धतीने निश्चित करण्यात आले. यावेळी लोकप्रतिनिधी, पत्रकार, नागरिक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## अल्पवयीन मुलीस फुस लावून पळविले
### शिरपूर पोलीसात संशयित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शिरपूर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या ग्राम अंचळ येथून एका अल्पवयीन तरुणीस फूस लावून पळून नेल्याची घटना दि ७ ते ८ ऑक्टोबर रोजी रात्रीचे दरम्यान घडली, याबाबत संशयित आरोपी विरुद्ध शिरपूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या एका १७ वर्षीय तरुणीस एका संशयित तरुणाने तिच्या घरून फूस लावून रात्रीच्या वेळी पळवून नेले. पीडीताचे वडील रात्री लघुशंकेसाठी उठले असता त्यांना आपली मुलगी दिसली नाही, तेव्हा त्यांच्या सदर बाब लक्षात आली, याबाबत मुलीच्या वडिलांनी शिरपूर पोलीस स्टेशन गाठून दि ११ऑक्टोंबर रोजी तक्रार दाखल केली. त्यांनी आपल्या तक्रारीत म्हटले की आमच्या राहत्या मी माझी पत्नी व मुलगी रात्री घरात झोपलो असता रात्री बारा ते साडेबाराच्या दरम्यान मला लघुशंकेसाठी जाग आली, मी लघुशंका करून आलो असता माझ्या घरात मला माझी मुलगी झोपलेली आढळून आली नाही, माझ्या घरून कोण्यातरी तरुणाने माझ्या १७ वर्षीय मुलीस फूस लाऊन पळून नेले आहे. माझा आमच्या गावातील तरुण आतिश निंबाजी जाधव यांच्यावर संशय असून त्यांनीच माझ्या मुलीस फूस लावून पळून नेले, अशा तक्रारीवरून शिरपूर पोलिसांनी आरोपी विरुद्ध विविध कलमा नुसार गुन्हा दाखल केला असून घटनेचा पुढील तपास ठाणेदार केशव वाघ यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक इमरान खा पठाण हे करीत आहेत.

## नगरपंचायतच्या प्रारूप मतदार याद्या दुरुस्ती करण्याची मागणी

### भाजपा पदाधिकाऱ्यातर्फे मुख्याधिकारी यांना आक्षेपा सह निवेदन



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

नगरपंचायत च्या प्रारूप मतदार यादीत प्रचंड प्रमाणात घोळ झाला असून असंख्य मतदारांची नावे वास्तव्यात असलेल्या प्रभागातून वगळण्यात येऊन इतर प्रभागातील यादीत समाविष्ट करण्यात आल्याने प्रारूप मतदार यादीची दुरुस्ती करून देण्याची मागणी व त्याबाब आक्षेप भाजपा नेते डॉ विवेक माने यांच्यासह कार्यकर्त्यांनी घेतल्या असून मुख्याधिकारी निलेश गायकवाड यांना आक्षेपा सह पत्र दिले आहे.

नगरपंचायत निवडणूक लक्षात घेता शहरातील १७ प्रभागातील मतदार यादीची प्रसिद्धी झाली आहे मतदार यादी प्रसिद्धीनंतर १७ ही प्रभागातील मतदार यादीत प्रचंड प्रमाणात घोळ दिसत असून प्रत्येक प्रभागातील असंख्य मतदारांची नावे त्यांच्या प्रभागा ऐवजी इतर प्रभागात समाविष्ट करण्यात आली आहे त्यात उदाहरणार्थ प्रभाग क्रमांक दोन या प्रभाग मध्ये राहत असणाऱ्या १०० ते १५० मतदारांची नावेही प्रभाग क्रमांक दोनच्या यादीत नसून शहरातील इतर वेगवेगळ्या प्रभागात समाविष्ट करण्यात आली आहे अशाच प्रकारचा घोळ शहरातील इतर प्रभागात सुद्धा झालेला आहे त्यामुळे याबाबतचा आक्षेप घेत तसे पत्र भारतीय जनता पार्टीच्या वतीने मालेगाव नगरपंचायत मुख्याधिकारी निलेश गायकवाड यांना देण्यात आले आहे तसेच या पत्रात त्यांनी वस्तूस्थिती मांडली असून प्रारूप मतदार यादीत बदल बाबत दुरुस्ती करून देण्याची मागणी केली आहे.

भाजपा नेते डॉ विवेक माने , संतोष तिखे ,किशोर महाकाळ संतोष घुगे ,संदीप पिंपरकर ,शेख मुदसिर ,विनोद बानाईकर , राहुल गायकवाड यांनी मुख्याधिकारी यांची भेट घेऊन त्यांना पत्र दिले असता मुख्याधिकारी निलेश गायकवाड यांनी झालेल्या प्रारूप मतदार यादीतील बदल बाबत दुरुस्ती करून देण्याचे आश्वासन दिले भाजपा जिल्हा अध्यक्ष पुरुषोत्तम चित्तलागे यांचे पत्रही यावेळी मुख्याधिकाऱ्यांना देण्यात आले.

## सैनिक कल्याण विभागात लिपिक-टंकलेखक पदांची भरती; ७२ पदासाठी मागविले अर्ज

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे व अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांमध्ये लिपिक टंकलेखक (गट-क) या एकूण ७२ पदांच्या भरतीसाठी फक्त माजी सैनिक उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत.या पदांपैकी एक पद दिव्यांग उमेदवारांसाठी राखीव असून, किमान ४० टक्के अपंगत्व असलेल्या उमेदवारांमधून गुणवत्ता आणि उपलब्धतेनुसार भरती करण्यात येणार आहे. सदर भरती प्रक्रिया टिसीएस-आयओएन (TCS-iON) यांच्या मार्फत पार पडणार असून, अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीनेच स्वीकारले जातील. कोणत्याही अन्य माध्यमातून आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत. उमेदवारांनी आपले ऑनलाईन अर्ज www. mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील Resources Tab Recruitment Tab मध्ये जाऊन १४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजतापासून ते ५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. अर्जासाठीची लिंक बंद होईल. जिल्ह्यातील सर्व पात्र माजी सैनिक उमेदवारांनी या भरती संधीचा लाभ घ्यावा.

## ‘आपत्ती धोके निवारण दिना’ निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात प्रतिज्ञा संपन्न



■ प्रतिनिधी | वाशिम ■

संयुक्त राष्ट्र संघाने घोषित केल्यानुसार दरवर्षी १३ ऑक्टोबर हा दिवस ‘आपत्ती धोके निवारण दिवस’ म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त आज दि.१३ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रतिज्ञा कार्यक्रम संपन्न झाला.

या प्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र जाधव, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी खालीलप्रमाणे प्रतिज्ञा केली.

‘मी प्रतिज्ञा करतो/करते की शासनाच्या आपत्ती सौम्यीकरणाच्या विविध उपक्रमात मी सक्रिय सहभाग नोंदवून,आपत्तीपासून माझी, माझ्या परिवाराची, माझ्या समाजाची व सार्वजनिक मालमत्तेची सुरक्षा करण्याविषयी ज्ञान प्राप्त करीन.आपत्ती धोके कमी करणाऱ्या समुदाय-आधारित उपक्रमांमध्ये मी सक्रिय सहभाग घेईन.माझ्या परिवारात व समाजात आपत्तीबद्दल जनजागृती करून, त्यासंबंधी पूर्वतयारी कशी करावी याविषयी सदैव प्रयत्न करीन.राज्यातील आपत्तीप्रवण भागात जिवीत, वित्त व पर्यावरण विषयक हानी होऊ नये म्हणून सदैव कटिबद्ध राहीन.

## कोचिंग क्लासेस असोसिएशन (CCA) चे सहावे राज्यस्तरीय अधिवेशन



### सोलापूर येथे उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडले

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

दि. १२ ऑक्टोंबर रोजी या अधिवेशनात मा. प्रा. पी. एम. वाघ (राज्याध्यक्ष, CCA), प्रा. ढाकणे आणि प्रा.मनवर यांच्या हस्ते प्रा. विशाल घुगे चाणक्य कोचिंग क्लासेस, मालेगाव यांची वाशिम जिल्हा अध्यक्ष, र्ण्ं म्हणून निवड करण्यात आली. तसेच ज्ञान, नेतृत्व आणि प्रेरणेचा संगम प्रा. विशाल घुगे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्रा. घुगे यांनी शिक्षण क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून उल्लेखनीय कार्य केले आहे.

## महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम
## सिव्हिल लाईन वाशिम

ई-मेल - washim.ee@mahapwd.gov.in दुरध्वनी क्रं- ०७२५२-२३२३३४

### ई-निविदा सुचना १८ सन २०२५-२६

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन बि-१ नमुन्यातील निविदेतील अटी व शर्तीची पूर्तता करणारे नोंदणीकृत कंत्राटदार यांचे कडुन निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://maharashtra.etenders.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | रिसोड तालुक्यातील रा.मा. २१४ ते सोनाटी मांगुळ झनक मसलापेन बेलखेड रिठद करंजी अमानी जोडगव्हाण तोरणाळा सावंगा जहांगीर पाडी टकमोर रस्ता. रा.मा. ३९९ लांबी ३८.१३ किमी, साखळी क्र. २/५०० ते ३/५००,१०/००० ते १२/००० १४/००० ते १५/००० २२/००० ते २४/००० ३१/०० ते ४१/१३० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ४७.६२ लक्ष |
| २ | रिसोड तालुक्यातील रा. मा. २१४ बाळखेड गोभणी मांगुळ झनक कुकसा प्र.रा.मा. १२ ला जोडणारा रस्ता. रा.मा. ४०१ लांबी २६.२० किमी. साखळी क्र.१२/००० ते २६/०० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ४१.९२ लक्ष |
| ३ | रिसोड तालुक्यातील रा.मा ५१ ते घोटा हारळ वरखेड रस्ता रा.मा २५८ लांबी ७.६० किमी .साखळी क्र. ०/००० ते ७/६००, दहीगांव मंगरूळ नवघरे कळमेश्वर नायगांव दत्ततापुर मोळा पिंप्रोमाळी मेहकर अंत्री देशमुख गुंधा बागुलखेड गुंजखेड वाकद रा.मा. २१४ ला जोडणारा रस्ता रा.मा. ४६० लांबी ४.५० किमी. साखळी क्र.६५/००० ते ६९/५००, राज्यमार्ग-२२२ ते शेंदुरजणा राजेगांव सुलतानपूर वेणी गंधा हिरवड वढव ते मोप रा. मा ५१ ला जोडणारा रस्ता रा. मा ३९१ लांबी २.१० किमी. साखळी क्र.०/००० ते २/१०० व बेलखेड ढोरखेड शिरपूर करंजी तामसी वाशिम रस्ता रा. मा ४०२ लांबी ४.२० किमी. साखळी क्र.०/००० ते ४/२०० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ५४.३२ लक्ष |
| ४ | रिसोड तालुक्यातील रिसोड मोहजा इंगोले कवठा पेडगाव देऊळगाव बंडा आसेगांव ते रा.मा ५१ ला जोडणारा रस्ता प्रजिमा ५६ लांबी २२.०० किमी. साखळी क्र.०/०० ते २२/६०० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ६६.७० लक्ष |
| ५ | रिसोड तालुक्यातील बोरी गोहगांव वाकद बोरखेडी मोप असोला मोहजाबंदी रस्ता प्रजिमा ५८ लांबी २७.२० किमी साखळी क्र. ०/०० ते ७/०००,१९/०० ते २३/८०० व रा.मा ५१ ते चीचांबाभर ते जिल्हासिमा येलदरी प्रजिमा १८ लांबी ११.२० किमी.साखळी क्र. ०/०० ते २/०००, १०/०० ते ११/३०० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ४४.५६ लक्ष |
| ६ | रिसोड तालुक्यातील किनखेड कवठा चिखली व्याड ते जिल्हा सिम प्रिजिमा ९ लांबी १३.३० किमी. साखळी क्र. ०/०० ते ९/०००, भरजहांगीर कुन्हा मांडवा मोहजाबंदी ते जिल्हासिमा प्रजिमा ११ लांबी ११ किमी. १०/०० ते ११/२०० व रा.मा. ५१ ते रिठद पार्टी तिखे येवता दापुरी खु. वाघी ख, गोवर्धना रस्ता. प्रजिमा ५९ लांबी १५.२० किमी. साखळी क्र. ५/००० ते १३/००० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ५३.७१ लक्ष |
| ७ | रिसोड तालुक्यातील शेलू खडसे मोठेगांव खडकी सदार गोवर्धन केनवड ते जिल्हा सीमा प्रजिमा १० लांबी ९.५० किमी साखळी क्र. १५/०० ते १९/८००, जोडगव्हाण पांग्री नवघरे अमानी करंजी रिठद येवती जुमडा केकतउमरा ते प्र.रा.मा. प्रजिमा ६ लांबी ४.४० किमी. साखळी क्र.०/०० ते २/००० व लेहणी धोडप सरपखेड ते रा.मा. २१४ वाकद ते बुलडाणा जिल्हा सिमेला जोडणारा रस्ता प्रजिमा ५१ लांबी १३.३० किमी. साखळी क्र.८/००० ते ११/००० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ३५.४१ लक्ष |
| ८ | रिसोड तालुक्यातील मादणी वडजी गोभणी धोडप देगांव वाडी रावताळ रस्ता. प्रतिमा. ६१ लांबी १८.८० किमी. साखळी क्र.६/०० ते ९/०००,१४/८०० ते १५/८००, कंकरवाडी निजामपूर रिसोड घोन्सरवाडी रस्ता प्रजिमा ५७ लांबी १३.०० किमी. साखळी क्र.६/००० ते ८/००० व गोभणी करडा रिसोड रस्ता प्रजिमा ६२ लांबी १०.४० किमी. साखळी क्र.०/०० ते ४/००० ची वार्षिक दुरुस्ती करणे | २९.५१ लक्ष |
| ९ | मानोरा तालुक्यातील विळेगांव कारपा आसोला गव्हा विठोली वरोली रस्ता. साखळी क्र.६/०० ते २०/००० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ४१.३२ लक्ष |
| १० | मानोरा तालुक्यातील मानोरा गव्हा रस्ता, साखळी क्र.०/०० ते ३/३००, साखळी क्र.१३/०० ते १७/०००, वनोजा तऱ्हाळा पोटी मोहरी धामनी इंझोरी रस्ता. साखळी क्र.३०/०० ते ३३/००० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ३०.४० लक्ष |
| ११ | मानोरा तालुक्यातील वनोजा तऱ्हाळा पोटी मोहरी धामनी इंझोरी साखळी क्र.३५/०० ते ४०/००० व गिंभा कोलार शेंदूरजना रुई रस्ता, साखळी क्र.१२/०० ते १७/००० ची वार्षिक दुरुस्ती करणे | २९.५१ लक्ष |
| १२ | मानोरा तालुक्यातील मानोरा तळप कार्ली रस्ता, साखळी क्र.४/०० ते ६/४००, हाताना हातोली आमदरी पालोदी रुई रस्ता, साखळी क्र. ०/०० ते २/०००, यशवंत नगर कारखेडा पंचाला पोहरादेवी सिंगद रस्ता, साखळी क्र. ०/०० ते २/४०० व यशवंत नगर कारखेडा पंचाला पोहरादेवी सिंगद रस्ता, साखळी क्र.५/४०० ते ११/४०० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ३६.५९ लक्ष |
| १३ | मालेगांव तालुक्यातील प्र.रा.मा. १२ कळमगव्हाण कोळगांव बु. रेगांव खेड पांगरीकुटे मानका एकांबा रस्ता प्रजिमा ५३ साखळी क्र.६/००० ते १६/००० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ३८.३७ लक्ष |
| १४ | मालेगांव तालुक्यातील शिरपुर एकांबा वडप कळंबेश्वर वारंगी रिधोरा रस्ता प्रजिमा ५४, साखळी क्र. २/८०० ते ६/०००,९/००० ते २०/००० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ४१.९१ लक्ष |
| १५ | मालेगांव तालुक्यातील मालेगांव डव्हा कळंबेश्वर मुंगळा भौरद रस्ता प्रजिमा ५५, साखळी क्र.२/८०० ते १०/००० व रा.मा.ते तोरणाला दुबलवेल जउळका अमाना पांगराबंदी ते जिल्हा सीमा रस्ता प्रजीमा १६ साखळी क्र. ०/००० ते ३/०००,१२/००० ते १४/००० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ३७.७८ लक्ष |
| १६ | मालेगांव तालुक्यातील रा. मा १६१ ते मेडशी वाकळवाडी खैरखेडा अमाना माळेगाव किन्ही रस्ता प्रजिमा ५२ साखळी क्र.१/५०० ते ३/०००, रा.मा. १२ ते गणेशपुर मेरालडोह पिंप्री निंबी मानोली शेलगाव ते रा.मा. रस्ता प्रजिमा ६५ साखळी क्र.४/००० ते ५/००० व मालेगाव बोरगाव पिंपळा आमखेडा जोड्गव्हान तोरणाला पार्डी टकमोर रस्ता प्रजीमा ७ किमी ६/००० ते १४/००० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ३०.९९ लक्ष |
| १७ | मालेगांव तालुक्यातील रा.मा. १६१ ते रिधोरा ब्राम्हणवाडा देवठाणा मारसुळ पांग्राबंदी ते जिल्हा सिमा प्रजिमा ६४ साखळी क्र. २/८०० ते १७/००० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ४१.९१ लक्ष |
| १८ | मालेगांव तालुक्यातील प्र.रा.मा. १२ डोंगरकिन्ही मेडशी रिधोरा राजूरा कुतरडोह किन्हीराजा काटा वाशिम केकतउमरा बोरखेडी रस्ता रा.मा. ४०० साखळी क्र.०/००० ते १५/०००,३४/०० ते ३८/०० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ५६.०९ लक्ष |
| १९ | मालेगांव तालुक्यातील रा.मा. २१४ ते सोनाटी मांगुळ झनक मसलापेन बेलखेड रिठद करंजी अमानी जोडगव्हाण तोरणाळा सावंगा जहांगीर पार्डी टकमोर रस्ता. रा.मा. ३९९, साखळी क्र.४५/००० ते ५२/०००,५५/०० ते ६६/०० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ३५.४२ लक्ष |
| २० | मालेगांव तालुक्यातील बेलखेड ढोरखेड शिरपूर करंजी तामसी वाशीम रस्ता रा.मा ४०२. साखळी क्र. ०/०० ते ७/६००, २६/१०० ते ३४/६०० व शेलुफाटा ते नागरतास (शेलू बायपास) प्र.रा.मा. १२. साखळी क्र.०/०० तो ३/०० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ३९.९५ लक्ष |
| २१ | कारंजा तालुक्यातील वनोजा शेंदुर्जना मोरे पोटी मोहरी धमनी इंजोरी म्हसनी दिघी सोमठाना ते राज्यमार्ग प्रजिमा २२, साखळी क्र. ४३/५०० ते ४७/२००, धोत्रा डोंगरगांव पिंप्रीमोडक हिवरालाहे प्रजिमा ३२, साखळी क्र.५/६०० ते ११/२०० व अनई इंझा येवता मनभा रस्ता प्रजीमा ३९,साखळी क्र.०/०० ते ५/९०० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ४४.८६ लक्ष |
| २२ | कारंजा तालुक्यातील वनोजा शेंदुर्जना मोरे पोटी मोहरी धमनी इंजोरी म्हसनी दिघी सोमठाना ते राज्यमार्ग प्रजिमा २२, साखळी क्र. ४३/५०० ते ४७/२००, धोत्रा डोंगरगांव पिंप्रीमोडक हिवरालाहे प्रजिमा ३२, साखळी क्र.५/६०० ते ११/२०० व अनई इंझा येवता मनभा रस्ता प्रजीमा ३९, साखळी क्र. ०/०० ते ५/९०० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ४४.८६ लक्ष |
| २३ | कारंजा तालुक्यातील कारंजा धनज प्रजिमा २५ ता. कारंजा. साखळी क्र.१७/००० ते ३४/४०० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ५१.३५ लक्ष |
| २४ | कारंजा तालुक्यातील कामरगांव लाडेगांव पिंप्री मोडक भामदेवी धोत्रा वाढोणा दोनद मनभा पिलखेडा उंबर्डा सोमठाणा प्रजीमा २६ साखळी क्र. ०/००० ते ६/००,१०/००० ते १८/०००,२०/००० ते २४/००,२८/००० ते ३२/८०० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ६७.२९ लक्ष |
| २५ | कारंजा तालुक्यातील कारंजा कुपटी कामरगांव बेंबळा ते जिल्हा सिमा प्रजिमा २७. साखळी क्र. १/५०० ते ३/००० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ४२.२० लक्ष |
| २६ | कारंजा तालुक्यातील पिंप्रीमोडक कामठा म्हसला बोरगांव ते जिल्हा सिमा प्रजिमा २८, साखळी क्र.०/००० ते ३/००,७/१०० ते १२/१०० व कामरगांव उंद्री बांबर्डा शहा कारंजा प्रजिमा ३५, साखळी क्र.०/०० ते ९०० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ५०.१७ लक्ष |
| २७ | कारंजा तालुक्यातील लोहारा पोहा पारवा काकडशिवणी भडशिवणी बाबर्डा कुपटी प्रजिमा ३३.साखळी क्र.९/०० ते २००० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ३२.४६ लक्ष |
| २८ | कारंजा तालुक्यातील वापटी लोणी अरब ते जिल्हा सिमा डवाढोणा .प्रजिमा ३४, साखळी क्र.०/०० ते ७/५००,११/०० ते १२/५०० व वाशिम जिल्ह्यातील चेहेल गीम्भा धामणीखडी पसरणी रस्ता प्रजीमा ४४. साखळी क्र.१२/०० ते १४/३०० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ३३.३५ लक्ष |
| २९ | कारंजा तालुक्यातील कारंजा जांब वहीतखेड उंबर्डा बाजार ते जिल्हा सिमा प्रजिमा ३६, साखळी क्र.०/०० ते १०/२०० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ३०.१० लक्ष |
| ३० | कारंजा तालुक्यातील लोणी अरब निंबा जहांगीर दोनद बु. वडगाव रंगे दुधोरा सुकळी रस्ता प्रजीमा ३७ साखळी क्र.५/०० ते १८/०० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ३८.३७ लक्ष |
| ३१ | कारंजा तालुक्यातील वढवी लोहारा शेलुवाडा रस्ता प्रजीमा ३८ साखळी क्र.०/०० ते १२०० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ३५.४१ लक्ष |
| ३२ | मंगरुळपीर तालुक्यातील वनोजा तऱ्हाळा पोटी मोहरी धामनी प्रजिमा २२ किमी ०/०० ते २८/००, साखळी क्र. २३/०० ते २८/००, धानोरा कळंबा कोलंबी सावरगाव चिखलागड प्रजिमा २३ किमी ०/०० ते १६/५००, साखळी क्र.७/०० ते ११/००, शेलू शेंदुरजना मोरे प्रजिमा ४० किमी ०/०० ते १०/५००, साखळी क्र. ०/०० ते ३/०० व रा. मा. वनोजा माळशेलू ते जिल्हा सीमा (पिंजरकडे ) प्रजिमा ३० किमी १०/०० ते १८/६६०, साखळी क्र.१०/०० ते १०/४०,१३/२०० ते १७/०० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ४७.८१ लक्ष |
| ३३ | वाशिम तालुक्यातील राजगाँव उकळीपेण वारला अनसिंग इलखी प्र.जि.मा. ०३ की.मी. ०/०० तो २७/९००, साखळी क्र.२२/५०० ते २६/०००, काटा तामसी तांदळी मोहजा प्र.जि.मा.-४७ की.मी. ०/०० तो १७/०००, साखळी क्र.८/२०० ते ९/८०० व रा.मा. ५१ ते फाळेगाव थेट शिरपुटी कृष्णा वाई सावळी ते जिल्हा सीमा प्र.जि.मा.-४८ की.मी. ०/०० तो १९/७००, साखळी क्र.०/००० ते ९००० ची वार्षिक दुरुस्ती करणे | ४१.६१ लक्ष |
| ३४ | जिनियो अंतर्गत उंबर्डा ता. मानोरा येथे शादीखानाचे बांधकाम करणे | ११८८०१३ |
| ३५ | जिनियो अंतर्गत सायखेडा ता. मंगरुळपीर येथे शासकिय जागेवर संत गजानन महाराज मंदिर परीसरात सभामंडपाचे बांधकाम करणे | १६४६६३४ |
| ३६ | जिनियो अंतर्गत क्रिडा संकुल मानोरा येथे व्यायामशाळेचे बांधकाम करणे | ११९४३४८ |
| ३७ | वाशिम येथील महात्मा गांधी शाळा परिसरात कंपाऊंड वॉलचे बांधकाम करणे | ५६९५८६९ |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी :-** दिनांक. १०.१०.२०२५ ते दिनांक १७.१०.२०२५

**ई-निविदा उघडणे :-** कार्यकारी अभियंता सा. बा. विभाग वाशिम यांचे कार्यालयात दिनांक. १९.१०.२०२५ वेळ ११.०० वाजता

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. http://mahapwd.com 2. https://mahatenders.gov.in

(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)

कार्यकारी अभियंता, वाशिम कार्यालयातील सूचना फलक

जा.क्र. ६४०७/ई-निसु-१२/मंत्रालय/निली/२५-२६ दि.०७.१०.२०२५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सार्वजनिक बांधकाम विभाग वाशिम

**(शुभम जोशी)**
कार्यकारी अभियंता
सा. बा. विभाग वाशिम

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा, मंगळवार १४ ऑक्टोबर २०२५ ■ अंक ३१५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

# मिनी मंत्रालयाचा मार्ग मोकळा : ग्रामीण भागातील पुढारी लागले आजपासून कामाला

## आरक्षण जाहीर; वर्ध्यात राजकीय समीकरणांची उलथापालथ

### महिलांचा प्रभाव वाढणार, माजी पदाधिकाऱ्यांचा नाराजीचा सूर



**वर्धा जनमाध्यम** : जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या गणांचे आरक्षण जाहीर होताच वर्धा जिल्ह्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. सोडतीने प्रस्थापित पुढाऱ्यांच्या आशा पळवून नेल्या असून अनेक नव्या चेहऱ्यांसाठी संधीचे दरवाजे खुलले आहेत. महिलांचा प्रभाव यंदा ठळकपणे वाढणार असून काही गटात अनपेक्षित बदलांमुळे राजकीय समीकरणांची नवी मांडणी सुरू झाली आहे.१३ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी वान्मथी सी. व उपजिल्हाधिकारी (ग्रामपंचायत) श्रीपती मोरे यांच्या उपस्थितीत आरक्षण सोडत झाली. एकूण ५२ जागांपैकी २६ जागा महिलांसाठी राखीव ठरल्या असून, जिल्हा परिषद अध्यक्षपद अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गासाठी राखण्यात आल्याने गटवार आरक्षणाकडे सर्वांचे लक्ष लागले होते.सोडतीच्या निकालानंतर अनेक ठिकाणी आनंदाचा जल्लोष दिसून आला तर काही ठिकाणी निराशेची भावना पसरली. जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर स्थानिक कार्यकर्त्यांची गर्दी झाली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या निवडणूक घेण्याच्या आदेशानंतर वर्ध्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. आरक्षण निश्चित झाल्याने पुढारी प्रचारयोजनेत गढले असून माजी पदाधिकाऱ्यांचा नाराजीचा सूर तीव्र आहे.आगामी निवडणुकीत वर्ध्याला नव्या समीकरणांतील चुरशीची लढत पाहायला मिळणार असून राजकीय रणांगण सजले आहे.

**जिल्हा परिषद गटांचे आरक्षण**

**सर्वसामान्य प्रवर्गपुरुषांसाठी**

पोहणा, सालोड (हिरापूर), मांडगाव, त?ोडा, पिपरी (मेघे), तळेगाव (टालाटूले), महाबळा, जळगाव, लहान आर्वी, केळझर, गिरड, वडनेर, ठाणेगाव.

**महिलांसाठी** : पारडी, अल्लीपूर, तळेगाव (श्याम पंत.), वाठोडा, शेकापूर (बाई), कानगाव, जाम, अंदोरी, कन्नमवारग्राम, वाघोली, सावली (वाघ).

**नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) पुरुष**

येळाकेळी, आंजी (मोठी), कांढळी, सेवाग्राम, हमदापूर, वायगाव (नि.), वायफड.

महिला : भिडी, घोराड, पवनार, वरुड, बोरगाव (मेघे), नंदोरी, इंझाळा.

**अनुसूचित जाती (एससी) पुरुष**

गौळ, गुंजखेडा, नाळवाडी.

महिला : वाठोडा, नाचणगाव, सिंदी (मेघे), सावंगी (मेघे).

**अनुसूचित जमाती (एसटी) पुरुष**

कोरा, झडशी, विरुळ.

महिला : मोरांगणा, साहूर, रोहणा, सिंदी (विहिरी).

# आठ पंचायत समित्यांचे आरक्षण जाहीर

## काही ठिकाणी जल्लोष, तर काही ठिकाणी नाराजी



**वर्धा जनमाध्यम** : जिल्ह्यातील आठ पंचायत समित्यांच्या सदस्य पदांसाठीची आरक्षण सोडत सोमवारी मोठ्या उत्सुकतेत पार पडली. वर्धा, हिंगणघाट, देवळी, आर्वी, समुद्रपूर, कारंजा (घा.), आष्टी आणि सेलू या पंचायत समित्यांतील सर्कलचे आरक्षण जाहीर होताच काही ठिकाणी आनंदाचा क्षण अनुभवता आला, तर काही ठिकाणी निराशेचा सूर उमटला. सोडतीच्या निकालाने स्थानिक राजकारणात हालचालींना वेग आला आहे.स्थानिक प्रशासनाच्या उपस्थितीत पार पडलेली ही सोडत सर्वत्र शांततेत पार पडली. मात्र काही ठिकाणी अपेक्षित आरक्षण न मिळाल्याने काही स्थानिक नेते व कार्यकर्त्यांमध्ये नाराजीची भावना होती.

**सेलू पंचायत समिती : १२ सदस्यांसाठी आरक्षण**

सालई (कला) अनुसूचित जमाती (महिला), झडसी इतर मागास प्रवर्ग, हिंगणी सर्वसाधारण (महिला), घोराड सर्वसाधारण (महिला), केळझर अनुसूचित जमाती, दहेगाव अनुसूचित जात, येळाकेळी सर्वसाधारण, आकोली ओबीसी, महाबळा सर्वसाधारण, सुकली (स्टेशन) सर्वसाधारण, हमदापूर सर्वसाधारण (महिला) व देऊळगाव ओबीसी असे आरक्षण जाहीर झाले.

**कारंजा (घा.) पंचायत समिती : ८ सदस्यांसाठी आरक्षण**-ठाणेगाव व सारवाडी सर्वसाधारण, कन्नमवारग्राम व सेलगाव उमाटे सर्वसाधारण (महिला), पारडी ओबीसी, नारा ओबीसी (महिला), कुंडी एससी आणि सिंदीविहिरी एसटी (महिला) असे आरक्षण निश्चित झाले.

**समुद्रपूर पंचायत समिती : १२ सदस्यपद**- समुद्रपूर येथे पार पडलेल्या सोडतीत कांढळी ओबीसी (महिला), वायगाव सर्वसाधारण (महिला), गिरड सर्वसाधारण, मोहगाव एससी, मांडगाव व सुजातपूर सर्वसाधारण, जाम सर्वसाधारण (महिला), वायगाव (हळदया) ओबीसी, नांदोरी ओबीसी (महिला), सावंगी (झाडे) सर्वसाधारण (महिला), कोरा एसटी, मंगरूळ एसटी (महिला) असे आरक्षण निश्चित करण्यात आले.

**देवळी पंचायत समिती : १२ सदस्य पदांसाठी आरक्षण**

देवळीत झालेल्या सोडतीत गुंजखेडा एससी (महिला), आगरगाव ओबीसी, नांदोरा-बोरगाव (आ.) व भिडी सर्वसाधारण, गौळ–सोनोरा ढोक सर्वसाधारण (महिला), नाचणगाव व अंदोरी ओबीसी (महिला), नाचणगाव एससी, इंझाळा एसटी, विजयगोपाल एसटी (महिला) अशी पदांची वाटणी जाहीर झाली.

**आष्टी पंचायत समिती : ६ सदस्य पदे**- आष्टी (शहीद) येथे पार पडलेल्या सोडतीत साहूर, भारसवाडा, तळेगाव ही सर्वसाधारण सर्कल्स, तर माणिकवाडा एसटी, आर्वी (छोटी) ओबीसी, अंतोरा एससी असा निकाल लागला.

**हिंगणघाट पंचायत समिती : महिलांना मोठी संधी**

हिंगणघाट तहसील कार्यालयात झालेल्या सोडतीत महिलांचे प्रतिनिधित्व लक्षणीय राहिले. सर्वसाधारण प्रवर्गासाठी ७ (त्यात ३ महिला), ओबीसी प्रवर्गासाठी ३ (त्यात २ महिला), एससी व एसटी प्रवर्गासाठी प्रत्येकी २ (त्यात प्रत्येकी १ महिला) अशी संतुलित आरक्षण रचना जाहीर झाली. वाघोली एससी (महिला), वणी एसटी (महिला), सावली (वाघ), खानगाव, फुकटा, पोहणा या महिलांसाठी राखीव सर्कल्स ठरल्या.

**वर्धा पंचायत समिती : सर्वाधिक २५ सदस्यपदे**

वर्धा पंचायत समितीची आरक्षण सोडत मोठ्या उत्साहात संपन्न झाली. २५ पदांसाठी मांडवा एसटी, आंजी मोठी सर्वसाधारण, पिपरी मेघे ओबीसी (महिला), सिंदी मेघे एससी (महिला), पवनार ओबीसी (महिला), साटोडा सर्वसाधारण, नालवाडी ओबीसी, म्हसाळा एससी (महिला), वरूड सर्वसाधारण (महिला), करंजी भोगे एसटी (महिला), सेवाग्राम एससी (महिला) यांसह अनेक सर्कल्समध्ये महिलांना प्राधान्य देण्यात आले.

**आर्वी पंचायत समिती ' एसडीएम यांच्या उपस्थितीत सोडत**

आर्वीत आरक्षण सोडत उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट यांच्या अध्यक्षतेत पार पडली. रोहणा एसटी (महिला), धनोडी सर्वसाधारण, विरूळ ओबीसी (महिला), रसुलाबाद एसटी, वाठोडा एससी, देऊरवाडा एससी (महिला), वाढोणा ओबीसी, बोथली ओबीसी (महिला), जळगाव सर्वसाधारण (महिला), वर्धमनेरी सर्वसाधारण, खारांगणा सर्वसाधारण (महिला), मोरांगणा सर्वसाधारण असे आरक्षण निश्चित झाले.जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांची सोडत पार पडल्यानंतर आता आगामी निवडणुकांसाठी स्थानिक राजकीय समीकरणे वेगाने बदलताना दिसत आहेत. काही महिला नेत्यांना आरक्षणाचा लाभ मिळाल्याने त्यांची राजकीय संभावना वाढली आहे. तर आरक्षण न मिळालेल्यांच्या चेहऱ्यावर नाराजी स्पष्टपणे दिसत होती.

## सरकारी रुग्णालयातील बेफिकिरीचा कळस

# मुदतबाह्य औषधी देऊन रुग्णाला डोळ्याचा त्रास



**पुलगाव जनमाध्यम**- जनतेच्या आरोग्याची जबाबदारी सांभाळणाऱ्या सरकारी यंत्रणेची बेफिकिरी पुन्हा एकदा समोर आली आहे. पुलगाव येथील ग्रामीण रुग्णालयात रुग्णाला मुदतबाह्य औषध देण्यात आल्याने एका तरुणाच्या डोळ्याला गंभीर त्रास झाल्याची धक्कादायक घटना उघड झाली आहे.

कासारखेड येथील २३ वर्षीय रोहित शंकर वरघणे हा पुलगाव ग्रामीण रुग्णालयात डोळ्याची उपचारासाठी आला होता. नियमित हजेरी लावणारे डोळे तज्ज्ञ जयस्वाल यांनी त्याला डोळ्यात टाकण्याचा ट्यूब लिहून दिला. बाह्यरुग्ण विभागातून मिळालेल्या त्या औषधाचा वापर केल्यानंतर वरघणे यांना डोळ्यात प्रचंड जळजळ, लालसरपणा आणि त्रास जाणवू लागला. तपासणी केली असता ट्यूबवरील मुदत ऑगस्ट २०२५ मध्येच संपलेली असल्याचे त्याच्या लक्षात आले. घटनेची माहिती त्वरित रुग्णालय अधिकाऱ्यांना देताच, संबंधित कर्मचाऱ्यांनी शिताफीने मुदतबाह्य औषधींचा साठा गायब केल्याचे स्थानिकांनी सांगितले. अशा मुदतबाह्य औषधी किती जणांना देण्यात आल्या याची प्रशासनाला पुरेपूर माहिती नाही, हीच खरी चिंता आहे. या प्रकरणी वैद्यकीय अधीक्षक डॉ. पी. आर. कोडापे यांनी सांगितले की, जिल्हा शल्यचिकित्सक आणि निवासी शल्यचिकित्सकांना घटनेची माहिती कळवण्यात आली असून, दोषींवर कठोर कारवाई केली जाईल. मात्र सरकारी रुग्णालयातील या निष्काळजीपणाने आरोग्य यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

## बुधवारी साजरा होणार 'वृत्तपत्र विक्रेता दिवस

वर्धा जनमाध्यम: माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वर्धा वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी संघटनेतर्फे बुधवारी 'वृत्तपत्र विक्रेता दिवस' साजरा करण्यात येणार आहे. सकाळी बस स्थानक परिसरात सेंटरवर कलाम यांच्या प्रतिमेस




हारर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात केली जाईल. सायंकाळी संघटनेच्या कार्यालयात दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सदस्यांना भेटवस्तू आणि नगदी स्वरूपातील प्रोत्साहन देण्यात येणार आहे. या कार्यक्रमात सर्व सदस्यांनी उत्साहात सहभागी व्हावे, असे आवाहन संघटनेचे अध्यक्ष सुनिल पाटणकर आणि सचिव गजानन मसने यांनी केले आहे.

# दिव्यांगांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करा - जिल्हाधिकारी वान्मथी सी.

### दिव्यांगांप्रती संवेदनशीलता जागृती कार्यशाळा



**वर्धा जनमाध्यम** : दिव्यांग व्यक्तीला जीवन जगताना अनेक संकटांचा सामना करावा लागतो. प्रत्येक टप्प्यावर त्यांच्यापुढे आव्हान असते. दिव्यांगांसाठी शासन अनेक योजना राबवते. या योजनांचा लाभ व त्यांचे हक्क मिळवून देण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. दिव्यांग व्यक्तींसाठी पुढाकार घेऊन कामे करा, त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करा, अशा सूचना जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात 'दिव्यांग हक्क अधिनियम २०१६' अन्वये दिव्यांगांप्रती संवेदनशीलता जागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा विधीसेवा प्राधिकरणचे सचिव विवेक देशमुख, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ, जिल्हा समाज कल्याण अधिकारी प्रतिभा भागवतकर यांच्यासह विविध विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी वान्मथी सी. पुढे म्हणाल्या, प्रत्येक दिव्यांग व्यक्तीपर्यंत पोहचून त्यांना शासकीय योजनांचा लाभ देणे गरजेचे आहे, यासाठी कार्यशाळा, मेळावे आदींचे आयोजन करावे. कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक दिव्यांग व्यक्तीच्या अडीअडचणी जाणून घेऊन त्यांना सहकार्य करावे. या कार्यशाळेतून दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील नियमांच्या तरतुदी व नियमांची माहिती सविस्तर जाणून घ्या व समाजामध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी पुढाकार घेऊन कामे करा, असे त्यांनी सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण म्हणाले, समाजातील दिव्यांगांसाठी संवेदनशीलता ठेवून काम करणे गरजेचे आहे. दिव्यांगांना त्यांच्या हक्काच्या बाबी त्यांना मिळवून देण्यासाठी सहकार्य करा. शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे ?ड. श्री. सावरकर यांनी दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील दिव्यांगांच्या डिसॅबलिटीचे प्रकार, सर्टिफिकेट, तक्रार, शिक्षणामधील तरतूद, सामाजिक पुनर्वसन, कायद्याची अंमलबजावणी, शिक्षेची तरतूद आदींची सविस्तर माहिती दिली. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ यांनीही आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना, यूडीआयडी कार्ड मिळविण्याची पध्दत आदींची माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिभा भागवतकर यांनी केले व कार्यशाळा आयोजनाबाबतची भूमिका स्पष्ट केली. संचालन नितीन कठाणे यांनी केले तर उपस्थितांचे आभार किशोर थुल यांनी मानले.

## समृद्धी महामार्गवर होणार १५ पोलिस मदत केंद्र, गृह राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी घेतला आढावा

### तातडीने कार्यवाही करण्याचे दिले निर्देश,



**वर्धा जनमाध्यम** ; नागपूर-मुंबई समृद्धी शिघ्रगती मार्गावर वाढलेली वाहनांची संख्या, वाहन चालकांकडून होणारी नियमांची पायमल्ली व यातून दररोज होणा-या अपघातांना आळा घालण्यासाठी मार्गावर १५ ठिकाणी पोलिस मदत केंद्र उघडण्यात येणार आहे. या संदर्भातील कार्यवाहीचा राज्याचे गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी आढावा घेत संबंधितांना योग्य त्या सूचना केल्या.

विशेष पोलिस महानिरीक्षक नागपूर यांच्या कार्यालयात सोमवारी आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीला नागपूर विभागाचे विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड, सह व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या मुख्य अभियंता एन एस अन्सारी,सुरवशे, तरोडकर, मालखंडाले, पोलिस अधीक्षक महामार्ग वाहतूक पोलिसचे ठाणे, छत्रपती संभाजी महाराज नगर, नागपूर, कार्यकारी अभियंता सुरेश अभंग,अतिरिक्त पोलिस अधीक्षक यशवंतराव सोळंके,

प्रवीण साळुंके अप्पर पोलीस महासंचालक वाहतूक महाराष्ट्र राज्य मुंबई, सुनील भारद्वाज पोलीस अधीक्षक मुख्यालय अप्पर पोलीस महासंचालक कार्यालय वाहतूक मुंबई, यशवंत सोळंके पोलीस अधीक्षक महामार्ग नागपूर, रुपाली अंबुरे पोलीस अधीक्षक महामार्ग ठाणे, विक्रांत देशमुख पोलीस अधीक्षक महामार्ग पुणे, रुपाली दरेकर पोलीस अधीक्षक महामार्ग औरंगाबाद, संबंधित अधिकारी प्रत्यक्ष व आभासी पद्धतीने उपस्थित होते.

गृह राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी संबंधित अधिका-यांकडून संपूर्ण प्रकल्पाची माहिती जाणून घेतली. राज्यातील राष्ट्रीय व राज्य मार्गवर ६३ मदत केंद्र व १३ सहाय्यता केंद्र कार्यान्वित आहे. या केंद्रामार्फत वाहन चालकांना मदत व सहकार्य केल्या जाते. समृद्धी महामार्ग वाहनांची गती १२० किमी प्रती तास ठेवण्यात आली असली तरी चालक यापेक्षा अधिक वेगाने वाहने चालवितात.मात्र समृद्धी महामार्गसाठी स्वतंत्र मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने बेदकारपणे वाहन चालविणा-यांना आळा घालणे शक्य नसल्याने आता पोलिस मदत केंद्र स्थापित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.सध्यास्थितीत तात्पुरत्या स्वरूपात २७ अधिकारी व १४७ अंमलदार यांची नियमितपणे दैनदिन कर्तव्याकरिता नेमणूक करण्यात आली. परंतु मनुष्यबळ कमी असल्याने त्यांच्यावर प्रचंड ताण येत असल्याचे सांगण्यात आले.तथापि, वाहतूक नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी १५ पोलिस मदत केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**नगर परिषद कार्यालय, देवळी, जि.वर्धा (महाराष्ट्र)**

**क्रमांक - नपदे/निवडणूक/ /२०२५** **दिनांक /१०/२०२५**

नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ च्या अनुषंगाने नगर परिषदेचा निवडणुकीचा कार्यक्रम पार पाडण्याकरीता खालील निविदा धारकांकडून आमंत्रित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशील | निविदा फॉर्म रु. |
| --- | --- | --- |
| १. | निवडणूक विषयक स्टेशनरी, प्रिंटीग चे दरपत्रक सादर करणे बाबत | ५००/- |
| २. | मंडप डेकोरेशन, लाईटींग, लाऊडस्पिकर इत्यादीबाबत दर सादर करणेबाबत | ५००/- |
| ३. | व्हीडीओ शुटींग, फोटो, डी.वी.डी.सीडी (प्रति रोजप्रमाणे) इत्यादीसह दर सादर करणेबाबत | ५००/- |
| ४. | चार चाकी वाहन (सात शिटर डिझेल) दर सादर करणेबाबत (प्रति रोजप्रमाणे) | ५००/- |
| ५. | कार्यालयीन झेरॉक्स प्रती बाबत दर सादर करणे | ५००/- |
| ६. | सी.सी.टीव्ही भाडेतत्त्वावर घेणेबाबत दर सादर करणेबाबत | ५००/- |
| ७. | पाणी कॅन (आर.ओ.) दर सादर करणेबाबत | ५००/- |
| ८. | जेवण (प्रति ताट), नास्ता (प्रति प्लेट) नुसार दर सादर करणेबाबत | दरपत्रक लेटर हेडवर सादर करणे |

**टिप - निविदा फॉर्म विक्री दिनांक १४/१०/२०२५ ते २४/१०/२०२५ ला दुपारी ०३.०० वाजेपर्यत न.प.कार्यालयामध्ये सादर करण्यात यावी.**

स्वा/-
मुख्याधिकारी,
नगर परिषद, देवळी

## संक्षिप्त

### ईतवारी एक्स्प्रेसमध्ये सोन्याचे घबाड

**नागपूर :** ट्रेनमधून सोन्याचांदीच्या तस्करीचा डाव उधळून लावत दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या सुरक्षा दलाने साडेतीन कोटींचे सोन्याचांदीचे दागिने ताब्यात घेतले. ऐन दिवाळीच्या तोंडावर झालेल्या या कारवाईमुळे सोन्या-चांदीची



तस्करी करणा-यांमध्ये प्रचंड खळबळ निर्माण झाली आहे.दपूम रेल्वेच्या सुरक्षा दलाचे आयुक्त दीपचंद्र आर्य यांनी विशेष पथके नियुक्त करून प्रत्येक कोचची कसून तपासणी करण्याचे आदेश जारी केले होते. त्यानुसार, ट्रेन नंबर १२८५५ बिलासपूर इंटरसिटी एक्सप्रेसमध्ये आमगाव ते गोंदिया दरम्यान आरपीएफचे निरीक्षक कुलवंत सिंग, एन. पी. पांडे यांच्या नेतृत्वात एएसआय के. के. निकोडे तसेच सहकारी व्ही. के. कुशवाह यांनी तपासणी सुरू केली. कोच नंबर एस-०६ मध्ये त्यांना संशय आल्याने त्यांनी एका व्यक्तीची बॅग तपासली असता त्यांना सोन्याचांदीचे घबाडच हाती लागले.गोंदियातील गोल्ड सप्लायर नरेश पंजवानी (५५, रा.श्रीनगर बंबाभवनजवळ, गोंदिया) याच्या बॅगमध्ये चक्क ३.२७ कोटींचे सोने आणि साडेसात किलो चांदी सापडली. या संबंधाने संशयीत पंजवानी समाधानकारक माहिती देत नसल्याने आरपीएफच्या वरिष्ठांनी हे प्रकरण डीआरडीआयच्या (डायरेक्टोरेट ऑफ रेव्हेन्यू इंटेलिजन्स) अधिका-यांना कळविले. त्यांनी या प्रकरणाची चौकशी करून रविवारी गुन्हा दाखल केला. सोन्याची बिस्किटे, मंगळसूत्र, कडे आणि इतर दागिने(वजन- २ किलो, ६८३ ग्राम, किंमत ३ कोटी २७ लाख ३७ हजार ५०० रुपये) चांदीची नाणी, बिस्किटे, पैजन आणि इतर दागिने (वजन १ किलो, ४४० ग्राम- किंमत १० लाख ४७ हजार रुपये)

### सौदीत जाउन आदित्यनाथांबद्दल आक्षेपार्ह फोटो केला पोस्ट

■ अखेर तावडीत सापडलाच ■

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** उत्तर प्रदेशातील एक तरुण नोकरी करण्यासाठी सौदीमध्ये गेला. तिथे राहत असताना त्याने मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ



यांच्या फोटोसोबत छेडछाड केली. आक्षेपार्ह फोटो तयार करून तो सोशल मीडियावर पोस्ट केला. परदेशात असल्यामुळे त्याला याची काही जाणीव झाली नाही, पण इकडे उत्तर प्रदेशात त्याच्याविरोधात गुन्हा दाखल झाला. पोलीस त्याच्या मागावर होते, अखेर तो जाळ्यात अडकलाच. उत्तर प्रदेशातील मुजफ्फरपूरचा हा तरुण सौदी अरेबियामध्ये गेला होता. कुर्बान उर्फ अल्तमस असे तरुणाचे नाव असून, कुल्हाडी गावचा रहिवाशी आहे. सौदीमध्ये काम करत असताना त्याने मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा फोटो एडिट केला होता. तो फोटो त्याने सोशल मीडियावर पोस्ट केला होता. मुजफ्फरपूरमधील चरथावल पोलीस ठाण्यात त्याच्याविरोधात २८ सप्टेंबर रोजी तक्रार देण्यात आली होती. अल्तमसने सोशल मीडियावर पोस्ट केलेला फोटोही तक्रारीसोबत जोडण्यात आला होता. पोलिसांनी या प्रकरणी आरोपीविरोधात भारतीय न्याय संहितेतील कलम ३५३ (२) आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यातील कलमान्वये गुन्हा दाखल केला. आरोपी अल्तमस हा रविवारी सौदीवरून भारतात आला. गावी पोहोचताच पोलीस त्याच्या घरी पोहोचले. त्याला पोलिसांनी अटक केली. पोलिसांनी अटक करताच आरोपी गयावया करू लागला. माफी मागू लागला. पोलिसांनी त्याला न्यायालयासमोर हजर केले असता. न्यायालयाने त्याला कोठडी सुनावली.

### नांदेड जिल्ह्यात भूकंपाचे सौम्य धक्के


**नांदेड :** काल दि. १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ११:००, दुपारी ३:००, सायंकाळी ५:०० व रात्री ९:०० वाजता नायगाव तालुक्यातील टाकळी (बु) या गावात भूगर्भातून आवाज येउन जमीन हादरली असल्याची माहिती ग्रामस्थांनी



प्रशासनाला दिली होती. त्यानुसार राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राच्या संकेतस्थळावर तपासले असता या आवाजाची/ धक्क्याची कुठलीही नोंद झाली नसल्याचे आढळून आले. तरीही अजून सूक्ष्म अभ्यास करण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील अर्थ सायन्स विभागाचे प्राध्यापक टी. विजयकुमार यांना देखील माहिती घेण्यास सांगितले होते. त्यानुसार आज दि. १३ ऑक्टोबर रोजी विजयकुमार यांनी माहिती घेतली असता स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील अर्थ सायन्स विभागात सदर धक्क्यांपैकी दि. १२ ऑक्टोबर रोजी दुपारी ३.५७ व सायंकाळी ८.५८. या दोन धक्क्यांची नोंद झाली असून या धक्क्यांची तीव्रता रिश्टर स्केलवर अनुक्रमे १.९ व २.३ एवढी नोंदविण्यात आली असून याचा केंद्रबिंदू खैरगांव गावाच्या आसपास असल्याचे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अर्थ सायन्स विभागाचे प्राध्यापक टी. विजयकुमार यांनी जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रास कळविले आहे.
सदर धक्का हा अतिसौम्य प्रकारचा आहे व अशा पद्धतीचे कंपन हे अतिवृष्टीमुळे

### भाजप आमदार संदीप जोशींवर गोळीबार; दोन प्राध्यापकांची चौकशी

**नागपूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्ती माजी महापौर आणि आमदार संदीप जोशी यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला. संदीप जोशी यांच्या गाडीवर बाईकस्वार हल्लेखोरांनी तीन गोळ्या झाडल्या.सुदैवाने जोशी आणि त्यांचं कुटुंब या हल्ल्यातून सुखरुप बचावले. माजी महापौर आणि विद्यमान आमदार संदीप जोशी



यांचेवर १८ डिसेंबर २०१९ रोजी झालेल्या गोळीबार प्रकरणी शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्था नागपूरमधील सहाय्यक प्राध्यापक आशिष बढिये व निती कपूर या दोघांनी नियमानुसार संचालकाची परवानगी न घेता गुन्हा स्थळाला भेट दिली होती.अतिसंवेदनशील प्रकरणात यांच्यामुळे अडचण निर्माण झाली. शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्थेमधील प्राध्यापकांना प्रात्यक्षिक ज्ञान नसल्यामुळे फक्त पुस्तकी ज्ञानावर गुन्हास्थळावरून मुद्देमाल गोळा करता येत नाही. तसेच आशिष बढिये व निती कपूर यांनी प्रत्यक्ष प्रयोगशाळेत काम केलेले नाही. त्यांचे शिक्षण क्षेत्राचे अनुभव हे गुन्हास्थळातील भेटीकरिता नाही, असे असतानाही या दोघांनी गुन्हास्थळाचा भेट दिली, असा आरोप करण्यात आला आहे.याशिवाय अन्य आरोपही करण्यात आले असून या प्रकरणाची त्रिस्तरीय समिती चौकशी करणार आहेत. यांच्याविरोधात विभागीय चौकशीसाठी उच्च शिक्षण सहसंचालक संतोष चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली त्रिस्तरीय समिती नेमण्यात आली आहे. त्यांनी कर्तव्यात कसूर करून शासनाची प्रतिमा मलिन केल्याची तक्रार करण्यात आली होती. तक्रारीनुसार, आशिष बढिये व निती कपूर यांनी प्रत्यक्ष प्रयोगशाळेत काम केलेले नसून त्यांचे शिक्षण क्षेत्राचे अनुभव हे गुन्हास्थळातील भेटीकरिता नाही कारण प्रयोगशाळेतील तज्ञ अधिकारी यांना सुद्धा संबंधित विभागातील पूर्ण अनुभव येण्याकरिता कमीत कमी ६ ते ७ वर्षे लागतात. आशिष बढिये व निती कपूर यांनी शासनाची परवानगी न घेता भारताबाहेर परिषदेस उपस्थित राहतात. दोघ्यांच्या पासपोर्ट तपासणी करण्यात यावी. शासनाची परवानगी न घेता दोघांनी पीएच.डी. पूर्ण केली आहे. कार्यालय प्रमुखाची परवानगी न घेता २९ व ३०.०१.२०२४ रोजी किरकोळ रजा टाकून दिनांक २७.०१.२०२४ ते ३०.०१.२०२४ रोजी मुख्यालय सोडून त्रिपुरा येथील एनएफएस च्या परिषदेस उपस्थित राहिले होते. संस्थेतील आयक्यूएसी समन्वयक या पदाचा कार्यभार असताना जाणीवपूर्वक संस्थेचा निकषांमधील रिसर्च संबधित अतिमहत्तवाचा डेटा कार्यभार हस्तांतरण करण्यापूर्वी डीलीट करण्यात आलेला आहे,

# एकत्र लढण्याबाबत आठवडाभरात महाविकास आघाडीचा निर्णय



## शरद पवार भाकरी फिरवण्याच्या विचारात?

## 50 टक्के तिकिटे राजकीय पार्श्वभूमी नसणा-या युवकांना

**मुंबई/प्रतिनिधी:** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्रित लढवण्याबाबत महाविकास आघाडीचे नेते एकत्र बसून निर्णय घेतील. उद्या आघाडीच्या नेत्यांची बैठक होईल आणि येत्या आठवडाभरात स्थानिक पातळीवरील आघाडीबाबत धोरण ठरवले जाईल असे राष्ट्रवादी काँग्रेसचे (श.प.) अध्यक्ष शरद पवार यांनी आज पक्षाच्या बैठकीत बोलताना स्पष्ट केले. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या तरुणान ५० टक्के तिकिटे दिली जातील असे सुतोवाच करताना, पक्षबांधणीसाठी भाकरी फिरवण्याचे संकेत शरद पवारांनी दिले.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि पदवीधर व शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची एक बैठक मुंबईत झाली. बैठकीला पक्षाच्या कार्याध्यक्षा खा. सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, विधीमंडळ पक्षनेते जयंत पाटील, राजेश टोपे, बाळासाहेब पाटील, रोहित पवार, ड?. अमोल कोल्हे, खा. निलेश लंके, यांच्यासह पक्षाचे सर्व खासदार, आमदार व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आणि पदवीधर व शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीच्या दृष्टीने संघटनात्मक बांधणीसाठी आणि पुढील रणनीती ठरवण्याबाबत चर्चा झाली. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्थानिक पातळीवर आघाडी करावी की नाही याबाबत स्थानिक खासदार, आमदार व पदाधिका-यांची मते जाणून घेण्यात आली. उद्या महाविकास आघाडीचे नेते मतदारयादीतील गोंधळाबाबत राज्य निवडणूक अधिका-यांची भेट घेणार आहेत.मनसे प्रमुख राज ठाकरे हे ही या शिष्टमंडळात असणार आहेत. त्या भेटीनंतर आघाडीच्या नेत्यांची बैठक होणार असून त्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत प्राथमिक चर्चा होईल व धोरणात्मक निर्णय घेतला जाईल. एकत्र लढायचे की नाही, याबाबत निर्णय झाल्यानंतर जिल्हानिहाय, महापालिका निहाय बैठका घेण्याचे आज निश्चित करण्यात आले. प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना आघाडीतील पक्षांमध्ये मतविभागणी होउ नाय यासाठी एकत्र लढण्याची आमची भूमिका असल्याचे स्पष्ट केले. मनसेच्या आघाडीतील सहभागाबाबत अद्याप कोणतीही चर्चा झाली नसल्याचे त्यांनी सांगितले.

**तरुणांना संधी-** शरद पवार यांनी बैठकीत मार्गदर्शन करताना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या पण पक्षासाठी परिश्रम घेणा-या युवकांना ५० टक्के तिकिटे दिली जावीत, अशा सूचना पदाधिका-यांना दिल्या. संग्राम जगताप यांच्यासंदर्भात निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर पवार यांनी पदाधिका-यांना, नेत्यांना जातीय सलोखा ठेवण्याच्या सूचना दिल्या. सरकारमधील काही नेते व मंत्रीच सध्या वादग्रस्त बोलत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

**तोकड्या मदतीवर टीका-** महायुतीने पूरग्रस्त शेतक-यांना केलेल्या मदतीवर शरद पवार यांनी टीका केली. अतिवृष्टीच्या संदर्भात राज्य सरकार जी मदत करत आहे ती तटपुंजी आहे. केंद्रीय पथकाने येउन पाहणी केली पाहिजे होती. पूर्वी केंद्रीय पथक येउन पाहणी करून भरघोस मदत देत असे याचीही आठवण त्यांनी दिली.

# मुंबईसह इतर महापालिका स्वबळावर लढवाव्यात



■ काँग्रेसच्या बैठकीत बहुसंख्य पदाधिका-यांचा सूर
■ मनसेला सोबत घेण्याचा कोणताही प्रस्ताव नाही
■ रमेश चेन्नीथला यांची स्पष्टोक्ती

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महापालिकेसह राज्यातील इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आघाडी म्हणून लढवण्याची इच्छा काही नेत्यांनी दर्शवली असली तरी, काँग्रेसमध्ये मात्र कार्यकर्त्यांकडून स्वबळाचा आग्रह धरला जात आहे. मुंबई महापालिका तसेच महाराष्ट्रात इतर ठिकाणीही स्वबळावर लढावे अशीच काँग्रेसच्या स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांची भावना असल्याचे काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनीही स्पष्ट केले.मनसेला सोबत घेण्याची कोणतीही चर्चा अद्याप काँग्रेससोबत झालेली नाही. तसा कोणताही प्रस्ताव आमच्यासमोर सध्या तरी चर्चेला नाही. महाविकास आघाडीत सध्या तरी काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट हेच तीन महत्वाचे पक्ष असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणनिती ठरविण्यासाठी काँग्रेसच्या प?लिटिकल अफेअर्स कमिटीची बैठक सोमवारी पार पडली. प्रदेश प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, मुंबई अध्यक्ष वर्षा गायकवाड, विधिमंडळ पक्ष नेते विजय वडेट्टीवार, पक्षाचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे, बाळासाहेब थोरात, नाना पटोले, माणिकराव ठाकरे आदी प्रमुख नेते यावेळी उपस्थित होते. या बैठकीनंतर आयोजित पत्रकारपरिषदेत रमेश चेन्नीथला यांनी माहिती दिली.



स्थानिक पातळीवर राजकीयदृष्ट्या वेगवेगळी परिस्थिती असते. त्यामुळे मुंबई तसेच इतर महापालिका निवडणुका या स्वबळावरच लढाव्यात अशी इच्छा काँग्रेसच्या स्थानिक कार्यकर्ता तसेच पदाधिका-यांनी व्यक्त केली आहे. आजच्या सर्व बैठकातही तसाच सूर होता. अर्थातच याबाबत अंतिम निर्णय झालेला नाही. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आघाडीबाबत स्थानिक पातळीवरील नेतेच निर्णय घेतील असे चेन्नीथला यांनी स्पष्ट केले.

**मनसेबाबत अद्याप कोणतीही चर्चा नाही-** राज ठाकरे यांच्याबद्दल विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना चेन्नीथला म्हणाले की, मनसेसंदर्भात काँग्रेस पक्षात कोणताही चर्चा झालेली नाही. मित्रपक्षांशीही यासंदर्भात कोणतीही चर्चा झालेली नाही. त्यामुळे मनसेला सोबत घेण्याचा कोणताही मुद्दा सध्या तरी नाही. भविष्यात काय होईल हे सांगायला मी ज्योतिषी नाही. पण मनसेबाबत आज तरी काही विषय नाही असे चेन्नीथला म्हणाले.

**निवडणूक आयोगाला शिष्टमंडळ भेटणार-** मतदारयाद्यांतील घोळ, व्होट चोरी हे मुद्दे आमचे नेते राहुल गांधी यांनी उपस्थित केले आहेत. याबाबत सर्वपक्षीय शिष्टमंडळ मंगळवारी निवडणूक आयोगाची भेट घेणार आहे. शरद पवार, उद्धव ठाकरे, बाळासाहेब थोरात, वर्षा गायकवाड आदी नेते यावेळी असतील. मनसे असेल का याची माहिती मला नाही असे चेन्नीथला म्हणाले.

# राज ठाकरे काँग्रेसला सोबत घेण्यास अनुकूल

● खा.राऊतांचा ऊतावळेपणा ●काँग्रेस-मनसेची नाराजी

**मुंबई/प्रतिनिधी :** महापालिका निवडणुकीत एकत्र येण्याबाबत ठाकरे बंधूंमध्ये एकवाक्यता दिसत असली तरी मनसेला महाविकास आघाडीत असणार की नाही याबाबत अजूनही स्पष्टता नसताना खा. संजय राउत यांनी आज स्वत: राज ठाकरे हे महाविकास आघाडीतील एक मोठा घटक असलेल्या काँग्रेसला सोबत घेण्यास अनुकूल असल्याचे वक्तव्य केल्याने काही काळ गोंधळ उडाला होता. राउत यांच्या वक्तव्याबाबत मनसेने तीव्र नाराजी व्यक्त केली. तर काँग्रेसनेही अजून याबाबत कोणतीही चर्चा झाली नसल्याचे स्पष्ट केले. ठाकरे बंधूंना एकत्र आणण्यासाठी पुढाकार घेणा-या संजय राउत यांनी आता मनसेला महाविकास आघाडीत घेण्यासाठी पुढाकार घेतला आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी नुकतेच आघाडीला नव्या भिडूची गरज नसल्याचे वक्तव्य केले होते. मनसेनेही यावर तिखट प्रतिक्रिया दिली होती. यामुळे मनसे आघाडीचा भाग होणार की नाही याबाबत अजून संभ्रम आहे. या पार्श्वभूमीवर



खा. संजय राउत यांनी महाविकास आघाडीतील घटक असलेल्या काँग्रेस सोबत जाण्याबाबत स्वत: राज ठाकरे यांनीच अनुकूलता दाखवली असल्याची ब्रेकिंग न्यूज पत्रकारांना दिली.काँग्रेसला सुद्धा सोबत घेणे गरजेचे आहे. ही त्यांची एक भूमिका आहे. मात्र, याचा अर्थ तो निर्णय नाही. या राज्यात प्रत्येकाचे एक स्थान आहे. जसे शिवसेनेचे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे, शरद पवार साहेबांचे, डाव्या पक्षांचे तसेच काँग्रेस सुद्धा महाराष्ट्रातला एक महत्त्वाचा पक्ष आहे. ही सर्वांचीच भूमिका असून राज ठाकरेंची सुद्धा तीच भूमिका आहे असे राउत म्हणाले. मनसेने याबद्दल नाराजी व्यक्त केल्यानंतर संजय राउत यांनी राज ठाकरे यांना वैयक्तिक मेसेजद्वारे आपल्या वक्तव्याचा तो अर्थ नव्हता असे स्पष्टीकरण दिल्याचे कळते. काँग्रेस प्रवक्ते सचिन सावंत यांनीही काँग्रेसचा अजून कोणताही निर्णय झालेला नसल्याचे स्पष्ट केले. दोन्ही पक्षातून आलेल्या प्रतिक्रिया बघता संजय राउत यांनी केलेली घाई दोघांनाही रचलेली दिसत नव्हती.

## महिला अधिका-याची 'हवाला' डील फसली!

# पोलीसांनीच हडपले दीड कोटी; 10 जण निलंबित

**सिवनी (मध्यप्रदेश)/वृत्तसंस्था-** मध्य प्रदेशात पोलिसांच्या एका मोठ्या गैरकारभाराची धक्कादायक घटना समोर आली आहे. सिवनी जिल्ह्यात हवाल्याचे पैसे जप्त केल्यावर, पोलिसांनीच त्यातील मोठा हिस्सा आपसात वाटून घेतला. गाडीत सापडलेल्या एकूण २.९६ कोटी रुपयांच्या रकमेपैकी सुमारे १.४५ कोटी रुपये गायब झाले. या



चोरीच्या आणि गैरव्यवहाराच्या आरोपाखाली पूजा पांडे या वरिष्ठ महिला अधिका-यासह एकूण १० पोलीस कर्मचा-यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली. पोलीस अधिकारी पूजा पांडे यांना एका गुप्त बातमीदाराने सांगितले की, एका क्रेटा कारमधून कटनीहून महाराष्ट्रातील नागपूरकडे ३ कोटी रुपये नेले जाणार आहेत. या माहितीनुसार, पूजा पांडे आणि त्यांच्या टीमने हायवेवर ती कार थांबवली आणि कारमधील सर्व पैसे पोलिसांच्या गाडीत भरले. पूजा पांडे यांच्या नेतृत्वाखाली एनएच-४४ वर वाहन तपासणी सुरू होती. ही गाडी कटनीहून नागपूरला जात होती. रात्री १ ते २ वाजण्याच्या दरम्यान पोलिसांनी महाराष्ट्र नोंदणी क्रमांक असलेल्या या कारला थांबण्याचा इशारा केला, पण ती थांबली नाही. त्यानंतर पोलिसांनी त्या वाहनाचा पाठलाग केला. शेवटी, कार चालकाला सिलादेही परिसरात गाडी थांबवावी लागली.दुस-या दिवशी सकाळी हवाला व्यावसायिक सोहन परमार हा त्याच्या साथीदारांसह थेट पोलीस प्रमुख पूजा पांडे यांच्या ऑफिसमध्ये पोहोचला. सूत्रांनुसार, अनेक तास या दोघांमध्ये वाटाघाटी सुरू होत्या. अखेरीस, अर्धे पैसे तुम्ही ठेवा, अर्धे आम्हाला द्या असा सौदा झाला. पोलिसांनी १.५ कोटी रुपये स्वतःकडे ठेवले आणि बाकीचे पैसे व्यापा-याला परत दिले. मात्र, व्यापा-याला परत मिळालेल्या रकमेत २५ लाख ६० हजार रुपये कमी असल्याचे आढळले. यामुळे चिडलेल्या व्यापा-याने पोलीस स्टेशनमध्ये येउन गोंधळ घातला आणि पोलिसांनी केलेला गैरव्यवहार उघड झाला.

# आयएएस पत्नीचा पोलिसांना जोरदार दणका

## ॲट्रॉसिटी कायद्यातील 'ते' कलम घडविणार जन्माची अद्दल

**चंदिगड/वृत्तसंस्था-** हरियाणातील पोलिस महानिरीक्षक वाय. पूरन कुमार यांनी राहत्या घरी आत्महत्या केल्याने खळबळ उडाली आहे. सुसाईड नोटमध्ये त्यांनी अनेक वरिष्ठ अधिका-यांची नावे घेत त्यांच्यावर गंभीर आरोप केलेत. त्यानुसार त्यांच्या पत्नी आयएएस अमनीत यांनी दिलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी गुन्हे दाखल केले होते. पण अमनीत यांनी त्यावर आक्षेप घेत एक महत्वपूर्ण कलम वाढविण्याची मागणी केली होती. अखेर त्यांच्या मागणीनुसार पोलिस झुकले आहेत.अमनीत पी. कुमार या सध्या हरियाणामध्ये अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून कार्यरत आहेत. आत्महत्या केलेले वाय. पूरन कुमार हे त्यांचे पती होते. पूरन कुमार यांनी आत्महत्या केली. त्यावेळी अमनीत कुमार या मुख्यमंत्र्यांसोबत जपान दौ-यावर होत्या. पूरन यांनी त्यांना सुसाईड नोट आणि मृत्यूपत्र पाठविले होते. जपानहून परतताच अमनीत यांनी पतीला न्याय मिळवून देण्यासाठी पोस्टमार्टेमबाबत पहिला मोठा निर्णय घेतला. याबाबत त्यांनी मुख्यमंत्र्यांनाही पत्र लिहिले.



पूरन यांनी सुसाईड नोटमध्ये उल्लेख केलेल्या सर्व अधिका-यांवर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा म्हणजेच अस्ट्रोसिटी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्याची मागणी अमनीत यांनी मागणी केली. संबंधितांची पोलिसांत तक्रार केली होती. अमनीत यांच्या तक्रारीवरून डीजीपींसह १३ वरिष्ठ अधिका-यांवर गुन्हा दाखल करण्यात आला. पण त्यातील दोष त्यांनी दोन दिवसांपूर्वीच निर्दशनास आणून देत सुधारणा करण्याची पुन्हा मागणी केली होती. आरोपींवर अट्रोसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पण पोलिसांनी योग्य कलम लावले नसल्याची अमनीत यांची तक्रार आहे. एफआरआर मध्ये ॲस्ट्रॉसिटी कायद्यातील कलम ३(२)(व्ही) वाढविण्याची मागणी त्यांनी केली होती. ही मागणी चंदीगढ पोलिसांनी मान्य केली आहे.

ॲट्रॉसिटी कायद्यातील कलम ३(२)(५) महत्वाचे मानले जाते. अनुसूचित जाती, जमातीतील व्यक्तीसोबत त्याच्या जातीच्या आधारावर दिलेल्या त्रासामुळे संबंधित व्यक्तीला गंभीर स्वरुपाची दुखापत किंवा मृत्यू झाला असेल या कलमानुसार गुन्हा दाखल केला जातो. या कलमांतर्गत आजीवन कारावास आणि दंडाची तरतूद आहे. चंदीगढ पोलिसांनी आधी लावलेल्या कलमांतर्गत केवळ पाच वर्षांच्या शिक्षेची तरतूद होती. पण अमनीत यांच्या मागणीनंतर कलम वाढविण्यात आले.







# हमासने नेपाळी ओलिस बिपिन जोशीचा मृतदेह परत केला: 3 इस्त्रायली ओलिसांचे मृतदेहही सुपूर्द केले

न्यूयॉर्क/**वृत्तसंस्था**-हमासने सर्व २० इस्त्रायली बंधकांना सोडले आहे. त्यांना ७ आणि १३ अशा दोन तुकड्यांमध्ये सोडण्यात आले. हमासने त्यांना रेड क्रॉसच्या माध्यमातून इस्त्रायली सैन्याच्या स्वाधीन केले.हमासकडे आता जिवंत इस्त्रायली बंधक नाहीत. त्या बदल्यात इस्त्रायलने आज २५० पॅलेस्टिनी कैद्यांना सोडले.अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पंतप्रधान नेतन्याहू यांच्यासोबत इस्त्रायली संसदेत भाषण केले. नेतन्याहू यांनी ट्रम्प यांच्यासाठी पुढील वर्षीचा नोबेल शांतता पुरस्कार देण्याची मागणी केली.ट्रम्प म्हणाले की, आजचा दिवस अब्राहम, इसहाक आणि याकूबच्या देवाचे आभार मानण्याचा दिवस आहे. हा केवळ युद्धाचा अंत नाही, तर दहशतीचा अंत आहे. हा विश्वास आणि आशेची सुरुवात देखील दर्शवितो.इस्त्रायली सैन्याने सांगितले की रेड क्रॉस आज चार ओलिसांचे मृतदेह सोपवेल. यामध्ये इस्त्रायलचे गाय इलोझ, योसी शारिबी, डॅनियल पेरेस आणि नेपाळचे बिपिन जोशी यांचा समावेश आहे. लष्कराच्या म्हणण्यानुसार, सुरक्षेच्या कारणास्तव शवपेट्यांची देखील तपासणी केली जाईल. ओलिसांचे शवपेटी ओळख पटविण्यासाठी फॉरेन्सिक संस्थेत नेले जातील. अधिका-यांच्या मते, ओळख प्रक्रियेला दोन दिवस लागू शकतात. इजिप्तचे सरकारी वृत्तपत्र अल अहरामनुसार, गाझाच्या भविष्यावरील शांतता शिखर परिषदेसाठी कतार, जॉर्डन, पॅलेस्टिनी प्राधिकरण, फ्रान्स, जर्मनी आणि इंडोनेशियाचे नेते इजिप्तमधील शर्म अल-शेख येथे पोहोचले आहेत.इजिप्तचे अध्यक्ष अब्देल फताह अल-सिसी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे या शिखर परिषदेचे अध्यक्ष आहेत.



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## शांततेचा नोबेल

यंदा शांततेचा नोबेल पुरस्कार व्हेनेझुएलाच्या राजनैतिक नेत्या मारिया कोरोना मचाडो यांना जाहीर झाला आहे. मचाडो यांनी व्हेनेझुएलाच्या लोकांसाठी लोकशाही अधिकारांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि न्यायपूर्ण आणि शांततामय पद्धतीने हुकूमशाही प्रवृत्तींना विरोध करून त्यांना नेस्तनाबूत करण्यासाठी हा पुरस्कार देण्यात आला असे नोबेल समितीने म्हटले आहे. अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेकदा या पुरस्काराचे आपण मानकरी आहोत, असे सांगितले आहे. त्यांनी म्हटले होते, की भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्ध त्यांनी अनेकदा थांबवले आहे आणि त्यांनी असेही सांगितले होते, की सध्या रशिया आणि युक्रेन यांच्यातील संघर्ष थांबवण्यासाठीही आपण प्रयत्न केले आहेत. ट्रम्प यांना डावलून मचाडो यांना पुरस्कार जाहीर झाला. कारण अल्फ्रेड नोबेल यांच्या विचारसरणीनुसार पुरस्कार दिले जातात, असे पुरस्कर्त्यांनी म्हटले होते. त्यामुळे एक हुकूमशहा वृत्तीचे ट्रम्प यांच्यापुढे नोबेल पुरस्कार समिती झुकली नाही, याबद्दल तिचे अभिनंदन करावे लागेल. पण ज्या बातम्या येत आहेत त्यावरून मचाडो यांच्यावरही टीका होत आहे. निकोलस मादुरो सरकारविरोधात अनेक वर्षांपासून आवाज उठवत आहेत, पण मादुरो सरकारने त्यांना निवडणुका लढवण्यापासून वंचित केले होते. कारण २०२३ मध्ये झालेल्या निवडणुका निष्पक्ष नव्हत्या असा दाव केला. मारिआ मचाडो यांना व्हेनेझुएलातील लोकशाहीला प्रोत्साहन दिल्याबद्दल पुरस्कार देण्यात आला. असे असले, तरीही व्हेनेझुएलातील बऱ्याच नागरिकांना माहीत आहे, की मचाडो यांनी लोकशाहीच्या आविर्भावात निर्बंध, खासगीकरण आणि परकीय हस्तक्षेपाचे भलामण केले आहे. त्यामुळे त्यांना पुरस्कार जाहीर झाल्यावर व्हेनेझुएलात आंनदाची लाट उसळली नाही आणि म्हणावा तसा जल्लोष साजराझाला नाही. ट्रम्प हे तर हुकूमशाहा आहेतच पण मचाडो याही एकप्रकारे हुकूमशाहीच्याच पुरस्कर्त्या आहेत ही भावना व्हेनेझुएलाच्या नागरिकांमध्ये आजही कायम आहे. शांततेचा पुरस्कार मचाडो यांना देण्यात आला आहे, त्या मचाडो यांचे राजकारण हिंसाचाराने भरलेले आहे असे कित्येक बुद्धीजीवींचे मत आहे. मचाडो यांनी बेंजामिन नेतन्याहू यांना आवाहन केले होते, की व्हेनेझुएलाला मुक्त करण्यास मदत करावी. या पार्श्वभूमीवर त्यांना पुरस्कार देण्यात येतो ही देखील निश्चितच अस्वस्थ करणारी बातमी आहे. आतापर्यंत शांतता पुरस्कार मिळालेल्या कोणत्याही नेत्याविरोधात इतके मतप्रदर्शन कधी झाले नव्हते. मचाडो यांचा इतिहास असा आहे, की त्यांनी २००२ मध्ये लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या राष्ट्रपतींना उलथवून टाकण्यास मदत केली. संविधान नष्ट केले आणि प्रत्येक सार्वजनिक संस्था रातोरात नष्ट केली. अशा राजसत्तेला मचाडो यांनी पाठिंबा दिला असे बोलले जाते, असाही आरोप आहे. मचाडो यांनी अमेरिकन निर्बंधांची पाठराखण केली आणि त्यामुळे व्हेनेझुएलातील गरीब आणि अपंग आणि कामगार यांना आजही त्याची किंमत चुकवावी लागत आहे. इतके असूनही मारिओ मचाडो यांना पुरस्कार का देण्यात आला? तर व्हेनेझुएलातील हुकूमशाहीतून लोकशाहीकडे संक्रमण आणि तेही शांततापूर्ण मार्गाने करण्यात आल्याबद्दल जे कार्य केले त्यासाठी हा पुरस्कार देण्यात आला आहे. मचाडो यांनी तथाकथित व्हेनेझुएलातील कठपुतळी सरकार प्रस्थापित करण्यास मदत केली, असाही त्यांच्यावर आरोप आहे. जेरूसलेममध्ये मचाडो यांनी पुन्हा व्हेनेझुएलाचा दूतावासा सुरू करण्यासाठी पुन्हा प्रयत्न केले, असाही त्यांच्यावर आरोप आहे. मचाडो यांनी २०१४ मध्ये अशा निदर्शनांत सहभाग घेतला, की जी निदर्शने शांततापूर्ण नव्हती. मचाडो या लोकशाहीच्या पुरस्कर्त्या वाटत असल्या तरीही त्या फॅसिसम, झिओनिझम आणि नव उदारमतवाद यांचे प्रतीक मानल्या जातात असा त्यांच्यावर अनेकांचा आरोप आहे. या सर्व आरोपांच्या पार्श्वभूमीवर त्यांचा पुरस्कार तपासला गेला पाहिजे. अर्थात त्यांच्या कार्याचे मोल यामुळे कमी होत नाही, त्यांनी अत्यंत विपरित परिस्थितीत व्हेनेझुएलातील लोकशाही आणि तेथील लोकांच्या भावनांना जपत लोकशाही प्रस्थापित केली हे विसरून चालणार नाही. कारण व्हेनेझुएला हा देश खरेतर अत्यंत गरीब देश होता. पेट्रोलचे साठे सापडल्याने तो श्रीमंत झाला. त्यांनंतर तेथील लोकांना लोकशाही आणि आपली पूर्वीची गरिबी कशाचीच बूज वाटेनाशी झाली होती. निकोलस मादुरो यांचा हाच तो काळ. पण त्यानंतर व्हेनेझुएलाच्या नागरिकांना इतकी गरिबी आली, की लोकांना अन्नासाठीही वणवण करावे लागले. दोन्ही काळ देशाने पाहिले आहेत. त्या परिस्थितीत लोकशाहीच्या हक्कांसाठी लढणाऱ्या मचाडो यांना लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी ही जागतिक शांततेचा पुरस्कार देण्यात आला. मचाडो यांना पुरस्कार देण्यात आला, कारण त्यांनी लोकशाहीची ज्योत तेवत ठेवली आहे. हे नोबेल समितीचे भाष्य पुरेसे बोलके आहे. आल्फ्रेड नोबेल यांनी म्हटले होते, की शांतता पुरस्कार त्याच व्यक्तींना देण्यात येतो ज्यांनी देशांदेशांतील बंधुत्वासाठी सैन्याची कपात आणि शांतता परिषदांचे आयोजन करण्यात पुढाकार घेतो. या सर्व बांबींवर मचाडो या आघाडीवर आहेत आणि त्यांचे टीकाकार काहीही म्हणोत, पण मचाडो यांनी आज व्हेनेझुएलाचे नाव जागतिक शांतता पुरस्कारावर कोरले आहे. मचाडो यांचे विरोधक काहीही म्हणत असले तरीही नोबेल यांनी घालून दिलेल्या निकषांचे पालन करत असल्याने त्यांना पुरस्कार देण्यात आला हेच सत्य आहे. मचाडो या आयर्न लेडी म्हणून ओळखल्या जातात, त्यांनी मला धक्का बसला आहे अशी प्रतिक्रिया दिली. ५८ वर्षीय मचाडो या पारदर्शक लोकशाहीसाठी मोहीम राबवतात. त्यांच्या दृष्टीने वजाबाकीची बाजू म्हणजे त्या उदारमतवादी सुधारणाचे समर्थन करतात. त्यांचा लढा हा आयुष्यभर निकोलस मादुरोविरोधात राहिला आणि त्यांनी मादुरो राजवटीविरोधात लोकांना एकत्र आणण्यात पुढाकार घेतला. या दृष्टीने त्यांची तुलना ऑँगसान स्यू की यांच्याशी केली जाऊ शकते. मचाडो यांना मादुरो समर्थकांनी धमक्या दिल्या आहेत आणि त्यांचे जिणे हलाखीचे करून टाकले आहे. पण या संघर्षात त्यांनी लोकशाहीची ज्योत तेवत ठेवण्याचे काम केले आहे आणि हीच त्यांच्या पुरस्काराचे महत्त्व सांगणारी बाब आहे. सध्या त्या भूमिगत आहेत.

# राष्ट्रीय आपत्ती-शेतकऱ्यांची पराधीनता

देशा पुढील सर्वात महत्वाचा मुद्दा कोणता, असा प्रश्न विचारला तर तुम्ही काय उत्तर द्याल? कोणाला हिंदू-मुसलमानांचा प्रश्न महत्वाचा वाटेल. कोणाला ओबीसी, मराठा, पटेल, जाट, धनगर, बंजारा वा अन्य जातींचे आरक्षण महत्वाचे वाटेल. कोणाला सीमा सुरक्षेचा मुद्दा महत्वाचा वाटू शकतो. कोणाला गाजा-इस्त्रायल, रशिया-युक्रेन भारत-पाकिस्तान यांचे युद्ध महत्वाचे वाटेल, कोणाला पेट्रोल टंचाई तर कोणाला पाण्याचे संकट वाटेल, कोणी पर्यावरण प्रदूषणाने चिंतीत होईल, कोणाला संविधान संकटात आहे याची चिंता वाटेल. कोणी महिलांवरील अत्याचारांचा निषेध करेल. कोणाला बेरोजगारी तर कोणाला महागाई समस्या वाटेल. कोणी कोरोना संकटाने भयग्रस्त असेल तर कोणी लॉक-डाऊनने त्रस्त झाला असेल. कोणाला आरोग्याची चिंता तर कोणाला शिक्षणाचे प्रश्न अग्रक्रमाचे वाटतील पण फार थोडे लोक म्हणतील की, 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या' सर्वात महत्वाचा मुद्दा आहे.वर दिलेल्या यादीतील मुद्दे चुकीचे आहेत असे नाही. हे मुद्दे आहेतच. या शिवाय अनेक मुद्दे जोडले जाऊ शकतील. पण 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या' हा महत्वाचा मुद्दा नाही का? त्याकडे डोळे झाक का करायची? डब्यांची दुरुस्ती करायची मात्र इंजिन नादुरुस्त ठेवायचे अशातला हा प्रकार आहे.

### विक्राळ रूप

या देशात गेल्या कित्तेक वर्षात सुमारे चार-पाच लाख शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागली. जगातील कोणत्याही देशात एका व्यावसायातील एवढ्या लोकांनी आत्महत्या केलेली नाही. कोणत्याही महामारीत एवढे लोक सलगपणे दगावले नाहीत, कोणत्याही महायुद्धात एवढे सैनिक मारले गेल्याचे दिसत नाहीत. देशात दररोज चाळीस ते पन्नास व महाराष्ट्रात सहा ते आठ शेतकरी आत्महत्या करतात. शेतकरी आत्महत्यांचे हे विक्राळ रूप आपण डोळ्याआड कसे करू शकतो?

जगाचा गोल दोन हतावर तोलला आहे. एक हात स्त्रीचा आणि दुसरा शेतकऱ्यांचा आहे. जगातले सगळे शेतकरी नष्ट झाले तर खाणार काय? दगड वा लोखंड खाऊन पोट भारता येत नाही. अन्नच खावे लागते. अन्न पिकवतो शेतकरी. शेतकऱ्याशिवाय या जगाची कल्पना करता येत नाही. मानवी जीवनासाठी नितांत महत्वाचा घटक असलेला शेतकरी आपले जीव देतो आहे आपल्याला त्याचे दुख महत्वाचे वाटत नाही हा कोडगेपणा आहे की आत्मघात याचा विचार करायला हवा.

### शेतकरी आत्महत्या कधी सुरु झाल्या?

'शेतकऱ्यांच्या आत्महत्या १९९० मध्ये सुरू झाल्या' असा खोटा प्रचार अनेक नामवंत डावे-उजवे विचारवंत करतात. खुलीकरण, जागतिकीकरण यामुळे शेतकरी आत्महत्या करू लागले, हे सिद्ध करण्याचा त्यांचा केविलवाणा खटाटोप असतो. खोट्याचा प्रचार करण्यात हल्ली त्यांनी आघाडी मारली आहे. पण सत्य हे सत्य असते. ढगा आड सूर्य लपला म्हणजे सूर्य अस्त झाला असे कोणी समजू नये.शेतकऱ्यांच्या आत्महत्या आपल्या देशात सातत्याने होत आल्या आहेत. ९०च्या नंतर नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोने शेतकरी आत्महत्यांची स्वतंत्र नोंद सुरू केली. काही बालिश, बाळबोधांना वाटते की, तेंव्हा पासूनच शेतकरी आत्महत्या सुरू झाल्या. त्या पूर्वीही शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याच्या नोंदी सापडतात.

१९ मार्च १९८६ ला यवतमाळ जिल्ह्यातील चिलगव्हाण येथील साहेबराव करपे कुटुंबियांनी वर्ध्याच्या पावनार जवळील दत्तपूर येथे जाऊन सामूहिक आत्महत्या केली होती. (दरवर्षी १९ मार्चला किसानपुत्र उपवास करतात.) त्या वेळेस खुलीकरणाचा मागमूसही नव्हता. त्याही पूर्वीच्या आत्महत्यांचे संदर्भ खाली दिले आहेत.

आत्महत्यांचा जमिनीच्या आकाराशी असलेला संदर्भ देखील अभ्यासला गेला आहे, डाव्यांच्या माहितीसाठी खास बाब म्हणजे, बंगाल मध्ये झालेल्या आत्महत्यांचा संदर्भ यात नमुद करण्यात आला आहे!

Ganapathi and Venkoba Rao analyzed suicides in parts of Tamil Nadu in 1966. They recommended that the distribution of agricultural organophosphorus compounds be restricted.[25] Similarly, Nandi et al. in 1979 noted the role of freely available agricultural insecticides in suicides in rural West Bengal and suggested that their availability be regulated. [26] Hegde studied rural suicides in villages of northern Karnataka over 1962 to 1970 and stated the suicide incidence rate to be 5.7 per 100,000 population.[27] Reddy, in 1993, reviewed high rates of farmer suicides in Andhra Pradesh and its relationship to farming size and productivity.[28]

https://en.m.wikipedia.org/wiki/Farmers%27_suicides_in_India

### मूळ कारण

शेतकरी आत्महत्या ह्या एका व्यावसायातील लोकांच्या आहेत. इतर आत्महत्यांशी त्यांची तुलना करणे चुकीचे आहे. इतर आत्महत्यांमध्ये मानसिक कारण असू शकते किंवा एखाद्या शेतकऱ्यांने आत्महत्या केली असती तर आपण त्याची मानसिक कारणे शोधली असती पण लाखालाखाने होणाऱ्या आत्महत्या पाहाता, त्याला मानसिक कारण नसून वेगळे काही तरी आहे हे मान्य करावे लागेल. विशेषत: शेतकऱ्यांच्या परिस्थितीत त्याची कारणे शोधली पाहिजेत.



खरे तर मानसिक कारण शोधणाऱ्यांची मानसिकता तपासली पाहिजे. जो बळी जातो त्याला दोषी ठरविण्याची एक चालाख मानसिकता असते. अशी मानसिकता असणारे लोक बलत्कार झालेल्या मुलीलाच म्हणतात, ती तशीच आहे. ती तसे कपडे घालते. ती तिकडे का गेली? वगैरे. बलात्कार करणाऱ्याला ते दोष देत नाहीत. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या बाबतीत देखील अशाच प्रतिक्रिया येतात. दारू पितात, कुवती पेक्षा जास्त खर्च करतात, आदी. शब्द देखील चालाखीने 'आत्महत्या' वापरतात. आत्महत्या म्हणजे स्वत:च स्वत:ची हत्या करणे. जणू या हत्येला इतर कोणीच जबाबदार नाही. वास्तविक पाहता हे सरकार द्वारा कुनियोजीत केलेले खून आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना शेतकरी जबाबदार नसून सरकार जबाबदार आहे हे सांगण्याचे धाडस कोणी करत नाही.शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या मुळाशी व्यवस्थेची रचना कारणीभूत आहे. ही रचना जाणीवपूर्वक रचण्यात आली आहे. तिचा फारसा कोणी विचार करीत नाही. हा विचार केला तर शेतकरी आत्महत्यांचा मुद्दा लक्षात यायला लागतो.

### शेतकरी शब्दाची व्याख्या ?

शेतकरी या शब्दाची व्याख्या काय आहे? ढोबळमानाने जो शेती करतो त्याला शेतकरी म्हणतात. असे असेल तर कारखानदार कोणाला म्हणावे? जो कारखान्यात काम करतो त्याला कारखानदार म्हणावे लागेल. पण तसे म्हटले जात नाही. जो काम करतो त्याला कामगार म्हणतात. कारखान्याच्या मालकाला आपण कारखानदार म्हणतो. तो मशीनवर उभा राहून काम करीत नाही. मग शेतीच्या मालकाला आपण शेतकरी म्हणावे लागेल. ज्याच्याकडे सात-बारा आहे तो शेतकरी ही व्याख्या बरोबर आहे का? कोणताही मोठ्या पुढाऱ्याचे नाव डोळ्यासमोर आणा. त्याला आपण शेतकरी म्हणतो कि पुढारी? आमच्या भागात एका आर. टी. ओ. आहेत. त्यांच्याकडे जमिनीचा सातबारा आहे. पण आम्ही सगळे त्यांना आर.टी.ओ. म्हणूनच ओळखतो. नोकरी करणाऱ्या अनेकांकडे जमिनीचे सात-बारा आहेत. त्याना शेतकरी म्हणता येईल का?

मी केलेली शेतकरी या शब्दाची व्याख्या अशी आहे. ज्यांच्या उत्पन्नाचे मुख्य साधन शेती आहे, तो शेतकरी. तुम्ही प्रत्यक्ष शेती करा अथवा करू नका. तुमच्या नावे सात-बारा असो वा नसो, तुम्ही काय करता हे महत्वाचे नसून तुमचे उत्पन्नाचे मुख्य साधन जर शेती असेल तर तुम्ही शेतकरी आहात.

कोणी पुढाऱ्यांना शेतकरी समजतो, कोणी नोकरदारांना समजतो, म्हणून गैरसमज होतो. म्हणून ज्या शेतकऱ्यांचे खरे प्रश्न आहेत त्यांची उपेक्षा होते.

भारतात ८५ टक्के शेतकऱ्यांचे धारणक्षेत्र (होल्डिंग) केवळ दोन एकर राहिले आहे. ही आकडेवारी २०११ची आहे. आज ती त्याही पेक्षा कमी झाली असणार. खिशात भांडवल म्हणून दमडी नसणाऱ्या व दोन एकर क्षेत्र असणाऱ्या शेतकऱ्याने कोणते पीक घेतले म्हणजे त्याचे निव्वळ वार्षिक उत्पन्न सव्वा दोन लाख रुपये होईल? सव्वा दोन लाख रुपये हा आकडा सरकारी कर्मचाऱ्यांच्या सातव्या वेतन आयोगाने ठरवला आहे. चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याचे वेतन ठरवताना 'माणसा सारखे जगण्यास' आज किती पैसे लागतात, याचा हिशोब घालून हा आकडा काढण्यात आला होता. दोन एकर कोरडवाहू शेती करून पहा, मग लक्षात येईल की, कितीही पिकले आणि कितीही भाव मिळाला तरी दोन एकर शेतीत कोरडवाहू शेतकऱ्याला आपल्या कुटुंबाचा खर्च भागविणे केवळ अशक्य आहे. शेतकरी आत्महत्या का करीत आहेत हेही लक्षात येईल. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यात ९५ टक्के शेतकरी असेच आहेत की, त्याना उत्पन्नाचे दुसरे साधन नाही व त्यांचे होल्डिंग दोन एकरच्या आसपास आहे.

### शेतकऱ्यांचे जीव घेणारे कायदे

भांडवल नाही, दुसरा उद्योग करण्याचा पर्याय नाही. जमिनीचे क्षेत्र अत्यल्प असे शेतकरी मोठ्या प्रमाणात आत्महत्या करतात, हे वास्तव आहे. पण या कडेलोटापर्यंत हे शेतकरी आले कसे? हेही समजावून घेतले पाहिजे.

परिशिष्ट-९-१५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला. २६ जानेवारी १९५० रोजी घटना लागू झाली आणि १८ जून १९५१ रोजी पहिली घटनादुरुस्ती (बिघाड) करण्यात आली. घटना लागू झाल्यानंतर लगेच दीड वर्षात दुरुरुस्ती करण्यात आली. समोर सहा महिन्यावर निवडणुका येऊन ठेपल्या होत्या. वर्तमान संसद हंगामी सरकार म्हणून काम करीत होती. अजून राज्यसभा अस्तित्वात आलेली नव्हती तरी घाई-घाईने घटना दुरुस्ती केली गेली. या घटना दुरुस्तीत अनेक गोष्टी होत्या. त्या बद्दल मला काही म्हणायचे नाही पण या दुरुस्तीने घटनेच्या अनुच्छेद ३१ ए व बी मध्ये दुरुस्ती करण्यात आली. घटनेत नसलेले परिशिष्ट-९ निर्माण करण्यात आले. या दुरुस्ती नुसार असे ठरले की, परिशिष्ट-९ मध्ये सरकार जे कायदे टाकील, त्या विरुद्ध न्यायालयात दाद मागता येणार नाही. या कायद्याचे बिल मांडताना तत्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी, ही व्यवस्था केवळ पहिल्या १३ कायद्यांसाठी राहील असे संसदेत स्पष्ट केले होते परंतु त्यांच्या हयातीत (कार्यकाळात) म्हणजे १९६४ पर्यंत या परिशिष्टात ६० कायदे टाकण्यात आले होते. त्यानंतरच्या पंतप्रधानांनी सपाटाच लावला. आज घडीला परिशिष्ट-९ मध्ये २८४ कायदे आहेत. त्यापैकी सुमारे २५० कायदे केवळ शेतीशी संबंधित आहेत. याला योगायोग म्हणता येणार नाही. शेतकऱ्यांना न्यायालयात जाण्यास बंदी करणारी ही तरतूद शेतकऱ्यांच्या जीवावर बेतली.

**सीलिंग कायदा-** १९६० मध्ये सीलिंग कायदा आला. शेतकऱ्यांच्या मालमत्तेवर सरकारचे नियंत्रण लागू करणारा हा कायदा आहे. कारखानदाराने किती मालमत्ता बाळगावी, यावर कोणतेच बंधन नाही पण शेतकऱ्यांना मात्र ५४ एकर, २८ एकर व ८ एकरची मर्यादा, असा हा पक्षपात करणारा कायदा. या कायद्याने संविधानाच्या मुलभूत अधिकारांवर अतिक्रमण केले आहे. पण हा कायदा परिशिष्ट-९ मध्ये टाकल्यामुळे तो लागू राहिला. या कायद्यामुळे शेतकऱ्यांच्या कंपन्या झाल्या नाहीत. जागाती प्रगत देशात शेतकऱ्यांच्या कंपन्या शेती करतात. आपण जागतिक स्पर्धेला तोंड देऊ शकत नाही. आपया देशात जमिनीचे विखंडन होत गेले व आज शेतकरी दोन एकर पर्यंत खाली पोचले. येत्या एक दोन पिढ्यांनी पुढे काय होईल हे सांगता येत नाही.

**आवश्यक वस्तू कायदा-** व्यवसायाचे स्वातंत्र्य या मुलभूत अधिकारांचे उल्लंघन करणारा आवश्यक वस्तू कायदा. हा कायदा अध्यादेशाच्या स्वरूपात दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्रजांनी लागू केला होता. इंग्रज निघून गेले पण त्यांनी केलेला अध्यादेश कायम राहिला. पुढे त्याचे १९५५ साली कायद्यात रुपांतर करण्यात आले. १९७६ साली इंदिरा गांधी प्रधानमंत्री असताना हा कायदा परिशिष्ट-९ मध्ये टाकण्यात आला. या कायद्यात आवश्यक वस्तूची व्याख्या केलेली नाही. सरकार ठरवेल ती वस्तू आवश्यक वस्तू मानली जाईल असे या कायद्यात नमूद केले आहे. आज घडीला सुमारे दोन हजार वस्तू 'आवश्यक वस्तू' म्हणून नोंदविल्या गेल्या आहेत. या कायद्याने सरकारला भयंकर अधिकार दिले आहेत. सरकार कोणत्याही वस्तूचे उत्पादन, वाहतूक, साठवणूक, एवढेच नव्हे तर किमत नियंत्रित करू शकते. बाजार स्वातंत्र्यावरील या निर्बंधांचा सर्वाधिक वाईट परिणाम शेतकऱ्यांवर झाला. सरकारला शेतीमालाचे भाव सातात्याने पाडता आले. त्यामुळे शेतकरी देशोधडीला लागला. त्याच्याकडे बचत शिल्लक राहिली नाही. त्याला कोणत्याच संकटाला तोंड देण्याचे बळ राहिले नाही. या कायद्यांमुळे ग्रामीण औद्योगिकीकरणाला खीळ बसली. शेतकऱ्यांना मूल्यवृद्धीचा लाभ मिळू शकला नाही. किसानपुत्रांना रोजगार मिळू शकला नाही. हा कायदा लायसन्स, परमीट, कोटा राज निर्माण करणारा असल्यामुळे तो प्रशासकीय भ्रष्टाचाराची जननी मानला जातो. या कायद्याने शेतकऱ्यांचे आतोनात नुकसान केलेच आहे शिवाय देशात भ्रष्टाचार पोसण्याचे कामही याच कायद्याने केले आहे. आज जी बिघडलेली राजकीय संस्कृती दिसते त्याच्या मुलाशी हाच कायदा आहे.

**जमीन अधिग्रहण कायदा-** हा कायदा म्हणजे लटकती तलवार. या कायद्याचा वापर करून सरकारने शेतकऱ्यांची लाखो एकर जमीन काढून घेऊन ती खाजगी कारखानदार व संस्थांना दिली. त्यात कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला. मालमत्तेचा मुलभूत अधिकार त्यामुळे बाधित झाला आहे.

वरील तीनही कायद्यांनी एक व्यवस्था निर्माण केली. त्यात शेतकऱ्यांना अडकवले. म्हणून त्याना आत्महत्या कराव्या लागत आहेत.

शेतकऱ्यांचा प्रश्न गरिबीचा नाही. तो गुलामीचा आहे. शेतकऱ्यांना गुलाम केल्याने शेतकऱ्यांची दुर्दशा झाली, त्याही पेक्षा त्याचे दुष्परिणाम देशाला भोगावे लागले. विविध क्षेत्रात आलेली विकृती या कायद्याचा परिणाम आहे हे जाणून घेतले पाहिजे. दारिद्र्य नसेल तर अस्मिता टोकदार होतात. त्यामुळे जाती आणि धर्माच्या मुद्द्यांना महत्व येते. निवडणुकीत पैश्याला महत्व येते. त्यामुळे राजकारणात गुंडागर्दी निर्माण होते. शेतकऱ्यांना गुलाम केल्यानेच शिक्षण, आरोग्य यंत्रणा कुचकामी झाल्या आहेत याचा ज्या दिवशी उलगडा होईल तेंव्हा शेतकरी आत्महत्यांचा मुद्दा कळीचा वाटायला लागेल. शेतकरी हा या व्यवस्थेच्या रेल्वेचा डबा नसून तो इंजिन आहे म्हणून शेतकरी आत्महत्यांवर तांतडीने विचार होणे गरजेचे आहे. शेतकरी आत्महत्या हा केवळ शेतकऱ्यांचा प्रश्न नसून ही एक राष्ट्रीय आपत्ती आहे.

**अमर हबीब,**
किसानपुत्र आंदोलन
आंबाजोगाई
मो.८४११९०९९०९

## सोन्याचे दर गगनाला

गेल्या काही दिवसांपासून सोन्याचा भाव सातत्याने वाढत असून मुंबईत १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याची किंमत १ लाख २६ हजार २७० रुपयांवर जाऊन पोहोचली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात रुपयाचे घसरते मूल्य, जागतिक आर्थिक अस्थिरता, वाढते आयात शुल्क आणि मध्यवर्ती बँकांकडून होणारी खरेदी यामुळे सोन्याचे दर सातत्याने वाढत आहेत. आंतरराष्ट्रीय सोने बाजारात सतत सोन्याच्या किमतीत चढ-उतार होत असल्याने याचे थेट परिणाम भारतीय सुवर्ण बाजारात होत असल्याचे सांगण्यात येत आहे. एकीकडे सध्या सणासुदीचे दिवस सुरु असतानाच सोन्याचे दर सव्वा लाखाच्या पार गेल्यामुळे सोन्याचे दागिने खरेदी करणाऱ्यांचा खिशाला मोठी चाट बसत आहे. सततच्या भाववाढीमुळे सोने खरेदी करणाऱ्यांपुढे मोठे प्रश्न निर्माण झाले आहेत. पुरातन काळापासून भारतीय महिलांना सोन्याचे प्रचंड आकर्षण आहे. सोन्याचे अलंकार परिधान केल्याने स्त्री सौंदर्याला उठाव येतो. त्यामुळे सोन्याचे दागिने महाग असले तरी अर्धा ग्रॅम का होईना ते खरेदी केले जातातच. त्यात गरीब ीमंत असा भेद नसतो. मात्र सध्याच्या परिस्थितीत सोने खरेदीचा कितीही हव्यास असला तरी सततच्या भाववाढीमुळे त्यावर मर्यादा आल्या आहेत.

**प्रदीप मोरे**

## यम सदनाचा मार्ग भ्रष्टाचार

नुकतेच राजस्थान आणि मध्यप्रदेश येथे कफ सिरप या सर्दी खोकल्यासाठी च्या औषधामुळे अकरा लहान मुलांचा मृत्यू झाला. केंद्र सरकारने दोन वर्षांखालील मुलांना कफ सिरप देण्यासाठी सध्या बंदी घातली आहे. पोलिसांनी संबंधित कफ सिरपच्या आस्थापनाच्या विरुद्ध गुन्हा नोंदवून अटक सत्र सुरू केले आहे. विषारी कफ सिरप घेतल्यामुळे ११ निष्पाप जणांना आपले प्राण गमवावे लागले. त्या ११ जणांच्या कुटुंबाचे भविष्य नष्ट केले गेले याची जाण त्या आस्थापनाला नव्हती का?जागतिक स्तरावर वीस टक्के जेनेरिक औषधे आणि ६० टक्के लसीची मागणी भारत पूर्ण करतो. काही महिन्यापूर्वी आफ्रिका खंडातील गांबीया या देशात भारतीय आस्थापनाच्या कफ सिरपमुळे ७०, कॅमरून मध्ये सहा आणि उजिबेकिस्तान मध्ये १८ मुलांचा मृत्यू झाला त्यामुळे जगभरात भारतीय औषध निर्मिती आस्थापनांकडे संशयाने पाहिले जाऊ लागले. हा विश्वासघाताचा प्रकार आहे असेच विदेशींना भारताविषयी वाटू लागले तर त्यात काय चूक आहे. यामुळे देशाचे आर्थिक नुकसान होत आहे.

**लीना गाडगीळ**

# अनाथ बालकांच्या चेह-यावर उजळली दिवाळीचा आनंदोत्सव विवेकानंद विद्यालय माजी विद्यार्थ्यांची भावनिक भेट



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ – दिवाळीचा सण म्हणजे प्रकाशाचा उत्सव. पण खरा उजेड तोच जो दुसऱ्यांच्या आयुष्यातही आनंदाची किरणं पसरवतो. याच भावनेतून विवेकानंद विद्यालय, यवतमाळ येथील माजी विद्यार्थ्यांनी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अनाथ, वंचित आणि निराश्रित बालकांसाठी 'दिवाळी आनंदोत्सव' साजरा करत मानवतेचा खरा उत्सव साजरा केला.या उपक्रमांतर्गत बालकांना नवीन कपडे, फटाके आणि फराळ देण्यात आले. यावेळी विशेष उपक्रम म्हणून बालकांना थेट ट्रेंड्स फॅशन मॉल, यवतमाळ येथे नेऊन त्यांनी स्वतःच्या आवडीचे कपडे निवडण्याचा अनुभव दिला.

पहिल्यांदाच मॉलमध्ये प्रवेश करताना त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद, कौतुकाची चमक आणि डोळ्यांत दाटलेले आनंदाश्रू पाहून उपस्थित सर्वजण भावुक झाले. अनेक बालकांनी याआधी कधीच असा अनुभव घेतला नव्हता त्यामुळे हा क्षण त्यांच्या आयुष्यातील अविस्मरणीय आठवण बनला.कार्यक्रमानंतर स्नेहभोजन, दिवाळीचा फराळ आणि हास्यगप्पांमधून बालकांनी आनंदोत्सव साजरा केला. या निमित्ताने यवतमाळचे उपविभागीय अधिकारी गोपाळ देशपांडे यांनीही सामाजिक संवेदनशीलतेचा सुंदर आदर्श घालून दिला. आपल्या मुलीचा वाढदिवस अवास्तव खर्च न करता, त्या निमित्ताने या प्रकल्पासाठी आर्थिक मदत करून त्यांनी सहभाग नोंदविला समाजातील प्रत्येकाने अनुकरण करण्यासारखी ही प्रेरणादायी कृती ठरली. या उपक्रमाचे समन्वयक अनिल गायकवाड आणि अमित शिरभाते यांनी गेल्या चार वर्षांपासून हा प्रकल्प सातत्याने व यशस्वीपणे राबविला आहे. विवेकानंद विद्यालयातील विद्यार्थीदशेत निर्माण झालेली मैत्री आजही कायम असून, अनेक माजी विद्यार्थी मुंबई, पुणे किंवा परदेशात स्थायिक असले तरी "यवतमाळशी असलेले नाते आणि सामाजिक जबाबदारीची भावना" त्यांनी जपली आहे. त्यांच्या व्हॉट्सअॅप ग्रुप वर उपक्रमाची घोषणा होताच सर्वजण आपापले योगदान देतात कोणताही दिखावा नाही, कोणतीही औपचारिकता नाही.फक्त एक ध्येय "या दिवाळीत प्रत्येक बालकाच्या चेहऱ्यावर आनंद उजळावा." या उपक्रमात बालकल्याण समिती, यवतमाळ यांचेही विशेष सहकार्य लाभले. खऱ्या अर्थाने या माजी विद्यार्थ्यांनी दाखवून दिले.

# बँक मॅनेजरचा मनमानी कारभार..!

शेतमाल विक्रीची रक्कम खात्यात जमा असूनही रक्कम देण्यास नकार : जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव – यवतमाळ महागाव तालुक्यातील मोहदी येथील शेतकऱ्यांनी शासकीय खरेदी केंद्रावर विक्री केलेल्या कापसाची रक्कम युनियन बँक ऑफ इंडिया शाखा, काळी दौ. येथील त्यांच्या खात्यात जमा झाली असतानाही बँक मॅनेजरने ती रक्कम देण्यास नकार दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

सदर प्रकरणात संबंधित शेतकरी हरिदास काशीराम राठोड (१,६२,०००), बंडू संभाजी चवरे (३४,२१०) व विनोद शेषराव रणखांब (९०,०००) यांनी आपली विक्री केलेल्या कापसाची रक्कम विड्रॉलसाठी मागितली असता, बँक मॅनेजर किरण साबळे पाटील यांनी "सदर रक्कम कर्ज कपातीसाठी होल्ड करण्यात आली आहे. असे सांगत ती रक्कम देण्यास मनाई केली.

या मनमानी कारभाराबाबत शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली असून, "राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या संदर्भात बँकांनी सक्तीची वसुली करू नये, खाते होल्ड करू नये" असा स्पष्ट शासनादेश दिला असतानाही, संबंधित मॅनेजरने त्या आदेशांचा भंग केला आहे," असा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. या तक्रारीनंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने चौकशीस प्रारंभ करावा व संबंधित शेतकऱ्यांना हक्काची रक्कम तातडीने अदा करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

**"राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वत: सर्व राष्ट्रीयकृत बँकांना शेतकऱ्यांची खाती होल्ड करू नका, सक्तीची वसुली करू नका, असा स्पष्ट आदेश दिला आहे. तरीही युनियन बँकेकडून शेतकऱ्यांची हक्काची रक्कम अडवली जात आहे, हे अत्यंत निंदनीय आहे. शेतकरी आज संकटात आहे. त्याच्याकडे जगण्याचंही साधन नाही, आणि त्यावर अशा प्रकारचं वागणं म्हणजे जखमेवर मीठ चोळल्यासारखं आहे. जर बँकांचा हा मनमानी कारभार थांबला नाही, तर आम्ही शेतकऱ्यांना आवाहन करू की त्यांनी कापसाची रक्कम त्या बँक खात्यात जमा न करता दुसऱ्या बँकेत टाकावी. शासनाने तातडीने याची दखल घेऊन या बँक अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अन्यथा शेतकरी रस्त्यावर उतरून लढा उभारेल."**

**– मनीष जाधव, शेतकरी नेते**

# शासनाच्या चुकीच्या सर्वेमुळे बाधित पूरग्रस्त अनुदानापासून वंचित

## सत्ताधारी पदाधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपाने निकटवर्गीयांच्या यादीत नाव समाविष्ट, माजी सरपंच बंटी माने यांची पत्रकार परिषदेतून माहिती

**जनमाध्यम प्रतिनिधी**



उमरखेड – मागील ऑगस्ट ते सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने तालुक्यातील चातारी येथील अनेक घरांमध्ये नदी नाल्याचे पाणी गेल्याने पडझड झाली असून अनेक ग्रामस्थांचे घर उध्वस्त झाले होते त्यामध्ये शासनाने राजकीय दबावात येऊन ग्रामसचिवने निकटवर्गीयांना यादीत समाविष्ट केले असल्याचे आरोप चातारी येथील माजी सरपंच बंटी माने यांनी दि 12 रोजी स्थानिक विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेतून प्रशासनावर व सत्ताधाऱ्यांच्या पदाधिकाऱ्यांवर आरोप केला.

यावेळी चातारी चे माजी उपसरपंच धोंडबाराव माने, रक्षाताई माने उपस्थित होते. चातारी हे गाव राजकीय दृष्ट्या मत खंडाची राजधानी म्हणून याची ओळख आहे . येथील गावालगत असलेले नाली उपसा मध्ये भ्रष्टाचार झाल्याने पंधरा दिवसात तीन लाख 98 हजार रुपये खर्च करून नाली व्यवस्थित करण्यात आले नसल्याने संपूर्ण गावात पूर परिस्थिती निर्माण झाली असल्याचेही सांगितले .त्यामुळे या गावी झालेल्या अतिवृष्टीत अनेक नागरिकांचे घरांची व गुरढोरांची अक्षरशा हानी झाली आहे त्यामध्ये येथील ज्यांचे खरोखरच नुकसान झाले आहे त्यांचा पंचनामा न करता एका भाजपा पदाधिकाऱ्यांच्या घरी बसून ग्रामपंचायतच्या सचिव यांनी राजकीय दबावाखाली येऊन निकटवर्गीयांचे नाव यादीत समाविष्ट केले असल्याचे सांगितले. तसेच बंटी माने यांनी पुढे बोलताना सांगितले पहिली यादी दिनांक 22 ऑगस्ट रोजी 95 लोकांची पाठवली होती तर दुसरी यादी दोन सप्टेंबरला 242 लोकांची पाठवली असताना प्रशासकीय अधिकाऱ्यांनी प्रथम 242 लोकांचे नाव यांची यादी राजकीय दबावाखाली येऊन अनुदान देण्यात आले त्यामुळे गावातील वंचित नागरिकांनी प्रशासनाचे उंबरटे झिजवल्यावर भांडण करून शासनाने 95 लोकांची यादी नंतर जाहीर केले. यामध्ये 242 लोकांचे संगणमत करून राजकीय फायद्याच्या अनुषंगाने प्रशासकीय अधिकाऱ्यांनी भाजपा पदाधिकाऱ्यांना हाताशी धरून याद्या केल्या. ज्याप्रमाणे 242 नागरिकांना ज्या अटी शर्ती लावून अनुदान दिले त्याचप्रमाणे संपूर्ण गावाचे घेण्यात यावे अशीही यावेळेस बंटी माने यांनी सांगितले.

तसेच पुढे बोलताना आत्ताही 100 ते 150 खरोखरच ज्यांचे घरांची पडझड झाले व त्यांच्या घरात पाणी घुसले असे नागरिक वंचित असल्याचेही सांगितले आहे .त्वरित शासनाने पुन्हा सर्वे करून वंचित नागरिकांना अनुदान देण्याची मागणी आयोजित पत्रकार परिषदेतून केली.

# मोघे कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या युवा महोत्सवात सहभाग




**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा – स्थानिक शिवरामजी मोघे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी श्रीमती के.एल. महाविद्यालय अमरावती येथे संपन्न झालेल्या संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ च्या युवा महोत्सवात विविध कलाप्रकारा मध्ये सहभाग नोंदवून आपल्या कलेचे उत्कृष्टरित्या प्रदर्शन केले.

यामध्ये महाविद्यालयातील एकूण 18 विद्यार्थीनी सहभागी झाले होते. या विद्यार्थिनींनी प्राचार्य डॉ. अजय सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली व युवा महोत्सव संघ व्यवस्थापक डॉ. नितीन वासनिक व डॉ. उषा राखुडे यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयातर्फे मूकनाट्य, लोकनृत्य व मेहंदी या कला प्रकारात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

मूकनाट्य यामध्ये मोबाईल चा अतिवापर जीवास कसा घातक ठरू शकतो या विषयावर विद्यार्थ्यांनीनी मूकनाटीका सादर केली. तसेच लोकनृत्य यामध्ये ललाटी भंडार नृत्य सादर केले तर विकसित भारत-2047 यावर आधारित रांगोळी आणि मेहंदी या कलाप्रकार मधून भारतीय संस्कृती चे दर्शन घडवले. संस्था सचिव मा.श्री विजय मोघे, प्राचार्य डॉ अजय सोळंके, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. अमर वंजारी यांनी सहभागी विद्यार्थ्यांनीचे कौतुक केले.

# महागांव शहर येथे आरोग्य सेवा समितीचे गठन

सामाजिक कार्यकर्ते भाविक भाऊ भगत यांच्या मार्गदर्शनात समिती स्थापन

**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव – यवतमाळ जिल्हा महागांव शहरामध्ये आरोग्य सेवा समिती स्थापन केली आहे सदर समिती म्हणजे गाव तालुका किंवा जिल्हा पातळीवर स्थापन केलेली अशी एक समिती जी स्थानिक लोकांच्या सहभागातून आरोग्य विषयक सुविधा जनजागृती आणि नियंत्रणासाठी बनवली जाते गावात आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करून देणे शासकीय आरोग्य योजना लोकांपर्यंत पोहोचवणे स्वच्छता लसीकरण कुपोषण निर्मूलन या संदर्भात जनजागृती करणे माता बालक आरोग्य कुटुंब नियोजन प्रसूती सेवा यावर भर देणे असे विविध कामे या समितीमार्फत केले जातात या समितीचे प्रमुख कामे गावात आरोग्य शिबीर आयोजित करणे प्राथमिक आरोग्य केंद्राशी समन्वय ठेवणे औषधे पोषण आहार व इतर वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करणे अपंग जेष्ठ नागरिक व गरजूंसाठी विशेष योजना राबवणे हे असते सदर समितीच्या अध्यक्षपदी आकाश धर्मपाल कावळे यांची नियुक्ती करण्यात आली उपाध्यक्षपदी सिद्धांत शरदचंद्र डोंगरे सचिव पदी अमय विलास पाटे सल्लाकार पदी विवेक राजेंद्र नरवाडे तर सदस्यांमध्ये स्वप्निल कावळे रुद्र दळवे यज्ञेश गाडबैले वैभव कोपरकर अभिजीत बहादुरे रतीश सांगडे संतोष खंदारे सुशील नरवाडे दीपक तायवाडे देवानंद कोपरकर आरोग्य समितीचे सदस्य यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या व गावातील प्रतिष्ठित नागरिकांमध्ये बाळू पाटील नरवाडे डिगांबर गाडबैले रवी कोपरकर संजय नरवाडे बाळासाहेब डोंगरे शेख इरशाद रियाज शेख प्रभाकर कोपरकर व इत्यादी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विदर्भ वेलमा समाजाचा बदकम्मा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पांढरकवडा – शहरात विदर्भ वेलमा समाजाच्या वतीने बदकम्मा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शहरातील व आजूबाजूच्या परिसरातील मोठ्या संख्येने बांधव उपस्थित होते.

पांढरकवडा शहरातील विदर्भ वेलमा समाजाच्या वतीने बदकम्मा हा आपला पारंपारिक सण मोठ्या धुम धडाक्यात व हर्षोउल्हासात साजरा केला. यावेळी शहरात ढोल ताशांच्या गजरात सर्व महिला भगिनींनी बदकम्माच्या पारंपारिक गाण्यांवर नाचत मिरवणूक काढली . व यानंतर बदकम्मा मातेचे विसर्जन करण्यात आले. याप्रसंगी वेलमा समाजातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.बदकम्मा हा तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातील महिलांचा पारंपारिक सण आहे, ज्यामध्ये देवीची पूजा केली जाते आणि सर्व स्त्रिया नटूनथटून या उत्सवात सहभागी होतात. ज्यामध्ये स्त्रिया विविध फुलांनी सजवलेल्या देवीच्या मूर्तींची पूजा करतात. हा सण स्त्रियांच्या सौभाग्य आणि परिवाराच्या कल्याणासाठी केला जातो. हा सण फक्त देवीची आराधना करण्यासाठी नसून महिलांच्या एकत्र येण्याचा आणि सांस्कृतिक बंध वाढवण्याचा एक मार्ग आहे. यामध्ये महिलांचे आरोग्य, त्यांच्या कुटुंबाचे कल्याण, आणि निसर्गाच्या पूजेला महत्त्व दिले जाते. बदकम्मा हा निसर्गाचा सन्मान करणारा सण आहे. यामध्ये स्थानिक फुलांचा वापर करून पर्यावरणपूरक पूजा केली जाते. त्याशिवाय महिलांसाठी हा सण एकत्र येऊन आनंद साजरा करण्याचा एक सुंदर मार्ग आहे. या सणाच्या काळात प्रत्येक स्त्री आपल्या परंपरागत वस्त्रांमध्ये नटून-थटून, आनंदाने आणि उत्साहाने सहभागी होते, ज्यामुळे संपूर्ण वातावरण आनंदमय आणि रंगीत होऊन जाते. पांढरकवडा शहरात वेलमा समाज मोठ्या संख्येने असल्याने शहरात हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या मिरवणुकीची सांगता माऊली सेलिब्रेशन्स येथे करण्यात आली. यावेळी समाजबांधवांनी पुढल्या काळात हा उत्सव सामाजिक आणि सांस्कृतिक बंध जपत मोठया प्रमाणात साजरा करू असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता सर्व बंधू व भगिनींनी अथक परिश्रम घेतले.

# दाते महाविद्यालयात 'आर्यभट्ट सायन्स सोसायटी'चे भव्य उद्‌घाटन

## विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी जागरूकता वाढविण्याचा संकल्प

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ – दाते महाविद्यालयात आर्यभट्ट सायन्स सोसायटी या विज्ञान मंडळाचे भव्य उद्घाटन उत्साहात पार पडले. या सोहळ्याचे उद्घाटन वाणिज्य महाविद्यालय न्यासाचे अध्यक्ष श्री. विनायक दाते यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश सिंगरू होते.

याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. रमजान विराणी, प्रमुख उपस्थिती सुषमा दाते, विजय कासलीकर, तसेच विज्ञान विभाग प्रमुख डॉ. सारिका गाडवे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने करण्यात आली. प्रा. स्वाती माकोडे यांनी मान्यवरांचे स्वागत केले, तर प्रा. सोनल टोंगो यांनी आर्यभट्ट सायन्स सोसायटीच्या उद्दिष्टांची आणि विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या नवनवीन विज्ञान मॉडेल्सची माहिती दिली.

उद्घाटक विनायक दाते यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान क्षेत्रातील आधुनिक घडामोडी, औद्योगिक विकास आणि रोजगाराच्या संधींविषयी मार्गदर्शन करत आत्मविश्वास वृद्धीचे महत्त्व अधोरेखित केले. प्रमुख वक्ते डॉ. रमजान विराणी यांनी "जंगल जगतांना" या विषयावर प्रभावी व्याख्यान देत जंगलांवरील वाढता ताण आणि त्यावरचे उपाय याविषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. या कार्यक्रमात सायन्स सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. राजेश सिंगरू यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान क्षेत्रात नवनवीन प्रयोगशीलता आणि जिज्ञासा जोपासण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. राम पंचभाई यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. शुभांगी बोबडे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिराणी बंधू कापड दुकानातून साडया चोरणा-या बुरखाधारी महीलांना अटक

## स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांची कारवाई

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद – यवतमाळ जिल्हयात कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे,अवैध शस्त्र सुरु राहणार नाही तसेच अउघड गुन्हे, आरोपी शोध,अवैध धंदयाचे समूळ उच्चाटन व्हावे याकरीता पोलीस अधीक्षक कुमार चिंता सा यांनी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांना आदेशीत केले होते. त्याच अनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांनी त्याचे अधिस्थान पथकांना गोपनिय माहीती काढून प्रभावी छापा कारवाई करणे बाबत सुचना दिल्या आहेत.

१२ ऑगस्ट २५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पुसद शहर पोलीस स्टेशन अप क्रमांक ५४५/२०२५ कलम ३०३ (२) भान्यासं या गुन्हयाचा संमातर तपास करीत असतांना नमूद पथकांने हिराणी बंधू दुकानातील सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी केली असता त्यामध्ये अज्ञात बुरखाधारी महीला दिसून आल्याने पोलीस कौशल्याचा वापर करुन गोपनिय बातमीदारा मार्फत माहीती काढली कि, दिनांक ६ ऑगस्ट २०२५ रोजी पुसद शहरातील हिराणी बंधू कापड दुकानातून चोरी करणा-या बुरखाधारी महीला हया नांदेड परिसरातील असल्याबाबत माहीती संकलीत करुन सदर बुरखाधारी अज्ञात महीलेचा शोध घेण्याकामी वरिष्ठांच्या परवानगीने नांदेड येथे जावून अज्ञात बुरखाधारी महीला हया फरजाना बेगम शेख नईम वय ४३ वर्ष,फईम बेगम हकिम खान वय ५० वर्ष दोन्ही रा.श्रावस्ती नगर नांदेड असे असल्याचे निष्पन्न करुन त्यांना नांदेड येथून ताब्यात घेवून त्याच्याकडून गुन्हयातील चोरीस गेलेल्या सर्वच्या सर्व ०८ वेगवेगळया रंगाच्या साड्या किंमत ३५,००० रुपयाचा मुददेमाल जप्त करुन ताब्यात घेतला. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक यवतमाळ कुमार चिंता (भा.पो.से) सा,अपर पोलीस अधीक्षक यवतमाळ अशोक थोरात (म.पो.से) सा,मा. सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन बीजे सा,मा. पोलीस निरीक्षक सतीश चवरे स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ,यांचे मार्गदर्शनात सपोनि/ धिरज बांडे,पोउपनि/शरद लोहकरे,सफी/ मुन्ना आडे,पोहवा/संतोष भोरगे,पोहवा तेजाब रणखांब,पोहवा सुभाष जाधव,पोहवा कुणाल मुंडोकार,पोहवा रमेश राठोड,पोशि सुनिल पंडागळे,चापोउपनि रविंद्र शिरामे, पोशि राजेश जाधव सर्व नेम-स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ मपोशि जयाश्री श्रीरामजवार पो स्टे पुसद शहर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

# मौजा रंभा येथे भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ सोहळा साजरा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद – डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा पूर्ण विश्वामध्ये नव्हे तर माणसाच्या मनातील हृदयांच्या प्रत्येक मानवाच्या कल्याणाकरिता भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी लिहून या मातीतील प्रत्येक माणसाला बुद्धाची गरज आहे असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणत होते.

या विचाराने मौजा रंभा गावातील सर्व नागरिकांनी भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ १० ऑक्टोंबर रोजी सुरू करण्यात आला आहे गावातील नागरिकांनी अति आनंदाने सोहळा साजरा केला आहे. गावातील नागरिक. पोलीस मित्र मानव अधिकारी संघटनेचे महाराष्ट्र अध्यक्ष राज वाढे यांनी भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ सुरुवात करून गावातील नागरिकांना पुढील विचार मांडले.

तसेच गावातील नागरिक रवींद्र भालेराव,आकाश वाढे,भीमराव धवसे, प्रवीण भालेराव, आकोश धवसे,साहेबराव वाढे, अनिल भगत, महादेव धवसे, लक्ष्मण भगत, बापूराव वाढे, दिगंबर वाढे, संजय भालेराव, बबन वाढे, वैभव वाढे, मनोज भगत,अमोल वाढे ,समाधान वाढे,व तसेच गावातील महिला या सर्वांचे सहकार्य लाभले आहे.

# घाटंजी पंचायत समिती गणांचे आरक्षण जाहीर, पारवा व शिरोली गणावर सर्वांचे लक्ष

**जनमाध्यम प्रतिनिधी**



घाटंजी – आज तहसील कार्यालय घाटंजी येथे मा. देशपांडे साहेब उपजिल्हाधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ यांच्या मार्गदर्शनात तहसीलदार विजय साळवे घाटंजी व तालुका निवडणूक अधिकारी श्री दिलीप राठोड साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत तालुक्यातील सहा गणासाठीचे आरक्षण सोडत निघाली असून खापरी गटातील, खापरी गण ना. मा. प्र. (ओबीसी) साठी राखीव असून शिवणी गण अनुसूचित जमाती (एस. टी) महिलासाठी राखीव निघाले आहे.

पारवा गटातील पारवा गण सर्वसाधारण (खुला) महिलासाठी राखीव असून कुर्ली गण ना. मा. प्र. प्रवर्गासाठी राखीव आहे. आणि पार्डी नस्करी गटातील शिरोली गण सर्वसाधारण महिला असून, पार्डी नस्करी गण अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे असे एकूण सहा गणासाठी आरक्षण सोडत निघाली असून त्यात पंचायत समितीवर महिलांचाच राज राहणार असल्याचे दिसून येत आहे पंचायत समिती सभापतीसाठी सर्वसाधारण महिला राखीव असल्याने पारवा आणि शिरोली गणावर सर्वांचे लक्ष लागले आहे. तालुक्यातील तीनही जिल्हा परिषद गट अनुसूचित जमातीसाठी राखीव निघाल्याने अनेक इच्छुकांचे हिरमोड झाल्याचे दिसून येत आहे.

# कॉंग्रेसचा जनआक्रोश मोर्चा तहसील कार्यालयावर धडकला

**जनमाध्यम प्रतिनिधी**



राळेगाव : राळेगाव शहरात आज भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या वतीने शेतकऱ्यांच्या विविध न्याय्य मागण्यांसाठी भव्य जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. शहरातील मुख्य मार्गाने निघालेला हा मोर्चा "शेतकऱ्यांना न्याय द्या!" अशा घोषणांनी दणाणून गेला आणि शेवटी तहसील कार्यालयावर धडक देऊन निवेदन सादर करण्यात आले. या मोर्चाचे नेतृत्व जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. प्रफुल्ल मानकर, माजी मंत्री प्रा. वसंत पुरके, माजी मंत्री शिवाजीराव मोघे, कॉंग्रेस ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष अरविंद वाढोनकर यांनी केले.

कॉंग्रेसने यावेळी सरकारकडे पुढील प्रमुख मागण्या मांडल्या : राळेगाव तालुका दुष्काळग्रस्त घोषित करावा, शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्जमाफ करावे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान द्यावे, मजुरांना रोजगार उपलब्ध करून द्यावा, शेतकऱ्यांना सरसकट पीकविमा मिळावा, सोयाबीनला प्रति क्विंटल ७ हजार आणि कापसाला १० हजार रुपये हमीभाव द्यावा, अतिक्रमित जागेवरील लाभार्थ्यांना घरकुल पट्टे द्यावेत, पांदण रस्त्यांचे काम तातडीने सुरू करावे, कृषी पंपाचे वीजजोड सुरू करावे, जंगली जनावरांमुळे होणाऱ्या पिकाच्या नुकसानीसाठी भरपाई द्यावी आणि त्यांच्या नियंत्रणाची व्यवस्था करावी. या मोर्चात अल्पसंख्यांक आघाडीचे जिल्हाध्यक्ष जाफर शेख, तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेंद्र तेलंगे, शहराध्यक्ष प्रदीप ठुने, खरेदी-विक्री संघाचे सभापती मिलिंद इंगोले, वसंत जिनिंगचे सभापती नंदकुमार गांधी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालिका वर्षा तेलंगे, नगराध्यक्ष रवींद्र शेराम, ग्रामविकास समितीचे अध्यक्ष सचिन हुरकुंडे, खरेदी-विक्री संघाचे उपसभापती भरत पाल, वसंत जिनिंगचे उपसभापती अंकुश रोहनकर, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष अंकुश मुनेश्वर, किसान कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष श्याम येनोरकर, ॲड. सीमा तेलंगे, प्रकाश पोपट, सुधीर जवादे आदींसह शेतकरी व शेतमजूर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# वेचक

## आरक्षणामुळे इच्छुकांमध्ये 'कही खुशी, कभी गम'ची अवस्था

राळेगाव : पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी नुकतेच आरक्षण जाहीर करण्यात आले असून या आरक्षणामुळे इच्छुक उमेदवारांमध्ये 'कही खुशी, कभी गम' अशी भावना पाहायला मिळत आहे. काहींना आपल्या गटाचा भाग्य खुलल्याचा आनंद आहे, तर काहींच्या गटात अनपेक्षित आरक्षण लागल्याने निराशा पसरली आहे. राळेगाव तालुक्यात एकूण सहा पंचायत समिती गण आणि तीन जिल्हा परिषद गट आहेत. जाहीर झालेल्या आरक्षणानुसार झाडगाव पंचायत समिती : इतर मागासवर्गीय महिला वरंध पंचायत समिती : अनुसूचित जाती पुरुष खैरी पंचायत समिती : सर्वसाधारण वाढोनाबाजार पंचायत समिती : सर्वसाधारण महिला जळका पंचायत समिती : अनुसूचित जाती महिला धानोरा पंचायत समिती : सर्वसाधारण तर जिल्हा परिषदेच्या तीन गटांसाठी आरक्षण पुढीलप्रमाणे आहे. जळका जिल्हा परिषद गट : मागासवर्गीय झाडगाव जिल्हा परिषद गट : अनुसूचित जमाती खैरी जिल्हा परिषद गट : मागासवर्गीय पंचायत समितीचे आरक्षण उपविभागीय अधिकारी कार्यालयात, तर जिल्हा परिषदेचे आरक्षण यवतमाळ येथे जाहीर करण्यात आले. आरक्षण जाहीर होताच राजकीय वातावरणात उत्सुकता, आनंद आणि निराशा अशा तीनही भावना उमटल्या आहेत. काही इच्छुकांचा राजकीय मार्ग मोकळा झाला असून काहींच्या आकांक्षा मात्र आरक्षणाच्या पडद्याआड गेल्या आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी या आरक्षणाने राजकीय समीकरणे नव्याने घडवण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

## बाभूळगाव पांदण रस्ता मोकळा करून देण्यात टाळाटाळ

बाभूळगाव – तालुक्यातील सुभानपूर उमर्डा शिव पांदण रस्ता खुला करून देण्याचा आदेश तहसीलदार यांनी दिल्या नंतर सुद्धा पांदण खुली झाली नाही. अशी तक्रार उमर्डा येथील माजी सरपंच देविदास महादेवराव पांडे यांनी तहसीलदार बाभूळगाव यांच्या कडे लेखी निवेदनातून केली आहे. बंद केलेला मौजा सुभानपुर उमर्डा शिव पांदण रस्ता खुला करून देण्यासंदर्भात तहसील कार्यालयात प्रकरण दाखल करण्यात आले होते. सदर प्रकरणात तहसीलदार बाभुळगाव यांनी दिनांक 22.07. 2025 रोजी शिव पांदन रस्ता खुला करून देण्याचा आदेश पारित केला. आणि मंडळ अधिकारी व तलाठी यांना आदेशित केले. मात्र अद्याप पर्यंत शेतकऱ्यांचा हा पादन रस्ता खुला करून देण्यात आलेला नाही. यामुळे शेतकऱ्यांना शेतमालाची वाहतूक करण्याकरिता अडचणी निर्माण झाल्या आहे. तलाठी व मंडळ अधिकारी यांनी रस्ता खुला करून दिलेला नाही. अशा आशयाचे निवेदन महादेव देविदास पांडे यांनी तहसीलदार यांना दिले आहे. तालुक्यात अनेक गावांमध्ये पांदण रस्ते अडवून धरल्याच्या सातत्याने तक्रारी होत आहे. मात्र ठोस उपाय योजना होत नसल्याने शेतकऱ्यां समोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे .

## बोरगाव कडू येथे कुपनलीका व रपट्याच्या कामावर चौकशीची मागणी : मनसे

पांढरकवडा – मौजा बोरगाव कडू (ता. केळापूर, जि. यवतमाळ) येथील कुपनलीकेचे काम आणि रपट्यांच्या कामाबाबत अनियमिततेच्या तक्रारी समोर आल्या असून, सदर कामांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. अश्विन मुरलीधर ठाकरे (रा. बोरगाव कडू) यांनी दि.१० ऑक्टोबर २०२५ रोजी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, संबंधित कुपनलीकेच्या कामात अंदाजपत्रकानुसार २०० फूट खोदकाम करणे अपेक्षित असताना केवळ ६५ ते ७० फूटच खोदकाम करण्यात आले आहे. तसेच मंजूर चार रपट्यांपैकी फक्त तीनच रपट्यांचे काम प्रत्यक्षात करण्यात आले असून, चौथ्या रपट्याचे देयक काढण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तयार करण्यात आलेले रपटे निकृष्ट दर्जाचे असल्याने फक्त दोन महिन्यांच्या आतच मोडकळीस आल्याचे निवेदनात नमूद आहे. या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित विभागाकडून सखोल चौकशी करून जबाबदारांवर आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# नेहरू मैदानावर महापालिकेची नवीन इमारत उभारण्यावरून नेते आमनेसामने

## शहरातील मैदाने गिळंकृत करण्याच्या डाव


संजय खोडके


डॉ. अनिल बोंडे


डॉ. सुनील देशमुख

**अमरावती/का.प्र.**

शहरातील ऐतिहासिक नेहरू मैदानावर महापालिकेची नवीन इमारत उभारण्याच्या महापालिकेच्या प्रस्तावावरून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार संजय खोडके आणि भाजपचे खासदार डॉ. अनिल बोंडे हे समोरा समोर आले असून काँग्रेसचे नेते डॉ. सुनील देशमुख यांनीदेखील या प्रस्तावाला विरोध दर्शविल्याने हा मुद्दा चांगलाच गाजण्याची चिन्हे आहेत.

जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत गेल्या २६ सप्टेंबरला अमरावती महापालिकेत आढावा बैठक झाली होती. 'महाराष्ट्र इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशन' मार्फत शहरातील विविध विकास प्रकल्पांची कामे करण्याच्या अनुषंगाने करारनामा करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले होते. याच बैठकीत नेहरू मैदान विकास, टाऊन हॉलचे नूतनीकरण, शहराकरिता मल्टीलेव्हल पार्किंग आणि अमरावती महापालिका नूतन प्रशासकीय इमारतीसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याबाबतही सूचना देण्यात आल्या होत्या, असे आमदार खोडके यांनी सांगितले. पालकमंत्र्यांच्या सूचनेवरून महापालिका प्रशासनाने हालचाली सुरू केल्या असताना, याला विरोध होणे खेदजनक आहे, असे खोडके यांचे म्हणणे आहे.

विकासाच्या गोंडस नावाखाली अमरावती शहरातील मैदाने गिळंकृत करण्याच्या कोणत्याही कृतीला भाजपचा तीव्र विरोध राहील. नेहरू मैदानाचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता, ते मैदान आणि शहरातील इतर मैदानेही कायम ठेवण्यात यावीत, अशी भूमिका भाजपचे खासदार डॉ. बोंडे यांनी रविवारी पत्रकार परिषदेत मांडली. बोंडे म्हणाले, स्वातंत्र्यपूर्व काळात याच मैदानात अमरावतीकरांनी स्वराज्याची शपथ घेतली होती. त्यामुळे या मैदानाचे केवळ संवर्धन न करता, त्याचे सौंदर्य वाढवणे आवश्यक आहे.

राजकमल चौकातील गजबजलेल्या जागेतून महापालिकेची इमारत हटवून ती पुन्हा दुसऱ्या गजबजलेल्या भागात (नेहरू मैदानात) नेण्याची कल्पनाच हास्यास्पद आहे. विद्यापीठ मार्गावर महापालिकेसाठी जागा उपलब्ध असताना नेहरू मैदानाचा बळी देणे योग्य नाही. प्रशासनाच्या या निर्णयाला भाजपचा प्रखर विरोध असून, वेळ पडल्यास जनआंदोलन उभे केले जाईल. यासाठी आम्ही नेहरू मैदान बचाव कृती समिती स्थापन केली असल्याचे त्यांनी सांगितले. विकासाच्या नावाखाली अमरावती शहराचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा उद्ध्वस्त करण्याचे षडयंत्र शहरातील लोकप्रतिनिधींनी रचले असल्याचा आरोप अमरावतीचे माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी केला आहे.

शहराचे लोकप्रतिनिधी सध्या दिशाहीन झाले असून, राजकमल चौकातील शिकस्त झालेल्या रेल्वे उड्डाणपुलाच्या प्रकरणातही ही गोष्ट प्रामुख्याने अधोरेखित झाली आहे, असे डॉ. देशमुख म्हणाले. चित्रा चौक-इतवारा बाजार येथील 'रेडिमेड' मंजूर उड्डाणपूल हे लोकप्रतिनिधी पाच वर्षांत बांधू शकले नाहीत. २०१८ मध्ये बांधकाम सुरू करून दिलेले जिल्हा स्त्री रुग्णालयाचे इमारत पूर्ण होऊनही अद्याप त्याचे स्थानांतरण करण्यात आले नाही. आता हे लोक केवळ नवनवीन मोठे आर्थिक प्रकल्प शोधण्यात मश्गूल झाल्याचे चित्र अमरावतीकर नागरिक उघड्या डोळ्यांनी अनुभवत आहेत, अशी टीका त्यांनी केली.नेहरू मैदान गिळंकृत करण्याचा कोणताही प्रयत्न भाविष्यात नागरिकांच्या सहकार्याने हाणून पाडण्यात येईल, असा इशाराही डॉ. सुनील देशमुख यांनी दिला आहे.

# उदया संत्रा उत्पादकांची परिषद

**अमरावती/का.प्र**

नैसर्गिक आपत्तीच्या रूपाने या वर्षी ओढवलेल्या अतिवृष्टीचा फटका संत्रा बागायतदारांनाही बसला. या पार्श्वभूमीवर कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वातील अ. भा. किसान सभेने संत्रा उत्पादक परिषदेचे आयोजन केले आहे. ही संत्रा उत्पादक परिषद येथील मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहात बुधवार, १५ ऑक्टोबरला दुपारी १२ वाजता सुरू होणार आहे.

या परिषदेच्या माध्यमातून संत्रा उत्पादकांबाबत ठोस प्रस्ताव पारित केला जाण्याची शक्यता असून, शासनाला काही उपाययोजना देखील सुचवल्या जाणार आहेत. या संदर्भात माध्यमांना माहिती देताना किसान सभेचे राज्य सरचिटणीस अशोक सोनारकर यांनी संत्रा उत्पादकांवर वेळोवेळी ओढवणारे दुर्भिक्ष कथन केले. त्यांच्या भल्यासाठी काय केले जावे, याबाबतचे ठरावही पारित केले जाणार आहेत. परिषदेला किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजन क्षीरसागर, के. डी. सिंग (झारखंड), के. व्ही. व्ही. प्रसाद (आंध्र प्रदेश), खा. बळवंत वानखडे, वर्धेचे खासदार अमर काळे, माजी कृषिमंत्री हर्षवर्धन देशमुख, वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे, संत्रा बागायतदार संघटनेचे अध्यक्ष ॲड. धनंजय तोटे, ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते तुकाराम भस्मे, म. रा. किसान सभेचे अध्यक्ष ॲड. हिरालाल परदेशी उपस्थित राहणार आहेत. जिथे संत्रा, तेथे संत्रा प्रक्रिया उद्योग उभे करावेत, साखर कारखाने जसे पूरक उत्पादनांमुळे (बायप्रॉडक्ट) पुढे जात आहेत, त्यासारखीच पद्धत संत्रा प्रक्रिया उद्योगांनाही लागू करा, शेतमालाला संरक्षण द्या, डॉ. स्वामिनाथन आयोगाच्या शिफारसी लागू करा, आदी मागण्याही या वेळी करणार आहेत.

आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धा

# भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयाच्या खेळाडूंची उल्लेखनीय कामगिरी

**अमरावती/का.प्र.**

येथील डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन येथे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्गत आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत स्थानिक भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयाच्या खेळाडूंनी मैदानी स्पर्धेच्या विविध क्रीडा प्रकारात सहभाग घेऊन उल्लेखनीय कामगिरी केली.



बी.ए.-३ चे विद्यार्थी शंतनू डाहे, मयूर नान्हे यांनी बांबू उडी या क्रीडा प्रकारात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात प्रथम व द्वितीय स्थान प्राप्त केले.बी.ए.- ३ चा विद्यार्थी यश देशमुखने गोळाफेक मध्ये विद्यापीठात द्वितीय स्थान प्राप्त केले. बी.ए.-२ ची विद्यार्थीनी पायल नागे ने ५००० मीटर व १५०० मीटर धावण्याच्या स्पर्धत विद्यापीठात द्वितीय स्थान प्राप्त केले. शंतनू डाहे ने उंच उडी आणि डिकेथलॉन मध्ये विद्यापीठात द्वितीय स्थान प्राप्त केले. बी.ए.-२ ची विद्यार्थीनी स्वाती पळसकर ने १०००० मीटर आणि १५०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तृतीय स्थान प्राप्त केले. तसेच ४×१०० रीले स्पर्धेत महाविद्यालयाच्या रिले संघाने तृतीय स्थान पटकावले.या रिले संघात बी.ए.-२ च्या विद्यार्थीनी वैदवी सिडाम, पायल नागे, स्वाती पळसकर व बी.ए.-३ ची समीक्षा मुंडे समावेश होता. सर्व विजयी खेळाडूंना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या खेळ व क्रीडा संचालक डॉ. तनुजा राऊत, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ अमरावतीच्या सरचिटणीस प्रा.डॉ.माधुरी चेंडके, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनचे प्राचार्य डॉ.देशपांडे, एथलेटिक प्रशिक्षक डॉ.अतुल पाटील, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ एथलेटिक संघाच्या निवड चाचणी समितीचे अध्यक्ष प्रा.डॉ.उमेश राठी यांनी पदक देऊन सन्मानित केले. खेळाडूंनी केलेल्या या उल्लेखनीय कामगिरी करिता भारतीय विद्या मंदिर अमरावतीचे अध्यक्ष प्रा.डॉ.सतिश कुळकर्णी व सर्वकार्यकारिणी,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल खांडेकर, सर्व प्राध्यापकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग, ह्यूमॅनिटी स्पोर्टिंग क्लबचे गजानन जयस्वाल यांनी शुभेच्छा दिल्या

# कस्तुरबा इंग्लिश स्कूलमध्ये ग्रँड पेरेंट्स डे उत्साहात

**अमरावती/का.प्र.**

महात्मा गांधी तसेच लालबहादूर शास्त्री यांची नुकतीच झालेली जयंती व ग्रँड पेरेंट्स डे अशा तिन्हींचे औचित्य साधून कस्तुरबा इंग्लिश स्कूलमध्ये ग्रँड पेरेंट्स डे शाळेच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून जयवंत पुसदेकर प्रमुख अतिथी म्हणून बी.ए. रमेश रावजी सोळंके,मधुकरराव रोडे व संजीव कुमार खाडे , अर्चना लुंगे त्याचप्रमाणे शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद एकनाथ गावंडे, ज्ञानेश्वरराव धर्माळ, दिवाकर देशमुख, कीटकले व पालक प्रतिनिधी श्री शिवा डोंगरे इत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते.



सर्व मान्यवरांनी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या फोटोचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.परींच्या वेशभूषेत असलेल्या केजी २ च्या चिमुकल्या विद्यार्थिनींनी त्यांचे स्वागत केले व नृत्य सुद्धा सादर केले. त्याचप्रमाणे आजी आजोबांचे महत्त्व सांगितले. इयत्ता ५ वी च्या विद्यार्थ्यांनी सुंदर अशी नाटिका प्रदर्शित करून सर्व उपस्थितांचे मन हेलावून टाकले व वातावरण भावनामय करून सर्व आजी आजोबांचे डोळे पानावले.मुख्याध्यापिका साधना चंदेल यांनी शाळेच्या विकासाचा, प्रगतीचा कल कसा सुरू आहे हे भाषणातून व्यक्त केले. सर्व उपस्थितांच्या हस्ते नुकत्याच जिल्हा क्रीडा संकुल येथे झालेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना मेडल व प्रमाणपत्र देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड.जयवंत पुसदेकर यांनी असेच विद्यार्थ्यांनी यश संपादन करून शाळेचा दर्जा व शाळेला प्रगतीच्या वाटेने वाटचाल करून नावलौकिक करावे असे प्रतिपादन करून विद्यार्थ्यांचे मन भरून कौतुक केले.सर्व आजी-आजोबांसाठी काही मनोरंजक खेळ ठेवण्यात आले व विजेती आजी आजोबांना बक्षीस सुद्धा देण्यात आले.संचालन रक्षंदा शहा व आभार प्रदर्शन अमृता इंगळे यांनी केले.कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकांनी सहकार्य केले.

# 'पहिली ग पूजा बाई...' च्या स्वरांनी निनादले कीर्तन सभागृह

## आद्य ब्रह्मवादिनीचा 'भोंडला व कोजागिरी' उत्साहात

**अमरावती/का.प्र.**

आद्य ब्रह्मवादिनी फाउंडेशन अंतर्गत अमरावती ब्रह्मवादिनी सखी मंचाद्वारे आयोजित भोंडला व कोजागिरी कार्यक्रम संपन्न झाला. स्थानिक अंबादेवी कीर्तन सभागृहात आयोजित या कार्यक्रमात २५० च्या वर महिलांची उपस्थिती होती.



आद्य ब्रह्मवादिनी फाउंडेशनया संस्थापिका वृषाली शिलेदार आणि अमरावती ब्रह्मवादिनीच्या पालक अंजली देशपांडे यांच्या मार्गदर्शनात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्र सेविका समितीच्या गौरी लवाटे तर प्रमुख अतिथी म्हणून स्त्रीरोग विशेषज्ञ डॉ. सुयोगा पानट व भाजपच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या आणि श्री अंबादेवी संस्थानच्या विश्वस्त मीना पाठक उपस्थित होत्या. कार्यकारिणी मंडळातील ज्येष्ठ सदस्य रेवती देशपांडे यांनी प्रमुख अतिथींना मंचावर पाचारण केले. प्रारंभी अतिथींच्या हस्ते दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. पश्चात,गौरी लवाटे यांचे स्वागत स्वाती डांगे,डॉ. सुयोगा पानट यांचे स्वागत शिल्पा कथने, संगीता हातगावकर यांचे स्वागत दीपाली जोशी आणि मीना पाठक यांचे स्वागत वर्षा वैजापूरकर यांच्या हस्ते रोपटे देऊन करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात गौरी लवाटे यांनी आपल्या परंपरांचे जतन करणे कसे आवश्यक आहे, हे स्पष्ट केले. समस्त हिंदुंना एकजूट होण्याचे आवाहन देखील केले. यावेळी बोलताना डॉ सुयोगा पानट यांनी कोजागिरीचा सण आणि त्याचे वैज्ञानिक पैलू स्पष्ट केले. महिलांनी आरोग्याच्या जपणुकीला प्राधान्य देण्याचे आवाहन देखील त्यांनी केले. मीना पाठक यांनी अशा प्रकारचे कार्यक्रम वारंवार घ्यावेत, असे सुचवताना ब्रह्मवादिनी सखी मंचला संपूर्ण सहकार्याचे आश्वासन देखील दिले. कार्यक्रमात सर्व महिला पारंपरिक जरीकाठी साड्या नेसून आणि मराठमोळा नथ हा दागिना परिधान करून सहभागी झाल्या होत्या.

कार्यक्रमाच्या सजावटीची जबाबदारी ब्रह्मवादिनी कार्यकारिणी सदस्य कविता गुर्जर आणि सविता देशमुख यांनी पुढाकार घेऊन पार पाडली. त्यांना अन्य कार्यकारिणी मंडळाने सहकार्य केले. अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे शहराध्यक्ष गणेश जोशी यांनी देखील बहुमोल सहकार्य केले. कार्यक्रमस्थळी राधिका जोशी यांनी रेखाटलेली सुरेख रांगोळी उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती. कार्यक्रमाचे संचालन वर्षा पांडे आणि आभार प्रदर्शन माधुरी दाणी यांनी केले. पसायदानाने कार्यक्रमाची यशस्वी सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघटिका दीपाली काळे आणि वर्षा वैजापूरकर यांच्या नेतृत्वात कार्यकारिणी मंडळातील रेवती देशपांडे,प्रियंका महाजन,संगीता नागपूरकर,दीपाली जोशी,शिल्पा कथने,स्वाती डांगे,प्राची जोशी,रोहिणी राजनेकर,रोहिणी केदार,पल्लवी जोशी,अश्विनी मठे,चित्रा ढोक,कविता गुर्जर,सविता देशमुख,सोनाली चाटी यांनी परिश्रम घेतले.

### संगीता हातगावकर आणि संचाने आणली रंगत

हातगावकर आणि संचाने सादर केलेल्या भुलाबाईच्या पारंपरिक गाण्यांनी कार्यक्रमात विशेष रंगत आणली. उपस्थित महिलांनी टिपऱ्यांच्या तालावर उत्स्फूर्त फेर धरला. काळाच्या ओघात विस्मरणात जात असलेला भुलाबाईचा सण आणि पारंपरिक गाणी ऐकून उपस्थित महिलाना बालपण आठवले. विशेष म्हणजे या संचाचा भोंडला गीतांचा हा पहिलाच कार्यक्रम होता.

## संक्षिप्त

### एम.एस.एम.इ-इंडस्ट्री-इन्स्टिटयूट लिंकेज वर सेमिनार




**अमरावती-** पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयातील इंटरप्रेनरशिप सेलतर्फे 'इंडस्ट्री (एम.एस.एम.इ)-इन्स्टिटयूट लिंकेज अँड अवेअरनेस प्रोग्रॅम' या विषयावर नुकताच सेमिनार यशस्वीरित्या झाला. अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकीय विचारांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि शिक्षण व उद्योग यांच्यातील दरी कमी करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या सेमिनारला अमरावती येथील सिम्टेक सोलर अँड इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीचे संस्थापक शेखर एन. राठी हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. एक यशस्वी उद्योजक आणि उद्योगपती असलेले शेखर राठी यांनी कर्मचारी ते नियोक्ता आणि व्यवसाय संस्थापक होण्यापर्यंतचा आपला उल्लेखनीय प्रवास विद्यार्थ्यांशी शेअर केला. या सत्रात विद्यार्थ्यांशी एक महत्त्वपूर्ण संवाद झाला, जिथे सहभागींनी स्टार्टअप सुरू करणे, निधी मिळवणे आणि औद्योगिक भागीदारी स्थापित करण्यासंबंधी व्यावहारिक सल्ला घेतला. शेखर राठी यांनी भावी उद्योजक म्हणून यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी जोखमीची गणना करावी, चिकाटी ठेवावी आणि समस्या सोडवण्याची मानसिकता विकसित करावी, असे प्रोत्साहन दिले. या सेमिनारने संस्थेमध्ये इंटरप्रेनरशिप इकोसिस्टिम निर्माण करण्याच्या दृष्टिकोनला अधिक बळकट केले आणि एक प्रेरणादायी व्यासपीठ म्हणून कार्य केले. संस्थेचे संचालक डॉ पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया आणि डीन (आर अँड डी) डॉ. व्ही. बी. कुटे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सेमिनार आयोजित करण्यात आला होता. सेमिनारचे समन्वय इंटरप्रेनरशिप सेल समन्वयक प्रा. एन. एन. राजा यांनी केले, तसेच ई-सेल प्राध्यापक आणि विद्यार्थी सदस्यांचे सक्रिय सहकार्य लाभले.

फोटो

### श्री रामकृष्ण क्रीडा विद्यालयाचा शेख सोहेल राज्यस्तरावर



**अमरावती-**नुकताच जिल्हा क्रीडा संकुल तपोवन येथे पार पाडलेल्या विभागीय कुस्ती स्पर्धेत श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळद्वारा संचालित श्री रामकृष्ण क्रीडा विद्यालयाचा शेख सोहेल शेख अहमद याने ५५ किलो वजन गटात फ्रीस्टाइल कुस्ती प्रकारात अंतिम सामन्यात दणदणीत विजय प्राप्त करून राज्यस्तराकरता झेप घेतली. सोहेल च्या यशाबद्दल मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, सचिव प्रा. डॉ. माधुरी चेंडके यांनी अभिनंदन केले असून पुढील वाटचालीकरता शुभेच्छा दिल्यात श्री हव्याप्र मंडळाचे कार्याध्यक्ष एड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव डॉ. विकास कोळेश्वर, सचिव प्रा. रवींद्र खांडेकर, श्री रामकृष्ण क्रीडा विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वाडेगावकर, उपमुख्याध्यापिका आडे, पर्यवेक्षक खोब्रागडे तसेच शाळेचे सर्व शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी यांनी शेख सोहेल चे अभिनंदन केले तसेच क्रीडा शिक्षक संजय मालविय, अजमेरे यांचे सुद्धा अभिनंदन केले व शेख सोहेल ला राज्यस्तरीय स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.


### राष्ट्रीय मार्गावरील पथदिवे एक महिन्यापासून बंद

**मोर्शी-**शहराच्या मध्यभागात नांदगाव पेठ ते पांढुर्णा हा राष्ट्रीय महामार्ग जात असून या महामार्गावर मुक्ताई मंगल कार्यालया



पासून ते सालबर्डी रस्त्यापर्यंत रस्त्यावर प्रकाश पडावा म्हणून दुर्तफी पथदिवे बसविण्यात आले होते. त्या पथदिवे चालू- बंद, देख भाई देखरेख करण्याची जबाबदारी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने नगरपरिषद कडे दिली होती. हल्ली थंडीचे दिवस सुरू झाले असल्यामुळे सकाळी व सायंकाळी अनेक नागरिक सदर रस्त्यावर फिरण्याकरिता जात असल्यामुळे त्यांना अंधाराचा त्रास होत आहे. अंधाराच्या रस्त्यावर मोकाट जनावरे ठिय्या मांडून बसत असल्यामुळे किरकोळ अपघात सुद्धा होत आहे. दीपावलीचा सण अवघ्या दहा दिवसांवर येऊन ठेपल्याने ग्रामीण भागातील नागरिक खरेदी करण्याकरिता मोर्शी शहरात येत असल्यामुळे त्यांना आपल्या गावी परत जात असताना त्रास सहन करावा लागत आहे. तरी संबंधित विभागाने गेल्या महिन्यापासून मोर्शी अमरावती मार्गावरील तसेच मोर्शी वरून मार्गावरील पथदिवे तत्काळ सुरू करण्यात यावे असे मागणी मोर्शीकर नागरिक करीत आहे.

### प्रा. प्राची ठकार-खानझोडे हिचा सत्कार



**अमरावती-**सिपना कॉलेज ऑफ इंजीनियरिंग मधे कार्यरत प्रा. प्राची ठकार-खानझोडे हिला अमरावती विद्यापीठ ने Developement of an Adaptive quantity Aware scheduler for IOT based sensor network या विषयाच्या संशोधन वर आचार्य पदवी प्रदान केली.याबद्दल ब्राह्मण सभे तर्फे प्रा.डॉ कृष्णराव वडोदकर ,मोहन काटे, शुभदा मराठे यांनी सत्कार केला.यावेळी अमरावतीमधील ब्राह्मणवृंद मोठ्या प्रमाणावर उपस्थित होता.

# समस्या 'ई-कचरा' व्यवस्थापनाची

**आ**जकाल सगळेच मोबाईल, लॅपटॉप, टॅबलेट अशा अनेक गॅजेट्समध्ये रमलेले असतो. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत या वस्तू आपल्यासोबत असतात. शिक्षण असो, मनोरंजन असो किंवा काम असो, हे इलेक्ट्रॉनिक उपकरणे आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. पण कधी आपण विचार केलाय का, की ही उपकरणे जुनी झाली, खराब झाली किंवा नवीन मॉडेल आले म्हणून आपण ती टाकून देतो, तेव्हा त्यांचे काय होते? याच टाकून दिलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंना 'ई-कचरा' म्हणतात आणि ही आजच्या जगासमोरील एक खूप मोठी समस्या आहे. ई-कचरा म्हणजे वापरात नसलेली किंवा खराब झालेली कोणतीही इलेक्ट्रॉनिक वस्तू. यात जुने मोबाईल, कॉम्प्युटर, टीव्ही, फ्रिज, वॉशिंग मशीन, एअर कंडिशनर, बॅटरीज, चार्जर, हेडफोन आणि अगदी लहान इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचाही समावेश होतो. हा कचरा सामान्य कचऱ्यासारखा नसतो. या ई-कचऱ्यामध्ये शिसे (र्त्), पारा (सीम्ल्बि), कॅडमियम (र्म्स्ग्ल्स), क्रोमियम (र्म्द्स्ग्ल्स) यांसारखी अनेक विषारी रसायने आणि जड धातू असतात. ही रसायने पर्यावरणासाठी आणि मानवी आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक आहेत.

जेव्हा हा ई-कचरा उघड्यावर टाकला जातो किंवा जाळला जातो, तेव्हा ही विषारी रसायने मातीत, पाण्यात आणि हवेत मिसळतात. यामुळे माती आणि पाण्याची गुणवत्ता खराब होते, ज्यामुळे शेतीत पिकणाऱ्या धान्यांमध्येही हे विषारी घटक येऊ शकतात. याचा थेट परिणाम आपल्या आरोग्यावर होतो. श्वसनाचे आजार, किडनीचे आजार, त्वचेचे विकार आणि अगदी कॅन्सरसारख्या गंभीर आजारांचा धोकाही यामुळे वाढतो. कामगार, विशेषतः जे लोक अनौपचारिकपणे हा कचरा हाताळतात, त्यांच्या आरोग्याला तर सर्वात जास्त धोका असतो.

आज भारतासह जगभरात ई-कचऱ्याची समस्या गंभीर रूप धारण करत आहे. आपला देश हा ई-कचरा निर्माण करणाऱ्या प्रमुख देशांपैकी एक आहे. याचे एक कारण म्हणजे वाढती लोकसंख्या, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि जुन्या वस्तू लगेच बदलण्याची लोकांची सवय. दुर्दैवाने, अजूनही आपल्याकडे या ई-कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी पुरेशी मजबूत यंत्रणा नाही.

**असंघटित क्षेत्र:** आजही मोठ्या प्रमाणावर ई-कचरा असंघटित क्षेत्रातील लोक गोळा करतात. ते हे घटक चुकीच्या पद्धतीने, सुरक्षिततेची कोणतीही काळजी न घेता वेगळे करतात. यामुळे त्यांच्या आरोग्याला धोका होतो आणि पर्यावरणाचंही नुकसान होते.

**जागरूकतेचा अभाव:** अजूनही अनेकांना ई-कचऱ्याबद्दल आणि त्याचे दुष्परिणाम याबद्दल पुरेशी माहिती नाही. त्यामुळे ते जुन्या इलेक्ट्रॉनिक वस्तू सामान्य कचऱ्यात टाकून देतात किंवा भंगारवाल्याला देतात, ज्याचे पुढे काय होते हे त्यांना माहीत नसते.

**पुनर्वापराचा अभाव:** ई-कचऱ्यामधील अनेक मौल्यवान धातू (जसे की, सोने, चांदी, तांबे) आणि इतर घटक पुन्हा वापरले जाऊ शकतात. पण योग्य पुनर्वापर सुविधांच्या अभावामुळे ते वाया जातात.ही समस्या कितीही मोठी असली तरी, यावर उपाय नक्कीच आहेत आणि त्याची सुरुवात आपल्यापासूनच होते.

**सरकारची भूमिका:** सरकारने ई-कचरा व्यवस्थापनासाठी कडक नियम बनवले आहेत आणि ते प्रभावीपणे लागू करणे महत्त्वाचे आहे. उत्पादक कंपन्यांना त्यांच्या उत्पादित वस्तूंचा कचरा परत गोळा करण्याची आणि त्यावर प्रक्रिया करण्याची जबाबदारी देणे आवश्यक आहे.

**जागरूकता वाढवणे:** शाळा, कॉलेज, सोशल मीडिया आणि सार्वजनिक माध्यमातून ई-कचऱ्याबद्दल आणि त्याच्या योग्य विल्हेवाटीबद्दल जनजागृती करणे खूप गरजेचे आहे. लोकांनी सुरक्षित ठिकाणीच ई-कचरा जमा करावा यासाठी सोप्या सुविधा उपलब्ध करून द्यायला हव्यात.



**नवीन तंत्रज्ञान:** ई-कचऱ्यावर सुरक्षित आणि पर्यावरपूरक पद्धतीने प्रक्रिया करण्यासाठी नवीन तंत्रज्ञान विकसित करणे आणि ते सर्वसामान्यांसाठी परवडणारे करणे आवश्यक आहे.

**व्यवसाय संधी:** ई-कचरा व्यवस्थापन क्षेत्रात अनेक नवीन व्यवसाय संधी निर्माण होऊ शकतात. यामुळे रोजगारही वाढेल आणि पर्यावरणाची काळजीही घेतली जाईल.

जागरूकता वाढवणे: आम्ही आमच्या मित्र-मैत्रिणींना, कुटुंबाला आणि शेजाऱ्यांना ई-कचऱ्याबद्दल माहिती देऊ शकतो. सोशल मीडियावर याबद्दल पोस्ट करू शकतो.

**योग्य ठिकाणी जमा करणे:** आमच्या घरात किंवा आजूबाजूला जुने इलेक्ट्रॉनिक उपकरणे असतील, तर ती योग्य ई-कचरा संकलन केंद्रात जमा करण्यासाठी पुढाकार घेऊ शकतो.

**शाळेत पुढाकार:** शाळेत ई-कचरा संकलनाची मोहीम राबवण्यासाठी शिक्षकांना विनंती करू शकतो.

**उपकरणांची काळजी घेणे:** आमची उपकरणं काळजीपूर्वक वापरू, जेणेकरून ती जास्त काळ टिकतील आणि लवकर कचरा होणार नाही.

ई-कचरा व्यवस्थापन ही केवळ पर्यावरणाची किंवा आरोग्याची समस्या नाही, तर ती एक सामाजिक आणि आर्थिक समस्याही आहे. यावर योग्य उपाययोजना केल्या नाहीत, तर भविष्यात याचे गंभीर परिणाम आपल्याला भोगावे लागतील. वाढत्या डिजिटलायझेशनच्या या काळात, ई-कचऱ्याची समस्या वाढतच जाणार आहे. त्यामुळे, यावर वेळीच लक्ष देऊन, सगळ्यांनी मिळून काम करणे आवश्यक आहे. सरकारने नियम बनवणे, कंपन्यांनी जबाबदारी घेणे आणि नागरिक म्हणून आपण सगळ्यांनी जागरूक राहून आपले कर्तव्य पार पाडणे, हेच शाश्वत ई-कचरा व्यवस्थापनाची गुरुकिल्ली आहे. चला तर मग, आपण सगळेजण मिळून या 'डिजिटल कचऱ्या'वर मात करूया आणि एक स्वच्छ, सुंदर आणि निरोगी भविष्य घडवूया!

# ई कचऱ्याविषयी जागरूकता हवी..

**आ**ज १४ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक ई कचरा दिवस म्हणून साजरा केला जातो. ई कचरा कमी करणे आणि पुनर्वापर या बाबत जनजागृती करणे हा या दिवसा मागचा उद्देश आहे. २०१८ साली पहिल्यांदा जागतिक कचरा दिवस साजरा करण्यात आला. आपल्या रोजच्या जगण्यामध्ये इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल सेवांचा वापर जसा वाढत चालला आहे तसतसा इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा डोंगरही वाढत चालला आहे. उपयुक्तता संपलेल्या आणि तांत्रिक बिघाडामुळे वापरण्यायोग्य नसलेल्या वस्तू फेकून दिल्या जातात आणि मग त्याचा ई कचरा बनतो. फक्त महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रात दरवर्षी ५० हजार टन हून अधिक ई कचरा जमा होतो तर देशात ५ लाख टन ई कचरा वर्षाला तयार होतो. महाराष्ट्र खालोखाल आंध्र प्रदेश, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यात सर्वाधिक ई कचरा तयार होतो. आपल्या देशातच इतका ई कचरा तयार होत असेल तर जगात किती ई कचरा तयार होत असेल याचा विचार न केलेलाच बरा.

ई कचऱ्याची समस्या इतकी गंभीरपणे आ वासून उभी असतानाही आपण ई कचऱ्या विषयी जागृत नाही. काहींना तर ई कचरा म्हणजे काय हे देखील माहीत नाही. ई कचरा म्हणजे तुमच्या आमच्या घरातील निकामी झालेल्या किंवा वापरात नसलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तू ज्या सहजपणे आपण इतर कचऱ्यासोबत बाहेर फेकतो. या कचऱ्याचा निचरा देखील आपण इतर कचऱ्या प्रमाणेच करतो. घरगुती वापरातील टीव्ही, टेप, रेडिओ, टू इन वन, फ्रिज, मिक्सर, वॉशिंग मशीन, कुलर, एअर कंडिशनर, इलेक्ट्रॉनिक कुकर, मायक्रोव्हेव, ओव्हन, हीटर, पंखे यासारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तू निकामी झाल्या की त्याला ई कचरा असे संबोधले जाते. यासोबतच महिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उपकरणे जसे संगणक, लॅपटॉप, टॅब, फोन, मोबाईल, बॅटरी, सर्किट बोर्ड, हार्ड डिस्क, पेन ड्राईव्ह, सिडी, व्ही सिडी यांचा ई कचऱ्यात समावेश होतो. अशा प्रकारे निकामी झालेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंना ई कचरा असे म्हणतात. इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये भरपूर प्रमाणात सजीवांना अपायकारक घटक असतात. हे अपायकारक घटक पर्यावरणातील हवा, मती आणि पाण्यात मिसळले की सभोतालची हवा, पाणी आणि माती दूषित होती. मोबाईलची किंवा कोणत्याही बॅटरीची निर्मिती शिसे वापरून केली जाते. हे शिसे पावसाच्या पाण्यात झिरपून हवेतील आर्द्रतेमध्ये मिसळून संबंधित हवा, पाणी आणि दूषित होते. अमेरिकेतील एका पर्यावरण संवर्धन संस्थेच्या म्हणण्यानुसार दरवर्षी ३० दशलक्ष संगणक निकामी झाले की फेकून दिले जातात. यापैकी वीस टक्क्यांहून कमी संगणकाचे पूनार्विनिकरण केले जात नाही. युरोपमध्ये तर दरवर्षी सुमारे १०० दशलक्ष फोन फेकून दिले जातात. कालबाह्य ठरलेली, निकामी झालेली ही उपकरणे पर्यावरणातील जागा वेगाने व्यापत आहेत. निष्काळजीपणे फेकलेल्या काही उपकरणांमध्ये बोरोलियम, कॅडीमियम, पारा आणि शिसे यासारखी घातक घटक असतात. या घटकांना वातावरणात संमिश्र होण्यास अवकाश लागत असला तरी खूप जास्त प्रमाणात जेंव्हा हे वातावरणात मिसळले जातात तेंव्हा पर्यावरणाची मोठी हानी होते.

एकूणच ई कचऱ्यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. हे लक्षात घेता ई कचऱ्याच्या समस्येवर वेळीच आणि गांभीर्याने विचार करण्याची नितांत गरज आहे. ई कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी विशिष्ट प्रक्रिया अवलंबणे आवश्यक आहे. त्याचा निचरा इतर कचऱ्यासोबत न करता त्याचा निचरा करण्यासाठी भिन्न प्रक्रिया राबवली पाहिजे. ई कचऱ्याचे नियोजन आणि विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेत या कचऱ्याचे संकलन त्याचे रिसायक्लिंग आणि त्याचे मॅन्यूफॅकचरिंग महत्वाचे आहे. त्यासाठी सार्वजनिक व खाजगी क्षेत्राने संयुक्त रुपात पायाभूत सुविधा उभाराव्या लागतील. पर्यावरण मंत्रालयाने सादर केलेल्या ई कचरा व्यवस्थापन नियम २०२२ च्या मसुद्यात ई कचरा व्यवस्थापनामध्ये उत्पादक, पुनर्वापर संस्था आणि संघटना सर्वांची जबाबदारी निश्चित केली गेली आहे. ती जबाबदारी प्रत्येक घटकाने पार पाडल्यास काही प्रमाणात ही समस्या मिटेल.

**श्याम ठाणेदार**
मो.९९२२५४६२९५

# राहुल गांधी यांची तुलना मारिया मचाडो यांच्याशी ?





**व्हे**नेझुएलाच्या विरोधी पक्ष नेत्या मारिया कोरिना मचाडो यांच्याशी तुलना राहुल गांधीशी काँग्रेसने ते करत आहे. मचाडो यांनी लोकशाही बळकट करण्यासाठी ज्या पद्धतीने प्रयत्न केले तसेच प्रयत्न भारतात राहुल गांधी करत आहे. मात्र मारिया मचाडो यांच्याशी राहुल गांधीचे तुलना होऊ शकत नाही. राहुल गांधी भारतातील विरोधी पक्ष नेते असले तरी लोकशाही व संविधावर त्यांची निष्ठा नाही.लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या सरकारवर मत चोरीचा ते आरोप करतात.लोकनियुक्त सरकार विरुद्ध रस्त्यावर उतरत सरकार विरुद्ध कट व कारस्थान करत सरकारला अस्थिर करण्याचा प्रयत्न करतात. सरकारने घेतलेल्या प्रत्येक निर्णयाला विरोध करतात. सरकारने केलेल्या कायद्यावर, लष्करावर प्रश्न उपस्थित करत सरकार विरुद्ध अविश्वास व्यक्त करत आहे.

२५ ऑगस्ट २०२२ रोजी राहुल गांधी यांनी 'भारत जोडो यात्रे' दरम्यान कारगिलमध्ये एका रॅलीला संबोधित केले. गलवान खोऱ्यात चिनी सैन्यासोबत झालेल्या हिंसक चकमकीचा संदर्भ देत राहुल गांधींनी रॅलीत दावा केला की,'लोक भारत जोडो यात्रेबद्दल सर्व प्रकारचे प्रश्न विचारतील, पण चिनी सैनिकांनी आमच्या सैनिकांना मारहाण केल्याबद्दल ते एकही प्रश्न विचारणार नाहीत का? चीनने २००० चौरस किलोमीटर भारतीय भूमीवर कब्जा केला आहे.' हे लक्षात घेतले पाहिजे की २०२० मध्ये चीनने पूर्व लडाखच्या सीमावर्ती भागात सरावाच्या बहाण्याने मोठ्या संख्येने सैन्य तैनात केले होते. त्यानंतर सीमेवर घुसखोरीच्या अनेक घटना घडल्या. प्रत्युत्तरादाखल, भारत सरकारने या भागात तितक्याच संख्येने सैन्य तैनात केले. परिस्थिती बिघडतच राहिली. अखेर १५ जून रोजी गलवान खोऱ्यात चिनी सैन्यासोबत चकमक झाली, ज्यामध्ये २० भारतीय सैनिक आणि ४० चिनी सैनिक ठार झाले.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी त्यांच्या परदेश दौऱ्यात केलेली दिशाभूल करणारी, निराधार आणि तथ्यहीन विधाने अत्यंत लज्जास्पद आणि भारताच्या प्रतिष्ठेचा अपमान करणारी आहेत. त्यांनी असा दावा केला आहे की भारतातील शीख समुदायाला गुरुद्वारांमध्ये पगडी घालण्याची परवानगी नाही आणि त्यांच्या श्रद्धेनुसार वागण्यापासून रोखले जात आहे. हा दावा पूर्णपणे निराधार आणि सत्यापासून दूर आहे. भारताच्या संस्कृतीचे रक्षण करण्यात शीख समुदायाने बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेला संपूर्ण देश ओळखतो आणि त्यांचा आदर करतो. त्यांच्याबद्दल असे बनावट दावे करणे विरोधी पक्षनेत्याला शोभत नाही.

व्हेन इज युअर याच्या विरोधी पक्षनेत्या मारिया कोरीना मचाडो या परिपक्व विरोधी नेत्या आहेत.त्यांनी हुकूमशाही प्रवृत्तीच्या सरकार विरोधात आवाज बुलंद केला आहे.हा आवाज बुलंद करताना त्यांनी विधायक मार्गाचा अवलंब केलेला आहे..कुठेही हिंसा घडवून आणली नाही. त्यांनी दक्षिण अमेरिकेतील लोकशाही चळवळीला बळ दिला. यासाठीच त्यांना शांततेसाठी यंदाचा नोबेल पुरस्कार मिळाला. लोकशाही प्रधान असलेला व्हेनेझुएला हुकूमशाही कडे वळला या देशाची राजकीय व सांस्कृतिक स्वरूप बदलले. या पार्श्वभूमीवर वीस वर्षांपूर्वी मारिया कोरीना मचाडो हे नेतृत्व जन्मास आले मचाडो यांनी मुक्त वातावरणात निपक्षपाती पारदर्शी निवडणुका घेण्याची मागणी केली त्यांच्या मागणीकडे सरकारने दुर्लक्ष केले पण आपल्या भूमिकेवरून त्या तरुणही हलल्या नाहीत. २०२४ च्या निवडणुकीत मचाडो यांनी सलग बारा वर्षे सत्तेत असलेले हुकूमशाही प्रवृत्तीची वेणी झुवालाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस माडुरू यांच्या विरोधात रणशिंग फुंकले व्हेनेझुएलाच्या नागरिकांच्या लोकशाही हक्कांना प्रोत्साहन देणे तसेच हुकूमशाहीतून लोकशाही कडे न्याय आणि शांततापूर्ण मार्गाने जाण्यासाठी मारिया मशाडो यांनी केलेल्या संघर्षाची दाखल घेत त्यांना २०२५ वर्षाचा नोबेल शांतता पुरस्कार जाहीर करण्यात आला.

सक्षम विरोधी पक्षनेता असणे हे सक्षम लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे. सरकारच्या चुकीच्या धोरणावर सडकून टीका करून शासनाला अचूक कामे करण्यास विरोधी पक्ष नेता भाग पाडतो. सभागृहात बोलण्याची पहिली संधी पत्नप्रधानां असते तर नंतर विरोधी पक्ष नेत्याला बोलण्याची संधी असते. पंतप्रधान हा सरकारचा प्रतिनिधी असतो तर विरोधी पक्षनेता हा जनतेचा प्रतिनिधी असतो. विरोधी पक्षनेत्याला कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा दिलेला असतो. त्याला सर्व सोयी सुविधा दिल्या जातात.सरकारवर अंकुश ठेवणे राज्यातील-समाजातील ज्वलंत प्रश्नांवर आवाज उठवणे,सरकारचे अपयश जनतेसमोर आणणे,प्रशासकीय अधिकारी चुकीचे वागत असतील तर त्यांना योग्य काम करण्यास भाग पाडणे,विविध प्रश्नांवर आंदोलन करणं अशी भूमिका विरोधी पक्ष नेत्याची असते.राहुल गांधी यांनी विरोधी पक्षनेते म्हणून भूमिका पार पाडताना सनदशीर मार्गाचा अवलन न करता केवळ विरोधासाठी विरोध म्हणून केलेला आहे.

**प्रा.डॉ.सुधीर अग्रवाल,**
वर्धा
मो.९५६१५९४३०६



# जगभरात साजरी होणारी दिवाळी!

**ल**हानांपासून ते मोठ्यांपर्यंत सगळे ज्या सणाची आतुरतेने वाट बघतात, तो सण म्हणजे दिवाळी! दिवाळी हा हिंदू धर्मातील सर्वात मोठा आणि आनंदाचा सण आहे. दिव्यांची आरास, घराबाहेर झगमगणारे आकाशकंदील, रांगोळ्यांनी सजलेले अंगण, सुवासिक उटण्याचा सुगंध, फराळाच्या पदार्थांची रेलचेल,म्हणजेच दिवाळी!केवळ भारतातच नव्हे, तर हा सण इतर देशांमध्येही आनंदाने साजरा केला जातो. चला, पाहूया दिवाळी इतर देशांत कशी साजरी केली जाते.नेपाळमध्ये विविध प्राण्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करून,त्यांचे पूजन करून दिवाळी साजरी करतात. पहिला दिवस काग तिहार, म्हणजे कावळ्यांचा दिवस! या दिवशी कावळ्यांसाठी गोडधोड पदार्थ बनवून घराच्या छपरावर ठेवतात.दुसरा दिवस कुकुर तिहार, म्हणजे या दिवशी कुत्र्यांची पूजा केली जाते. त्यानंतर गाय तिहार, म्हणजे गायीची पूजा केली जाते आणि शेवटी लक्ष्मीपूजन केले जाते.

इंडोनेशिया (मुख्यतः बाली बेटांमध्ये) येथे देवळांना दिव्यांची रोषणाई करून दिवाळी साजरी केली जाते.सिंगापूरमध्ये दिव्यांची आरास करून उत्साहाने दिवाळी साजरी करतात.मलेशियात बाहुल्यांच्या खेळाद्वारे रामायण आणि महाभारत यांचे दर्शन घडवून दिवाळी साजरी केली जाते. या बाहुल्या म्हशीच्या कातड्यापासून बनवल्या जातात. त्यांना रंग देऊन, सर्व प्रकारची आभूषणे, वस्त्रे आणि मुकुट घालून त्यांचे नृत्य सादर केले जाते. थायलंडमध्ये नदीत दिवे सोडून दीपोत्सव साजरा करतात.न्यूझीलंडमधील भारतीय मंदिरांत दिवाळीनिमित्त अन्नकूटाचे आयोजन केले जाते.अमेरिकेतील दिवाळी तर महाराष्ट्राप्रमाणेच फराळाचे पदार्थ बनवून साजरी केली जाते. अशा प्रकारे जगभरात दिवाळी अत्यंत उत्साहाने आणि आनंदाने साजरी केली जाते.

**प्रिया बागडदेव**
छिंदवाडा



# धम्मचक्र प्रवर्तन दिन : मानवमुक्तीचा नवा अध्याय

**१**४ ऑक्टोबर हा दिवस भारतीय इतिहासातील एक विलक्षण आणि परिवर्तनकारी दिवस म्हणून सदैव स्मरणात राहील. १९५६ साली याच दिवशी नागपूर येथील दीक्षाभूमीवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन भारतीय समाजात एक नवे सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि सामाजिक युग आरंभले. या घटनेने केवळ धर्मांतराचा एक प्रसंग निर्माण केला नाही, तर भारतीय समाजव्यवस्थेतील शतकानुशतके प्रस्थापित झालेल्या विषमता, अन्याय, अस्पृश्यता आणि गुलामीविरुद्धचा एक अभूतपूर्व सामाजिक क्रांतीचा पाया रचला. हा दिवस 'धम्मचक्र प्रवर्तन दिन' म्हणून साजरा केला जातो आणि आजही लाखो लोक दीक्षाभूमीकडे श्रद्धेने नतमस्तक होण्यासाठी, बौद्ध विचारधारा नव्याने आत्मसात करण्यासाठी आणि मानवी मूल्यांचे पुनर्जागरण करण्यासाठी एकत्र येतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आयुष्यभर भारतीय समाजातील जातिव्यवस्थेच्या अमानवी स्वरूपावर टीका केली. त्यांच्या मते, जात हा धर्माचा भाग नसून मानवी विषमतेला न्याय्य ठरविण्याचे एक साधन आहे. 'जात ही भारतीय समाजाच्या प्रगतीला मारक ठरलेली सर्वात मोठी सामाजिक व्याधी आहे,' असे ते म्हणत. या विषम व्यवस्थेविरुद्ध त्यांनी केवळ राजकीय आणि कायदेशीर लढा दिला नाही, तर माणसाच्या अंतःकरणातील विचार आणि श्रद्धेचे परिवर्तन हेच अंतिम समाधान असल्याचे त्यांनी ओळखले. त्यासाठीच त्यांनी बुद्धाच्या विचारांचा स्वीकार केला.

धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पार्श्वभूमीवर आपण पाहतो की आजही भारतीय समाजात जाती, धर्म, वंश, लिंगभाव आणि आर्थिक विषमता अस्तित्वात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न केवळ कायद्यातील समानतेपुरते मर्यादित नव्हते; ते सामाजिक आणि मानसिक समानतेपर्यंत पोहोचावे अशी त्यांची अपेक्षा होती. त्यांनी संविधानाच्या माध्यमातून सर्व नागरिकांना समान हक्क दिले, परंतु त्यांनी याचबरोबर स्पष्ट इशारा दिला की, 'राजकीय समानता आणि सामाजिक असमानता एकत्र टिकू शकत नाहीत.' म्हणूनच धम्मचक्र प्रवर्तन दिन ही केवळ एक ऐतिहासिक आठवण नव्हे, तर तो आत्मपरीक्षणाचा दिवस आहे.

दीक्षाभूमीवर दरवर्षी धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करताना लाखो अनुयायांचे एकत्र येणे म्हणजे एका आदर्श समाजाच्या निर्मितीचे प्रतीक आहे. असा समाज जो जात, धर्म, वर्ग, लिंगभेदापलीकडे जाऊन समता, बंधुता आणि न्यायाच्या मूल्यांवर आधारलेला आहे. हीच खरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आणि बुद्धाला मानवतेची अभिवादन करण्याची सर्वोत्तम पद्धत आहे.

शेवटी, धम्मचक्र प्रवर्तन दिन आपल्याला केवळ भूतकाळाची आठवण करून देत नाही, तर भविष्याचे दिशादर्शन करतो. हा दिवस आपल्याला सांगतो की परिवर्तन शक्य आहे. जेव्हा माणूस विचार करतो, प्रश्न विचारतो आणि सत्याचा मार्ग स्वीकारतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी जे चक्र प्रवर्तित केले, ते केवळ धर्माचे नव्हे, तर मानवतेचे धम्मचक्र होते, जे आजही फिरत आहे, आणि सदैव फिरत राहील.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

# प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते बबलू जगताप यांचा भाजपात प्रवेश

## मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांची विशेष उपस्थिती

■ प्रतिनिधी | अकोला ■

**वंचित बहुजन आघाडीचे नेते तथा अकोला मनपाचे माजी नगरसेवक बबलू जगताप यांचा सोमवारी भारतीय जनता पक्षात प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते तर राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत पक्ष प्रवेश झाला. यावेळी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अकोल्याचे खा. अनुप धोत्रे, अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघाचे आ. रणधीर सावरकर, महानगर अध्यक्ष जयंत मसने, माजी महापौर विजय अग्रवाल यांच्यासह भाजपाचे नेते उपस्थित होते.**



बबलू जगताप हे पूर्वाश्रमीचे वंचित बहुजन आघाडीचे नेते असून गेल्या दोन टर्म पासून अकोला महानगर पालिकेचे नगरसेवक पद त्यांनी भूषविले. दांडगा जनसंपर्क आणि अफाट लोकप्रियता यामुळे भाजपाच्या लाटेत सुद्धा ते वंचित बहुजन आघाडीच्या तिकिटावर दोन वेळा नगरसेवक म्हणून निवडून आले होते. प्रभागातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी ते सदैव अग्रेसर असून शहरात एक सौम्य आणि सुसंकृत चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. सोमवारी अमरावती येथे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आणि शिक्षक मतदारसंघाच्या अनुषंगाने पक्षाची रणनीती संदर्भात विभागीय आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीला भाजपा नेते तथा राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह अमरावती विभागातील पाचही जिल्ह्याचे प्रमुख नेते, पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी अकोला महानगर पालिकेचे माजी नगरसेवक महादेव उर्फ बबलू जगताप यांचा भारतीय जनता पक्षात जाहीर पक्ष प्रवेश करण्यात आला. आगामी महानगर पालिकेच्या दृष्टीने त्यांचा भारतीय जनता पक्षात झालेला प्रवेश हा पक्षाचे आणखीन बळ वाढविणारा असून मनपात भाजपला त्यांच्या प्रवेशाने मोठे बळ मिळणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# घाणीच्या साम्राज्यामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात

## चान्नी ग्राम पंचायतचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील चान्नी गावात गेल्या काही दिवसांपासून घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांचे आरोग्य गंभीर धोक्यात आले आहे. ग्राम पंचायतचा भोंगळ कारभार आणि स्वच्छता विभागाचा निष्क्रियपणा यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

गावातील नाल्या तुडुंब भरल्या असून सांडपाणी थेट रस्त्यावर आणि घरांसमोर साचत आहे. त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली असून नागरिकांना साचलेल्या पाण्यातून ये-जा करावी लागत आहे. या अस्वच्छतेमुळे डेंग्यू, मलेरिया, टायफॉईडसारख्या आजारांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

ग्रामस्थांनी वारंवार ग्राम पंचायतकडे तक्रारी करूनही प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. त्यामुळे ग्रामस्थांचा वैताग वाढला असून 'ग्राम पंचायत फक्त कागदोपत्री स्वच्छता मोहीम राबवते,' असा आरोप होत आहे. स्वच्छतेचे देयक मात्र लाखो रुपयांचे काढले जात असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.गावातील परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे तातडीने लक्ष देऊन स्वच्छता मोहीम राबविण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

**स्वच्छतेवर लाखोंचा खर्च : परिस्थिती जैसे थे :** चान्नी ग्राम पंचायतकडून दरवर्षी स्वच्छतेवर लाखो रुपयांचा खर्च दाखवला जातो. मात्र प्रत्यक्षात गावातील परिस्थिती 'जैसे थे' आहे. सर्वत्र घाणीचे साम्राज्य असून नाल्यांमध्ये सांडपाणी साचलेले आहे. त्यामुळे ग्राम पंचायतच्या खर्चाची चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.



**स्वच्छता विभाग फिरकलेच नाहीत : वरिष्ठांचे दुर्लक्ष :** ग्राम पंचायतच्या स्वच्छता विभागाने गावात अनेक दिवसांपासून भेट दिलेली नाही. त्यांच्या अनुपस्थितीमुळे नाल्यांमधील घाण साचून दुर्गंधी पसरली आहे. यामुळे डेंग्यूसारखे गंभीर आजार पसरण्याची शक्यता वाढली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ दखल घेऊन प्रभावी स्वच्छता मोहीम राबविण्याची गरज आहे.

# 'आस्की किड्स' – शिक्षणातून उद्यमशीलतेकडे एक पाऊल

### दिवाळीनिमित्त अभिनव उपक्रम : 'छोटा उद्यमी' घडवणार उद्याचे उद्यमशील तरुण

■ प्रतिनिधी | अकोट ■

शहरातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था म्हणून ओळखली जाणारी 'आस्की किड्स' शाळा आपल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी नेहमीच चर्चेत असते. समाजातील बदलते तंत्रज्ञान, विशेषतः ँ६ (कृत्रिम बुद्धिमत्ता) मुळे भविष्यात रोजगाराच्या संधींवर होणारा परिणाम लक्षात घेता, या शाळेने विद्यार्थ्यांमध्ये उद्यमशीलता व कौशल्याधिष्ठित शिक्षण यांचा संगम साधण्यासाठी एक अभिनव उपक्रम हाती घेतला आहे.



'छोटा उद्यमी' असे उपक्रमाचे नाव असून या अंतर्गत, वर्ग १ ली ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शाळा प्रशासन विविध वस्तू उपलब्ध करून देणार आहे. विद्यार्थ्यांना या वस्तूंची विक्री करून समाजातील व्यापार व वाणिज्य जगताचा अनुभव मिळणार आहे. यामधून त्यांना पैशाचे मूल्य, बाजारपेठेची जाण, तसेच व्यवहारचातुर्य शिकण्याची अनोखी संधी मिळणार आहे.

या उपक्रमासाठी लागणारे सर्व भांडवल शाळा प्रशासनाकडून उपलब्ध करून दिले असून, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे. या उपक्रमाचे नेतृत्व मुख्याध्यापक नेहा झाडे यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून, प्रकल्प प्रमुख अरुणा काळे, सहप्रकल्प प्रमुख मयुरी गोळे, तसेच सर्व सहकारी शिक्षक विद्यार्थीना आवश्यक ते मार्गदर्शन करणार आहेत. या उपक्रमाच्या निमित्ताने 'विद्यार्थ्यांकडून वस्तू खरेदी करून त्यांच्या प्रयत्नांना दाद द्या आणि उद्याच्या उद्यमशील भारताला हातभार लावा.' असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष मिलिंद झाडे यांनी शहरवासीयांना केले आहे. हा दिवाळी उपक्रम केवळ शिक्षणापुरता मर्यादित नसून, तो विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक साक्षरता, आत्मविश्वास आणि उद्यमशील विचारसरणी रुजविण्याचा प्रयत्न ठरणार आहे.

## वाहनासाठी पसंतीच्या क्रमांकांचा 'आरटीओ' कार्यालयातर्फे लिलाव

**अकोला :** प्रादेशिक परिवहन कार्यालयात दुचाकी वाहनांसाठी नविन मालिका सुरु करण्यात आली असून, इच्छूकांनी नियमित विहित शुल्क भरुन, तसेच खाजगी चारचाकी वाहनांकरीता विहित शुल्काच्या तीनपट शुल्क भरुन आकर्षक पसंती क्रमांक राखीव करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

इच्छूकांनी दि. १४ ऑक्टोबर रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी १०.३० ते दु. २.३० दरम्यान पसंतीचे क्रमांकाच्या विहित नमुन्यातील अर्जासह आधारपत्र, रहिवाशी पत्ता पुरावा, पॅनकार्ड या कागदपत्रांच्या साक्षंकित प्रती बंद लिफाफ्यात कार्यालयाच्या रोख विभागात जमा कराव्यात.

## रोजगार मार्गदर्शन केंद्रातर्फे उद्या मेळावा

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यातील नोकरी इच्छुक उमेदवारांसाठी खासगी क्षेत्रातील नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या वतीने दि. १५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वा. पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यात ३ नामांकित खाजगी कंपन्यांमार्फत एकूण १०० रिक्त पदांची भरती केली जाणार आहे. यामध्ये शैक्षणिक पात्रता दहावी, बारावी, आयटीआय, पदविका, पदवीधर उमेदवारांना संधी उपलब्ध आहेत. या मेळाव्याकरिता ऑनलाईन अर्ज महास्वयम वेब पोर्टलच्या माध्यमातून करावा व मुलाखतीसाठी रोजगार मेळाव्यास प्रत्यक्ष उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.



## मुंडगाव येथे भगवान बुद्ध आणि 'त्यांचा धम्म' ग्रंथ पठणाचा समारोप सोहळा संपन्न

■ प्रतिनिधी | अकोट ■

मुंडगाव येथील मातोश्री भीमाई उपासिका संघ व त्रिमूर्ती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या तीन महिन्यांपासून सुरू असलेल्या 'तथागत भगवान गौतम बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथ पठणाचा समारोप सोहळा अश्विन पौर्णिमेच्या (दि. १० ऑक्टोबर) निमित्ताने, म्हणजेच वर्षावासाच्या दिवशी मोठ्या श्रद्धाभावाने पार पडला.

या ग्रंथाचे पठण आषाढ पौर्णिमेला आरंभ झाले होते. तिन महिन्यांच्या या कालावधीत भीमनगर तसेच परिसरातील नागरिकांनी ग्रंथ श्रवणाचा लाभ घेतला. या दरम्यान धम्म उपासक तसेच सहाय्यक शिक्षक मनीष सरकटे यांनी अखंडपणे ग्रंथ पठण करण्याचे कार्य यशस्वीरीत्या पार पाडले.

समारोप सोहळ्याच्या दिवशी सकाळी बुद्ध वंदना, दुपारी धम्मदेसना आणि स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर विश्वशांती, सामाजिक ऐक्य आणि समतेचा संदेश देणारा कॅन्डल मार्च संपूर्ण गावातून काढण्यात आला. रात्री शालेय विद्यार्थ्यांच्या वतीने वक्तृत्व स्पर्धा व भीम-बुद्ध गीत स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यक्रमादरम्यान धम्मग्रंथ वाचन आणि श्रवणात सक्रिय सहभाग घेतलेल्या महिलांचा तसेच विद्यार्थ्यांचा सन्मान बक्षीस वितरणाद्वारे करण्यात आला. या वेळी ग्रंथवाचक मनीष सरकटे यांनी धम्मदेसनेत सांगितले की, 'सर्वसमावेशक समाज निर्माण करण्यासाठी आणि विश्वशांती प्रस्थापित करण्यासाठी बुद्धाचा धम्म हा एकमेव मार्ग आहे. मानवी जीवनातील परमोच्च कल्याण आणि परम आनंद प्राप्तीसाठी बुद्धाचा धम्म प्रेरक व महाकल्यानकारी आहे.' कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेषराव सरकटे होते. संचालन व सूत्रसंचालन टी.जे. वानखडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सचिन सरकटे यांनी मानले.या प्रसंगी रेखाताई सरकटे, शोभाताई सरकटे, सविता सरकटे, वेणूबाई सरकटे, सुनीता सरकटे, माला सरकटे, जिजाबाई सरकटे, सिंधुबाई सरकटे, रमेश सरकटे, तसेच सचिन सरकटे, रंजीत सरकटे, दिलीप भरक्षे, विलास सरकटे, अनिल सरकटे, सुमित सरकटे, दादाराव सरकटे, बाळासाहेब सरकटे, सदीप सरकटे, पत्रकार स्वप्नील सरकटे यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबंधू उपस्थित होते.

**अकोला :** महिला आर्थिक विकास महामंडळाच्या अकोला लोकसंचालित साधन केंद्राच्या व्यवस्थापक सोनाली अंबरते यांनी मसुरी येथे प्रत्यक्ष फिल्डवरचा अनुभव याबाबत प्रशिक्षण दिले.

**Change In Name**
I have change my name
From
**Mohammad Yaqub Abdul Jabbar**
-- To--
**Mohammad Yakub Abdul Jabbar Gigani**
Address Akola Naka, Ahbab Colony Balapur Po.Akola Dist Akola - 444001 Passport No :- Y1739787

## मानव नॉलेज सिटीत मिसाईलमॅन डॉ. कलाम यांच्या जयंतीवर व्याख्यान

■ प्रतिनिधी | अकोला ■

येथून जवळच असलेल्या व्याळा येथील मानव स्कुल ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी व मानव स्कुल ऑफ पॉलिटेक्निक येथे वाचन प्रेरणा सप्ताह अंतर्गत माजी राष्ट्रपती,मिसाईल मॅन डॉ एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने व्याख्यान संपन्न झाले.या व्याख्यानात वक्ते म्हणून डी जी रुपारेल महाविद्यालय,मुंबई चे से.प्रा. अविनाश कोल्हे होते.त्यांनी माझं वाचन माझं लेखन या विषयावर व्याख्यान सादर केले.या व्याख्यानात त्यांनी वाचन व लेखनाची सवय कशी घडवावी व त्याचा व्यक्तिमत्व विकासावर कसा परिणाम होतो यावर उत्कृष्ट उद्बोधन केले.प्रा कोल्हे यांनी यावेळी भारतीय राज्यघटनेचा गाभा या विषयावर द्वितीय व्याख्यान सादर करीत राज्यघटनेतील मूलभूत तत्वे, नागरिकांचे अधिकार व कर्तव्य यावर सखोल व्याख्यान सादर केले.प्राचार्य प्रा.वसंत भोंगे यांच्या अध्यक्षतेत व संस्थेचे अध्यक्ष मनोज महाजन तथा संचालिका श्रद्धा महाजन यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या या व्याख्यान कार्यक्रमात विद्यार्थ्यांसाठी प्रश्न मंजुषा,निबंध स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धा आदी स्पर्धा घेण्यात आल्यात. या स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळा दिनांक १५ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला असून यात विद्यार्थ्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन यावेळी करण्यात आले. संचालन प्रा अंकित काळे यांनी तर आभार कु पायल वानखडे हिने केले कार्यक्रमाच्या सफलतेसाठी ग्रंथपाल सौ जया गोजे, समन्वयक प्रा अनंत कोल्हे आदींनी मेहनत घेतली. यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व संस्थेचा प्रशासकीय वर्ग उपस्थित होता.



## भाजप कार्यालयात जीएसटी वर सेमिनार संपन्न

■ प्रतिनिधी | अकोला ■

आळशी संकुल येथील भाजप कार्यालयात नेक्स्ट जनरेशन जीएसटी वर सेमिनार मोठ्या उत्साहात संपन्न झाले. पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांच्या जन्मदिवसा निमित आयोजित सेवा पंधरवडा अंतर्गत आयोजित या सेमिनार मध्ये पक्षाचे प्रदेश सरचिटणीस,आ रणधीर सावरकर, खा.अनुप धोत्रे, आ.वसंत खंडेलवाल, महानगर अध्यक्ष जयंत मसने, माजी महापौर विजय अग्रवाल, भाजप व्यापारी आघाडीचे प्रदेश मुख्य सल्लागार निकेश गुप्ता आदी मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमांत प्रमुख वक्ते आशिष चांदराणा यांनी जीएसटीची माहिती देत येणाऱ्या काळातील जीएसटी चे फायदे सांगितले.तर आ सावरकर यांनी जीएसटी च्या संदर्भात केंद्राचे लवचिक घोरण व औद्योगिक विकासासाठी जीएसटी कशी उपयुक्त आहेत यावर मार्गदर्शन केले.कार्यक्रमात निकेश गुप्ता यांनीही नेक्स्ट जनरेशन जीएसटी वर आपले मत व्यक्त केले. यावेळी भगवान साबू,श्रीकर सोमण, चंद्रकांत महाजन, विजय ठाकूर,सुनील बाठे,विशाल मनवाणी,माधव मानकर, संजय गोटफोडे, अँड देवाशिष काकड, सिद्धार्थ शर्मा, दिलीप मिश्रा, अमोल गिते, विजय सिरसाटपवन महल्ले, मनिष बुंदेले आदी उपस्थित होते.



**जाहीर प्रसिध्दी**

दिनांक : १३/१०/२०२५

दैनिक वृत्तपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यात येते की, अकोला तालुक्यामध्ये रोजगार मिळण्याचे दृष्टीने सहकारी तत्वावर मजुर सहकारी संस्था स्थापन करण्याचे ठरविण्यात आले असुन नियोजित संस्थेचे सभासद इच्छिणाऱ्यांनी अकोला तालुक्यातील जे प्रत्यक्ष शारीरिक श्रम करण्याऱ्या व्यक्ती तसेच अल्प भूधारक व अत्यल्प भूधारक की जे उदर निर्वाहाकरीता शारीरीक श्रमाची कामेही करतात अशा व्यक्तींनी अकोला तालुक्यातील इच्छिणाऱ्यांनी (इसमांनी) नियोजित मजुर कामगार सहकारी संस्थेचे अस्थाई कार्यालय मु.पो. वडद बु. ता. जि. अकोला येथे दिनांक २८/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता सभा आयोजित केली आहे तरी इच्छिणाऱ्यांनी सभेस हजर राहावे, ही विनंती.

**( आकाश कैलास चांदुरकर)**

**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८५१/२०२५ प्रोसेस नं.१६९८०/२०२५

चौ.ता. २१/११/२०२५ दिनांक : ०८/१०/२०२५

**अर्जदार :** १. दादाराव महादेवराव काकोडे २. अस्मिता प्रदिप ढोणे ३. निता मनोहर राउत ४. शंकर दादाराव काकोडे सर्व रा. गजानन महाराज मंदिराजवळ, इंजिनिअर कॉलनी, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : वेणुताई दादाराव काकोडे

**पत्ता :-** रा. गजानन महाराज मंदिराजवळ, इंजिनिअर कॉलनी, मोठी उमरी, ता. जि. अकोला. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत वेणुताई दादाराव काकोडे यांचे दि. १४/०१/२०२१ रोजी मोठी उमरी, अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर प्रसिध्दी**

दिनांक : १३/१०/२०२५

दैनिक वृत्तपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यात येते की, पातुर तालुक्यामध्ये रोजगार मिळण्याचे दृष्टीने सहकारी तत्वावर मजुर सहकारी संस्था स्थापन करण्याचे ठरविण्यात आले असुन नियोजित संस्थेचे सभासद इच्छिणाऱ्यांनी पातुर तालुक्यातील जे प्रत्यक्ष शारीरिक श्रम करण्याऱ्या व्यक्ती तसेच अल्प भूधारक व अत्यल्प भूधारक की से उदर निर्वाहाकरीता शारीरीक श्रमाची कामेही करतात अशा व्यक्तीनी पातुर तालुक्यातील इच्छिणाऱ्यांनी ( इसमानी ) नियोजित मजुर कामगार सहकारी संस्थेचे अस्थाई कार्यालय समता नगर शिर्ला ता.पातुर जि.अकोला येथे दिनांक २८/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता सभा आयोजित केली आहे तरी इच्छिणाऱ्यांनी सभेस हजर राहावे ही विनंती.

**( तेजस्वीनी विजय बोरकर )**

**जाहीर प्रसिध्दी**

दिनांक : १३/१०/२०२५

दैनिक वृत्तपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यात येते की, अकोला तालुक्यामध्ये रोजगार मिळण्याचे दृष्टीने सहकारी तत्वावर मजुर सहकारी संस्था स्थापन करण्याचे ठरविण्यात आले असुन नियोजित संस्थेचे सभासद इच्छिणाऱ्यांनी अकोला तालुक्यातील जे प्रत्यक्ष शारीरिक श्रम करण्याऱ्या व्यक्ती तसेच अल्प भूधारक व अत्यल्प भूधारक की जे उदर निर्वाहाकरीता शारीरीक श्रमाची कामे ही करतात अशा व्यक्तींनी अकोला तालुक्यातील इच्छिणाऱ्यांनी ( इसमांनी) नियोजित मजुर कामगार सहकारी संस्थेचे अस्थाई कार्यालय भिरड वाडी, डाबकी रोड, अकोला येथे दिनांक २८/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता सभा आयोजित केली आहे तरी इच्छिणाऱ्यांनी सभेस हजर राहावे, ही विनंती.

**(सौ. वैष्णवी राहुल लिप्ते)**

**जाहीर प्रसिध्दी**

दिनांक : १३/१०/२०२५

दैनिक वृत्तपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यात येते की, पातुर तालुक्यामध्ये रोजगार मिळण्याचे दृष्टीने सहकारी तत्वावर मजुर सहकारी संस्था स्थापन करण्याचे ठरविण्यात आले असुन नियोजित संस्थेचे सभासद इच्छिणाऱ्यांनी पातुर तालुक्यातील जे प्रत्यक्ष शारीरिक श्रम करण्याऱ्या व्यक्ती तसेच अल्प भूधारक व अत्यल्प भूधारक की जे उदर निर्वाहाकरीता शारीरीक श्रमाची कामे ही करतात अशा व्यक्तींनी पातुर तालुक्यातील इच्छिणाऱ्यांनी ( इसमांनी) नियोजित मजुर कामगार सहकारी संस्थेचे अस्थाई कार्यालय मु.पो. भंडारज बु. ता. पातुर जि. अकोला येथे दिनांक २८/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता सभा आयोजित केली आहे तरी इच्छिणाऱ्यांनी सभेस हजर राहावे, ही विनंती.

**( पंजाबराव मर्धाजी सुरवाडे)**

**जाहीर प्रसिध्दी**

दिनांक : १३/१०/२०२५

दैनिक वृत्तपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यात येते की, पातुर तालुक्यामध्ये रोजगार मिळण्याचे दृष्टीने सहकारी तत्वावर मजुर सहकारी संस्था स्थापन करण्याचे ठरविण्यात आले असुन नियोजित संस्थेचे सभासद इच्छिणाऱ्यांनी पातुर तालुक्यातील जे प्रत्यक्ष शारीरिक श्रम करण्याऱ्या व्यक्ती तसेच अल्प भूधारक व अत्यल्प भूधारक की जे उदर निर्वाहाकरीता शारीरीक श्रमाची कामे ही करतात अशा व्यक्तींनी पातुर तालुक्यातील इच्छिणाऱ्यांनी ( इसमांनी) नियोजित मजुर कामगार सहकारी संस्थेचे अस्थाई कार्यालय मु.पो. गावंडगाव ता. पातुर जि. अकोला येथे दिनांक २८/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता सभा आयोजित केली आहे तरी इच्छिणा-यांनी सभेस हजर राहावे, ही विनंती.

**( शेषराव मदन चव्हाण)**

**जाहीर प्रसिध्दी**

दिनांक : १३/१०/२०२५

दैनिक वृत्तपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यात येते की, अकोला तालुक्यामध्ये रोजगार मिळण्याचे दृष्टीने सहकारी तत्वावर मजुर सहकारी संस्था स्थापन करण्याचे ठरविण्यात आले असुन नियोजित संस्थेचे सभासद इच्छिणाऱ्यांनी अकोला तालुक्यातील जे प्रत्यक्ष शारीरिक श्रम करण्याऱ्या व्यक्ती तसेच अल्प भूधारक व अत्याल्प भूधारक की जे उदर निर्वाहाकरीता शारीरीक श्रमाची कामेचही करतात अशा व्यक्तींनी जिल्हा मजुर संघाचे सुचनेनुसार अकोला तालुक्यातील इच्छिणाऱ्यांनी (इसमांनी) नियोजित मजुर कामगार सहकारी संस्थेचे अस्थाई कार्यालय मु.पो.कौलखेड(जॅहागीर) येथे दिनांक २८/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता सभा आयोजित केली आहे तरी इच्छिणाऱ्यांनी सभेस हजर राहावे, ही विनंती.

**(मनोहर अजाबराव तायडे)**

**जाहीर प्रसिध्दी**

दिनांक : १३/१०/२०२५

दैनिक वृत्तपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यात येते की, अकोला तालुक्यामध्ये रोजगार मिळण्याचे दृष्टीने सहकारी तत्वावर मजुर सहकारी संस्था स्थापन करण्याचे ठरविण्यात आले असुन नियोजित संस्थेचे सभासद इच्छिणाऱ्यांनी अकोला तालुक्यातील जे प्रत्यक्ष शारीरिक श्रम करण्याऱ्या व्यक्ती तसेच अल्प भूधारक व अत्यल्प भूधारक की जे उदर निर्वाहाकरीता शारीरीक श्रमाची कामे ही करतात अशा व्यक्तींनी अकोला तालुक्यातील इच्छिणाऱ्यांनी ( इसमांनी) नियोजित मजुर कामगार सहकारी संस्थेचे अस्थाई कार्यालय जाम मोहल्ला, गवळी पुरा अकोला येथे दिनांक २८/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता सभा आयोजित केली आहे तरी इच्छिणाऱ्यांनी सभेस हजर राहावे ही विनंती

**( मोहसीन उस्मान बेनीवाले)**

**जाहीर प्रसिध्दी**

दिनांक : १३/१०/२०२५

दैनिक वृत्तपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यात येते की, अकोट तालुक्यामध्ये रोजगार मिळण्याचे दृष्टीने सहकारी तत्वावर मजुर सहकारी संस्था स्थापन करण्याचे ठरविण्यात आले असुन नियोजित संस्थेचे सभासद इच्छिणाऱ्यांनी अकोट तालुक्यातील जे प्रत्यक्ष शारीरिक श्रम करण्याऱ्या व्यक्ती तसेच अल्प भूधारक व अत्यल्प भूधारक की जे उदर निर्वाहाकरीता शारीरीक श्रमाची कामे ही करतात अशा व्यक्तींनी अकोट तालुक्यातील इच्छिणाऱ्यांनी ( इसमांनी) नियोजित मजुर कामगार सहकारी संस्थेचे अस्थाई कार्यालय मु.पो. कावसा ता.अकोट जि.अकोला येथे दिनांक २८/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता सभा आयोजित केली आहे तरी इच्छिणा-यांनी सभेस हजर राहावे ही विनंती.

**( सचिन रामभाउ सावरकर)**

**जाहीर प्रसिध्दी**

दिनांक : १३/१०/२०२५

दैनिक वृत्तपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यात येते की, पातुर तालुक्यामध्ये रोजगार मिळण्याचे दृष्टीने सहकारी तत्वावर मजुर सहकारी संस्था स्थापन करण्याचे ठरविण्यात आले असुन नियोजित संस्थेचे सभासद इच्छिणा-यांनी पातुर तालुक्यातील जे प्रत्यक्ष शारीरिक श्रम करण्याऱ्या व्यक्ती तसेच अल्प भूधारक व अत्यल्प भूधारक की जे उदर निर्वाहाकरीता शारीरीक श्रमाची कामे ही करतात अशा व्यक्तींनी पातुर तालुक्यातील इच्छिणाऱ्यांनी (इसमांनी) नियोजित मजुर कामगार सहकारी संस्थेचे अस्थाई कार्यालय मु.पो. बाभुळगाव ता. पातुर जि. अकोला येथे दिनांक २८/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता सभा आयोजित केली आहे तरी इच्छिणा-यांनी सभेस हजर राहावे ही विनंती.

**(सौ. मनिषा राजेश फाटकर)**

**जाहीर प्रसिध्दी**

दिनांक : १३/१०/२०२५

दैनिक वृत्तपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यात येते की, पातुर तालुक्यामध्ये रोजगार मिळण्याचे दृष्टीने सहकारी तत्वावर मजुर सहकारी संस्था स्थापन करण्याचे ठरविण्यात आले असुन नियोजित संस्थेचे सभासद इच्छिणाऱ्यांनी पातुर तालुक्यातील जे प्रत्यक्ष शारीरिक श्रम करण्याऱ्या व्यक्ती तसेच अल्प भूधारक व अत्याल्प भूधारक की जे उदर निर्वाहाकरीता शारीरीक श्रमाची कामे ही करतात अशा व्यक्तींनी पातुर तालुक्यातील इच्छिणाऱ्यांनी (इसमांनी) नियोजित मजुर कामगार सहकारी संस्थेचे अस्थाई कार्यालय मु.पो. बाभुळगाव ता. पातुर जि. अकोला येथे दिनांक २८/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता सभा आयोजित केली आहे तरी इच्छिणाऱ्यांनी सभेस हजर राहावे ही विनंती.

**(सौ. प्रतिभा सुनिल फाटकर)**

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३१६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## वर्ध्यात निवडणूक रणसंग्राम

# तिकीट वाटपावरून बंडखोरीचा ज्वालामुखी फुटणार...!

**वर्धा/ रवींद्र लाखे**

नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचा बिगुल वाजताच वर्ध्यात प्रत्येक गावात आणि प्रभागात राजकीय उकळ वाढली आहे. तिकीट मिळाले नाही तर अपक्ष म्हणून मैदानात उतरणार, या निर्धाराने अनेक कार्यकर्ते सज्ज झाले आहेत. तिकीट वाटपाच्या आधीच बंडखोरीची लाट उसळल्याने प्रमुख पक्षांचे नेते गोंधळले आहेत. गेल्या काही महिन्यांपासून निवडणूक कधी? या प्रश्नाने थांबलेली इच्छुकांची तयारी आता जोर धरत आहे. आरक्षण जाहीर होताच गटबाजी तीव्र झाली असून, नाराज नेत्यांनी गुप्त बैठका सुरू केल्या आहेत. काही गावांत पोस्टर युद्ध पेटले आहे, सोशल मीडियावर टोलेबाजी रंगत आहे, तर काही ठिकाणी पक्ष विसरा, माणूस बघा या हाकेसह प्रचारधर्म सुरू झालाय.दरम्यान, नव्या पक्षांच्या मैदानात उतरण्याच्या तयारीमुळे पारंपरिक पक्षांसमोर नव्या आव्हानांची मालिका उभी झाली आहे. कालचे सोबती निवडणुकीच्या घोषणेने प्रतिस्पर्धी झाल्याने समीकरणे धोकादायकरीत्या बदलत आहेत. वरिष्ठ नेते वेट अँड वॉचच्या भूमिकेत असले तरी तळागाळात राग अनावर झालाय. तिकीट न दिलं तर पुढचं नुकसान तुमचंच अशी उघड धमकी देणाऱ्यांची संख्या वाढत असून, यामुळे पक्षांतर्गत कलह आणि बंडखोरी या निवडणुकीत सर्वाधिक गाजणार हे स्पष्ट होत आहे.बंडखोरी रोखण्याची धडपड सुरू असली तरी गावागावात पसरलेली गटबाजी



आणि व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा यातून सुटका कठीण आहे. एकूणच, वर्धा जिल्ह्यातील आगामी निवडणुका सणापेक्षा संघर्ष, सत्ता, स्वाभिमान आणि सूडाचा राजकीय महायुद्ध ठरण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.सामान्य कार्यकर्त्यांच्या वेदनेचा आवाज सामान्य कार्यकर्ता हा पक्षाचा कणा असतो, पण निवडणुकीच्या वेळी त्याची किंमत कमी केली जाते.

पावसात, उन्हात, संघर्षात, प्रचारात तो नेहमी पुढच्या रांगेत असतो, मात्र वरच्या पातळीवर घेतलेले निर्णय त्याच्यावर अन्याय करतात. त्याला पदाची किंवा पैशाची अपेक्षा नसते, फक्त ओळख आणि सन्मान हवा असतो. आज अनेक कार्यकर्त्यांच्या मनात नाराजी साचली आहे, ही नाराजी नेत्यांविरुद्ध नाही, तर दुर्लक्षित केल्याच्या वेदनेविरुद्ध आहे. जर पक्षांनी या वेळी त्यांच्या भावनांकडे लक्ष दिलं, तर हीच निष्ठा विजयाचं शस्त्र होऊ शकते.

**गावागावात गटबाजी, पोस्टर युद्ध आणि 'मीच योग्य' मोहीम जोरात**

# फडणवीस पॅकेजची करणार शेतकरी होळी

## १६ ऑक्टोबरला वर्ध्यात शेतकरी संघटनेचे आंदोलन; हेक्टरी ५० हजार मदतीची मागणी

**वर्धा/ जनमाध्यम**

अतिवृष्टी आणि अतीपावसामुळे झालेले प्रचंड शेती नुकसान भरून काढण्यासाठी राज्य सरकारने जाहीर केलेले ३१ हजार ६२८ कोटींचे मदत पॅकेज हे फसवे असल्याचा आरोप करीत शेतकरी संघटनेने येत्या १६ ऑक्टोबर रोजी वर्ध्यातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर फडणवीस पॅकेज होळी आंदोलन छेडण्याचा निर्णय घेतला आहे.

शेतकरी संघटनेच्या नेत्या माजी आ. सरोज काशीकर, स्वतंत्र भारत पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मधुसूदन हरणे, महिला आघाडी प्रदेश प्रभारी शैलाताई देशपांडे, जिल्हा प्रमुख उल्हास कोंटबकर आणि माजी युवा प्रदेशाध्यक्ष सतीश दाणी यांनी शेतकऱ्यांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. संघटनेच्या मते, शेतकऱ्यांना मदत देण्याऐवजी सरकारने फक्त आकड्यांची हेराफेरी केली आहे. मागील वर्षी कोरडवाहू पिकांसाठी हेक्टरी १३,६०० रुपये तर बागायती पिकांसाठी ३६,००० रुपये मदत मिळाली होती. यावर्षी मात्र ती अनुक्रमे ८,५०० आणि ३२,५०० रुपयांपर्यंत कमी करण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप पसरला आहे.सदर पॅकेजमध्ये विहिरी दुरुस्ती निधीतही मोठी कपात करून १ लाखावरून केवळ ३० हजार रुपये इतकी तरतूद ठेवण्यात आली आहे.

केंद्र सरकारने कडधान्य व कापसाची मुक्त आयात करून भाव पाडले, तर राज्य सरकारने पॅकेजच्या नावाखाली फसवणूक केल्याचा आरोप संघटनेने केला आहे.शेतकरी संघटनेचे नेते म्हणाले की, पॅकेजच्या नावाखाली शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक करण्यात आली असून, शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये तातडीने मदत जाहीर करावी, अशी मागणी घेऊन होळी आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात सर्व पक्षीय भूमिका बाजूला ठेवून प्रत्येक शेतकऱ्याने एकत्र यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पोषण आहाराचे अनुदान गायब

# शिक्षक पदरमोड करून विद्यार्थ्यांना जेवण

**वर्धा/ जनमाध्यम**

ग्रामीण भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये प्रधान मंत्री पोषण आहार योजना अंमलबजावणीत बेफिकिरीचे चित्र समोर आले आहे. शाळेत दररोज तांदूळ, कडधान्ये, तेल, मसाले वापरून विद्यार्थी दुपारच्या सुट्टीत जेवतात.

आठवड्यातून एक दिवस पूरक आहार दिला जातो. मात्र यंदा जूनपासून इंधन, भाजीपाला व पूरक आहाराचे अनुदान मिळालेच नाही.इयत्ता पहिली ते पाचवीसाठी प्रती दिवस प्रती विद्यार्थी रु. २.५९, तर इयत्ता सहावी ते आठवीसाठी रु. ३.८८ असा दर असून, हे अनुदान गेल्या चार महिन्यांपासून थांबले आहे. सप्टेंबर महिन्याचे स्वयंपाकी मानधनही अद्याप मिळाले नाही. शाळा व्यवस्थापन समितीची जबाबदारी असलेल्या योजनेत ग्रामीण भागातील पालक हे प्रामुख्याने शेतमजूर, कष्टकरी असल्याने खर्चाचा भार उचलू शकत नाहीत.

त्यामुळे शिक्षकांना स्वतःच्या खर्चातून विद्यार्थ्यांना आहार पुरवावा लागत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विद्यार्थ्यांना नियमित पोषण आहार देणे बंधनकारक आहे, तरीही शासनाकडून अंमलबजावणीत मोठी बेपर्वाई दिसते, असा आरोप प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी केला.

## पावसाचा फटका, खिशाला चटका

# भाज्यांचे भाव आभाळाला भिडले; फुलकोबी किलोला तब्बल ८० रुपये

**वर्धा/ जनमाध्यम**

सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांची पिके उद्ध्वस्त झाली असून त्याचा थेट परिणाम आता बाजारपेठेत दिसू लागला आहे. वर्ध्याच्या भाजी बाजारात फुलकोबीच्या दराने झेप घेतली असून किलोमागे तब्बल ८० रुपये मोजावे लागत आहेत. मागील काही महिन्यांतील ही सर्वात मोठी वाढ मानली जात आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील अतिवृष्टीमुळे भाजीपाल्याचे आणि फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतमाल वाहतूक ठप्प झाल्याने बाजारात पुरवठा कमी झाला, परिणामी भाव वधारले आहेत. फुलकोबीबरोबरच शेवगा १२० रुपये, पत्ताकोबी



४० रुपये, टोमॅटो ३० रुपये, बटाटे ३० रुपये किलो दराने विकले जात आहेत. कोथिंबीर, मेथी, मुळा यांच्या किमतीही दुप्पट झाल्या आहेत.दररोजच्या जेवणातील ताट रंगवणाऱ्या भाज्यांचे वाढते दर पाहून सर्वसामान्य गृहिणींच्या कपाळावर चिंता स्पष्ट दिसत आहे. अनेकांना आता भाजीपेक्षा डाळ स्वस्त, अशी परिस्थिती भेडसावत आहे.

## संक्षिप्त

### जुन्या वादातून तरुणावर काठीने हल्ला

**देवळी** - जुन्या वादाचा राग मनात धरून एका व्यक्तीवर काठीने हल्ला करण्यात आला. पळसगाव येथे घडलेल्या या घटनेत अनिल साखरकर (३५) हा जखमी झाला आहे. तो घरात असताना उमेश थुले हा तिथे आला आणि आधीच्या वादावरून शिवीगाळ करून काठीने मारहाण केली. जखमीला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. देवळी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

### पाण्याच्या टाकीत पडून चिमुकलीचा मृत्यू

**वडनेर**- घाटसावली येथे तीन वर्षीय अधिरा टाले हिचा पाण्याच्या टाकीत पडून मृत्यू झाला. अधिरा अंगणात खेळत असताना ती टाकीत पडली. कुटुंबीयांनी तिला बाहेर काढून हिंगणघाट येथील रुग्णालयात नेले. मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या घटनेची वडनेर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद झाली आहे.

# तेली समाजाचा कोजागिरी उत्सव जल्लोषात

**आर्वी/ जनमाध्यम**

श्री संताजी अखिल तेली समाज संघटन युवा आघाडी आर्वी व श्री संताजी जन्मोत्सव समितीच्या संयुक्त विद्यमाने साई लोन येथे तेली समाजाचा भव्य कोजागिरी उत्सव उत्साहात संपन्न झाला. समाज बांधवांच्या मोठ्या उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमाला आ. सुमित वानखेडे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून हजेरी लावली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहल सुमित शिंगाने, कविता अनिल डाफे व माधुरी शिरभाते यांनी केले. सुरुवातीला ज्येष्ठ नागरिकांच्या उपस्थितीत श्री संताजी जगनाडे महाराज व श्री रघुनाथ महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पूजनावेळी दिनेश भुसारी,रमेश भिवगडे, प्रकाश जैसिंगपुरे, अशोक गुल्हाने, आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी संताजी अखिल तेली समाज संघटनेचे पदाधिकारी व जन्मोत्सव समितीचे सदस्य मनोज आगरकर, संजय हांडे, रवी गोडबोले, अभिनव पंचकडे, संदीप शिंगाने, संदीप लोखंडे, जगदीश पडोळे, अभिजीत भिवगडे, राहुल निखाडे, पंकज खुणे, अमित भुसारी, आशिष अजमीरे, पवन पडोळे व कुणाल कहारे यांसह तेली समाजातील असंख्य बांधवांनी एकत्रित येऊन उत्सवाला रंगत आणली. संपूर्ण वातावरणात स्नेह, संस्कार आणि उत्साहाची उधाण आली होती.

## 'नेकी की दीवार' उपक्रम यशस्वी

# नारायण सेवा मित्र परिवाराचा स्तुत्य प्रयत्न

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर नारायण सेवा मित्र परिवाराने राबविलेला 'नेकी की दीवार' हा नि:शुल्क वस्त्रवितरण उपक्रम गरजूंना आनंदाचा उजेड देणारा ठरला. नवीन कपडे खरेदी करण्याची आर्थिक क्षमता नसलेल्या कुटुंबांची दिवाळी आनंदी करण्याचा हेतू या उपक्रमामागे होता. लक्ष्मी पापड भंडार, जैन मंदिराजवळ या उपक्रमाचे उद्घाटन झाले.

शहरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत नवीन व चांगल्या स्थितीतील कपडे मोठ्या प्रमाणावर दान केले. प्रत्येकाला दिवाळीचा आनंद घेता यावा,




हा आमचा उद्देश आहे, असे नारायण सेवा मित्र परिवाराचे अध्यक्ष महेश अग्रवाल यांनी सांगितले.असहाय आणि वंचित कुटुंबांना कपडे उपलब्ध करून देण्यात हा उपक्रम यशस्वी ठरला. यावेळी महेश दिक्षित, प्रा. प्रभाकर कोळसे, यशवंत गडवार, पराग मुडे, नथमल सिंघवी, प्रा. अशोक बोंगीरवार, रूपचंद हेमनानी, प्रा. किरण वैद्य, बाबाराव धाईत, ज्ञानेश्वर गहुरकर, अशोक सिंघवी, रवि दुरशेट्टीवार, राखी बेतवार, ज्योती धार्मिक, कंचन खिवसरा, किरण अग्रवाल, विरश्री मुडे, कीर्ती माडेवार यांच्यासह नारायण सेवा मित्र परिवाराचे सदस्य उपस्थित होते.

# अतिक्रमणमुक्त बोरगाव अभियानास प्रारंभ

## ग्रामसभेत ठराव सर्वानुमते मंजूर



**साहूर/ जनमाध्यम**

बोरगाव ग्रामपंचायतच्या सभागृहात सरपंच संजय ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली ३० सप्टेंबर रोजी झालेल्या ग्रामसभेत गावातील अतिक्रमणाचा मुद्दा प्रमुख ठरला. सार्वजनिक जागांवरील अतिक्रमण तातडीने हटविण्यासाठी सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला.

ग्रामपंचायत प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले की, कारवाई करण्यापूर्वी स्वयंस्फूर्तीने अतिक्रमित जागा मोकळ्या कराव्यात.ग्रामसभेत नागरिकांनी सहकार्याची भूमीका स्वीकारून कारवाईपूर्वीच कच्चे-पक्के बांधकाम स्वतः हटवावेत, असा आदर्श दाखवण्याचा निर्धारही व्यक्त झाला. अन्यथा सहकार्य न करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय सभेत घेण्यात आला.

सरपंच संजय ठाकरे यांनी आपल्या कार्यकाळात लोकाभिमुख कामांना प्राधान्य देत गावाच्या सर्वांगीण विकासासाठी युवकांचा सहभाग वाढवला आहे. नुकत्याच झालेल्या ग्रामसभेत तरुणांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून ग्रामविकासाचा निर्धार पुन्हा अधोरेखित केला.या ग्रामसभेत विविध विकासात्मक विषयांवरही चर्चा झाली. महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत लेबर बजेट तयार करणे, कृषी सखींची नियुक्ती, स्मशानभूमी व शेतशिवारात वृक्षारोपण मोहीम, वन्य प्राण्यांकडून झालेल्या पिक नुकसानीची भरपाई, घरकुल बांधकामाचा आढावा, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान राबविणे, तसेच ग्रामपंचायतीतील रिक्त पदे भरण्याबाबत ठराव घेण्यात आले.या सभेला ग्रामपंचायत अधिकारी गजेंद्र बनसोड, तलाठी सविता भगत, पोलीस पाटील ज्ञानेश्वर निंभोरकर, ग्रामपंचायत सदस्य, प्रतिष्ठित नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**वर्धा** - नालवाडीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला, मृत युवकाचे नाव किशोर भागवते (५७, रा. नागसेननगर) असे आहे. ते दुचाकीने घराकडे जात असताना अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. गंभीर जखमी झालेल्या भागवते यांना नागपूर येथील रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी वर्धा शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून वाहनचालकाचा शोध सुरू आहे.

# आज आर्वी विधानसभा आढावा सभा

## प्रमुख नेते व पदाधिकाऱ्यांची हजेरी

**वर्धा/ जनमाध्यम**

वर्धा जिल्हा काँग्रेसचे प्रभारी व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे वरिष्ठ उपाध्यक्ष राजेंद्र मुळक यांच्या आदेशानुसार, आर्वी विधानसभा मतदारसंघातील संघटन आढावा सभा १४ ऑक्टोबर रोजी पार पडणार आहे. या महत्त्वपूर्ण बैठकीचे अध्यक्षस्थान विधानसभा प्रभारी व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव अनिल गायकवाड भूषवणार असून, जिल्हाध्यक्ष मनोज चांदुरकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.आर्वी मतदारसंघातील सर्व ब्लॉक अध्यक्षांना त्यांच्या ब्लॉकमधील प्रमुख पदाधिकारी, जिल्हा पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह हजेरी लावण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच फ्रंटल व विभाग जिल्हाध्यक्ष यांनी आपल्या विभागातील संबंधित पदाधिकाऱ्यांना सूचित करून उपस्थित राहणे अपेक्षित आहे.

तालुका निहाय बैठक स्थळ व वेळकारंजा तालुका चरडे मंगल कार्यालय, अमरावती रोडलगत, कारंजा दुपारी १:०० वाजताआष्टी तालुका: शिवानी मंगल कार्यालय, नवीन आष्टी दुपारी ३:०० वाजता आर्वी तालुका आशीर्वाद मंगल कार्यालय, आर्वी दुपारी ४:३० वाजता काँग्रेस संघटनेच्या बळकटीकरणासाठी अत्यंत महत्त्वाची ठरणारी ही बैठक जिल्ह्यातील पक्ष नेत्यांची ताकद दाखवणार असून, सर्व स्तरांवरील कार्यकर्त्यांच्या प्रवक्तेपणाला नवा उत्साह मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

पान नं. १ वरून

### या ठिकाणी होणार पोलिस मदत केंद्र

समृद्धी महामार्गावरील वायफळ, येळाकेळी, धामणगांव, गावनेर शिवणी, कारंजा लाड,मालेगांव जहांगीर, दुसरबीड, सिंदखेड राजा, जालना, छत्रपती संभाजी नगर, हडस- पिंपळगांव, शिर्डी, सिन्नर, इगतपुरी, शहापूर येथील पोलिस मदत केंद्र व छत्रपती संभाजी नगर येथे नियंत्रण कक्ष स्थापित करण्यात येणार आहे. प्रत्येक केंद्रासाठी एक एपीआय, दोन पीएसआय, तीन एएसआय, अठरा पोलिस शिपाई व तीन वाहन चालक असे एकूण ३७ अधिकारी व कर्मचारी लागणार आहे. १५ पोलिस मदत केंद्र व १ नियंत्रण कक्षासाठी १६ एपीआय, ३२ पीएसआय, ४८ एएसआय, २७६ शिपाई व ४८ चालक असे एकूण ४२० कर्मचारी लागणार आहे.

ही लागणार साधन सामुग्री

प्रत्येक केंद्रासाठी चारचाकी वाहन १६,मोटरसायकल १६,स्पीडगन १५,टिंटमीटर १५,ब्रेथ ॲनालायझर १५, मोबाईल फोन, संगणक, प्रिंटर, टेलिव्हिजन, डिजीटल बिनतारी संच, डिजीटल रिपीटर संच, वॉकी टॉकी, वायरलेस टावर सह अन्य साधन सामुग्री लागणार आहे.निर्धारीत करण्यात आलेल्या ठिकाणी ३ हजार चौ.फृ.टाचे पोलिस मदत केंद्र उभारण्यात येत आहे.

तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश

गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी पोलिस मदत केंद्राचा विस्तृत आढावा घेतल्या नंतर पोलिस मदत केंद्राचे बांधकाम तातडीने बांधकाम तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच संबंधित पोलिस अधीक्षकांनी मदत केंद्रासाठी मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासंदर्भात कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. सदर कार्य महत्वपूर्ण असल्याने प्राधान्यक्रमाने करण्यात यावे,अशी सूचना केली.

# अतिवृष्टीचा दणका, कडधान्यांचे उत्पादन घटले

## डाळींचे दर भडकणार

**वर्धा / जनमाध्यम**

राज्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. खरीप हंगामातील प्रमुख कडधान्य पिकांचे मोठे नुकसान झाल्याने उत्पादन घटले असून, मूग, उडीद, मटकी आणि हरभरा यांच्या दरांचा भडका उडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सप्टेंबर अखेर झालेल्या मुसळधार पावसात पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील मोठ्या प्रमाणावर शेतजमिनी वाहून गेल्या. मूग, उडीद आणि तूर पिके मातीखाली गाडली गेल्याने शेतकऱ्यांचे अडचणीत आले आहेत.

पोळ्यानंतर पावसाने अचानक जोर पकडल्याने तोडणीस आलेली पिके जागेवरच सडली.बाजारात डाळींची आवक घटली असून व्यापाऱ्यांच्या मते मटकीच्या भावात आधीच २५ ते ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. आगामी आठवड्यात दर आणखी वाढू शकतात, असा अंदाज बाजारपेठेत वर्तवला जात आहे. कर्नाटक आणि पश्चिम महाराष्ट्रातील अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्याने पुरवठा कमी होण्याची शक्यता आहे.या हंगामात शेतकऱ्यांना उत्पादन घट आणि जमिनीच्या हानीचा मोठा फटका बसला आहे. त्याचवेळी ग्राहक वर्गालाही महागाईचा तडाखा बसण्याची चिन्हे आहेत. स्वयंपाकघराचा खर्च वाढण्याची शक्यता गडद झाली आहे. हवामानातील



अनिश्चिततेमुळे पुढील रब्बी हंगामात हरभरा आणि मसूर पिकांनाही धोका निर्माण झाला आहे. कृषी तज्ज्ञांनी पिकहानी आणि भाववाढ रोखण्यासाठी शासनाने त्वरित ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक ३१५**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने श्री विजयादशमी उत्सव साजरा

**हिवरखेड/प्रतिनिधी** :- येथील शाखांच्या वतीने श्रीविजयादशमी उत्सव दिनांक ०९/१०/२५ ला न्यु महाशक्ती दुर्गा उत्सव मंडळ, हिवरखेड या ठिकाणी संपन्न झाला. प्रमुख अतिथी विनायकजी खांडेकर, प्रमुख वक्ते आशुतोषजी कात्रे ( काटोल जिल्हा संपर्क प्रमुख दायीत्व)मनोहर घुलक्षे ( तालुका संघचालक मोर्शी तसेच स्वयंसेवक उपस्थित होते. गावांतील पुरुषवर्ग, महिलावर्ग, उपस्थित होते. पंथसंचलन, शस्त्रपुजन, दंड प्रात्यक्षिक समता, प्रार्थना, अतिथींचे उदबोधन, वक्तांचे उदभोधन झाले. आशुतोष कात्रे यांनी संघाचे उपक्रम सांगितले, संघ वाढीसाठी काय उपाययोजना कराव्यात त्याचे त्यांनी बरेचशे उदाहरणे दिली. अशा प्रकारे उत्सव संपन्न झाला.






## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.६१९/२०२५ — ने.ता.१०.११.२०२५

**अर्जदार :** **पद्मा प्रल्हादराव पवार,** वय ७७ वर्षे, धंदा - घरकाम
रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक प्रल्हादराव कोंडीराम पवार** यांचा **मृत्यू दि.१०/०८/२०२४** रोजी झालेला असून मृतक प्रल्हादराव कोंडीराम पवार हे रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील कायमचे रहिवासी होते. त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदारा व्यक्तीरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

अर्जदारांना मयताचे कायदेशिर वारस असल्याने वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. **त्याकरिता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.नं.६१९/२०२५ नुसार अर्ज दाखल केला आहे.**

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०७.१०.२०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का — **आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार**

## जाहीर सुचना

आम जनतेस जाहीर सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **श्री.विजय प्रल्हादराव कोठाळे, सौ.प्रणाली विनय कोठाळे व पंकज भुजंगराव किटुकले** यांनी दिनांक **०२.१२.२०१७** रोजी सह-दुय्यम निबंधक वर्ग-२, अमरावती या कार्यालयातून सामान्य मुखत्यारधारक (General Power of Attorney) म्हणून श्री.स्वामी समर्थ बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे मालक निलेश भगवंतराव भस्मे यांना नोंदणी दस्त क्र.५०२७/२०१७ नुसार प्लॉट क्र.३३, शेत सर्व्हे नं.५४/१, मौजे शेगांव, ता.जि.अमरावती, क्षेत्रफळ ३६९० चौ.फुट (३४२.९० चौ.मी.) या मालमत्तेवर नियुक्त केलेले आहे. विहित कालमर्यादेत दिनांक ०२.०८.२०२२ पर्यंत त्यांनी इमारत बांधकाम पूर्ण केले नाही..

सामान्य मुख्यत्यारधारक निलेश भगवंतराव भस्मे हे सुध्दा बुडीत कर्जदार म्हणून घोषित झाले. त्यानंतरही बांधकाम पूर्ण केले नाही. आम्ही त्यांचे नोंदणीकृत मुखत्यारपत्र दिनांक २०.१०.२०२२ रोजीचे सुचनेनुसार रद्द केले आहे.

सामान्य मुखत्यारपत्र लिहून देणार माझे पक्षकार स्वतःच असल्यामुळे सदर मुखत्यारपत्र रद्द करण्यास त्यांना संपूर्ण कायदेशीर अधिकार आहे. सबब दिनांक २०.१०.२०२२ रोजीपासून त्यांचा व त्यांच्या वारसांचा हक्क समाप्त झालेला आहे. हे या जाहीर सुचनेद्वारे आम जनतेस निदर्शनास आणुन देत आहो.

करीता जाहीर सूचना.

**दिनांक १०.१०.२०२५**

(ॲड.आर.पी.तायडे)
विलासनगर, गल्ली नं.५,
अमरावती-४४४६०४
मो.९३२५५३७०८५

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## श्री.ए.बी.कट्टे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.२२८३/२०२५
**उज्वला-वि- निरंक**
**पुढील ता.१९.११.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. **उज्वला अशोक इंगोले,** वय ५९ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.धोत्रा,शिरजगांव मोझरी,ता.तिवसा, जि.अमरावती
२. **किरण सुखदेवराव चौधरी,** वय ५६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.गुरकृपा कॉलनी, संकल्प कॉलनी, रहाटगाव, ता.जि.अमरावती
३. **ज्योती दिलीप कोठे,** वय ५२ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.८ बी श्रीहरी नगर, नं.२, अर्जुन नगर, अमरावती
४. **सरोजनी धनंजय दुधत,** वय ४९ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.सैनथ कॉलनी, चांदूर रेल्वे, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
५. **कविता सुनिल बाळस्कर,** वय ४६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
वार्ड नं.३ पोलिस स्टेशन मागे माहुली जहांगिर, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार : - निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत पंचफुला विठ्ठलराव पांडे व विठ्ठलराव बळीरामजी पांडे** हे **अनुक्रमे** दि.**२३.०८.२०२४ व ०३.०८.२०१३** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. **अर्जदार उज्वला अशोक इंगोले व इतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **उज्वला अशोक इंगोले व इतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०९.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का — आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## विद्यमान श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.२१३५/२०२५
**गिताबाई -वि- अनिता**
पुढील ता.१८.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. गिताबाई महादेवराव वासनकर, वय ७९वर्षे, व्यवसाय - निरंक
२. अवधुत महादेवराव वासनकर, वय ५० वर्षे, व्यवसाय - शेती
३. संदीप महादेवराव वासनकर, वय २७ वर्षे, व्यवसाय - शेती
नं.१ ते ३ रा.शेवती जहांगीर, पो.नांदगांव पेठ, जि.अमरावती
४. अनिता मधुकर भोरे, वय ४६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.वार्ड नं.२, धोत्रा, पो.शिरजगांव मोझर, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :**
१. अनिता संघपाल बनसोड, वय ३९ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.ब्राम्हणवाडा गोविंदपूर, जि.अमरावती
२. निलीमा भूषण गजभिये, वय ३२ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.वार्ड नं.१, मंगरुळ, जि.अमरावती

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत महादेवराव सिताराम वासनकर** यांचे दिनांक **१६.०१.२०११** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार गिताबाई महादेवराव वासनकर व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **गिताबाई महादेवराव वासनकर व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२३.०९.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का — आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## पाहिजेत

**सबा मायनॉरिटीज एज्युकेशनल ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, छाया नगर, अमरावती द्वारा संचालित**

**अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त १०० टक्के अनुदानित**

**लिटील ड्रॉप उर्दू उच्च प्राथमिक शाळा, गुलिस्ता नगर, अमरावती येथे शासन निर्णयानुसार खालील पदे भरावयाची आहेत.**

| अ.क्र. | पदाचे नांव | शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता | पद-संख्या | संवर्ग | माध्यम | शाळेचे प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शिक्षण सेवक | H.S.C., D.Ed./B.A.B.Ed. TET/CTET Paper-I पात्र | 02 | खुला | उर्दू | अनुदानित |
| २ | शिक्षण सेवक | H.S.C., D.Ed./B.Sc.,B.Ed. TET/CTET Paper-II पात्र | 01 | खुला | उर्दु | अनुदानित |

वरील पदाकरीता पात्र उमेदवारांनी मुलाखतीसाठी दिनांक ३०.१०.२०२५ रोजी सकाळी ११ ते २ वाजता घेण्यात येईल. इच्छुक व पात्र उमेदवारांनी अर्ज व मूळ प्रमाणपत्रासह व झेरॉक्स प्रतीसह लिटील ड्रॉप उर्दू उच्च प्राथमिक शाळा, गुलिस्ता नगर, अमरावती येथे स्वखर्चाने उपस्थित रहावे.

**अध्यक्ष,**
**सबा मायनॉरिटीज एज्युकेशनल ॲण्ड वेल्फेअर सोसायटी,**
**अमरावती**

मुख्याध्यापक,
लिटील ड्रॉप उर्दू उच्च प्राथमिक शाळा,
गुलिस्ता नगर, अमरावती

**टिप - ०८/१०/२०२५ तारखेला जनमाध्यम वृत्तपत्रामध्ये दिलेली जाहीरात व २४/१०/२०२५ रोजीची मुलाखात रद्द करण्यात आलेली आहे.**

## सायटेशन/जाहीरनामा

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.६३३/२०२५ — ने.ता.१३/११/२०२५

**अर्जदार -**
१. **सौ.सुलोचना सुखदेवराव रामटेके,** वय ५५ वर्षे, धंदा - घरकाम
२. **श्रीमती वैशाली विवेक रामटेके,** वय ३५ वर्षे, धंदा - नोकरी
(आरोग्य विभाग मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती )
३. **कु.धुर्वी विवेक रामटेके,** वय १५ वर्षे, धंदा - शिक्षण
**(तर्फे अ.पा.क.आई अर्जदार नं.२)**
सर्व रा.सिंभोरा रोड, साई कॉलनी, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**निल**

वरील अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात कलम ३७२ इंडियन सक्सेशन ॲक्ट अंतर्गत सक्सेशन सर्टिफीकीट मिळण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ चा मुलगा, तर अर्जदार क्र.२ चे पती व अर्जदार क्र.३ हिचे वडिल नामे विवेक सुखदेवराव रामटेके यांचा दि. १६/०८/२०१७ रोजी राहत्या घरी मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मृत्यू झाला. मयत विवेक सुखदेवराव रामटेके हे जिवंत असतांना त्यांनी त्यांचे हयातील **"T.V.S. कंपनीची WEGO, wheel base" रजिस्ट्रेशन ता.१६/०३/२००१, चेसिस नं.MD626AG4XB1BO9239 इंजिन नं.0G4BB1112984, Colour Black, Class SCTR, Model T.V.S. WEGO, Body Solo Wheel Base, Mfg. Dt. 03/2011, Regn.No. MH 27-AN 5576** ही दिव्यांगासाठी असलेली मोटर सायकल दुर्गा मोटर्स, अमरावती येथून ५२,२४०/- रुपयात लोन स्वरुपात खरेदी केली होती. सदर मोटरसायकल ही अर्जदार क्र.१ च्या नावाने करणे आहे. तेव्हा या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, जर कोणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ४५ दिवसाच्या आंत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**दिनांक- ११.१०.२०२५**

शिक्का — आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,
मोर्शी

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
## वि.श्री.एस.एस.भिंगरदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.२२९७/२०२५
श्री.निमिश अधिक एक विरुध्द निरंक
पुढील तारीख २१.११.२०२५

**अर्जदार :**
1. Shri Nimish S/o Lalitkumar Sanghani, Age 52 Yrs. Occu.: Business
R/o House No.464, Pannalal Nagar, Amravati.
2. Asmita W/o Jayeshkumar Kapadi, Age 50 Yrs. Occu.: Household work
R/o B-204, Karsan Heritage, Seoni Road, Raipur (C.G.)-492007

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **ललित प्रणजीवनदास संघाणी** हे दिनांक **०६.०३.२००९** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **निमिष अधिक एक विरुध्द निरंक** रा.वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **निमिष अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०७.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) अमरावती यांच्या न्यायालयातील

आर.एम.जे.सी. २२०३/२०२५ — ने.ता.११.११.२०२५

**अर्जदार :**
१. ताई मनोहर मेश्राम, वय ७६ वर्षे, व्यवसाय - निरंक
२. दिनेश मनोहर मेश्राम, वय ५६ वर्षे, व्यवसाय - शेती
३. रणजीत मनोहर मेश्राम, वय ५० वर्षे, व्यवसाय - शेती
नं.१ ते ३ रा.घर नं.३१४८/१ साईनगर, अकोली साईनगर, अमरावती
४. सौ.लक्ष्मी मनोज मानवटकर, वय ४७ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.पुलई, पो.पवनार, ता.जि.वर्धा

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** बॅक ऑफ महाराष्ट्र
शाखा साईनगर, अमरावती, ता.जि.अमरावती
तर्फे शाखा व्यवस्थापक

ज्याअर्थी अर्जदार यांनी भारतीय वारसा कायदा १९२५ च्या कलम ३७२ अन्वये या न्यायालयात उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, मयत मनोहर जयरामजी मेश्राम यांचे निधन दिनांक २५.०१.२०२५ रोजी झाले असून वरील अर्जदार त्यांचे कायदेशीर उत्तराधिकारी आहेत व इतर कोणीही मयतास उत्तराधिकारी नाही. सबब उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत वि.दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, अमरावती या न्यायालयामध्ये हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, ह्याची नोंद घ्यावी.

आज **दिनांक** ०८.१०.२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

शिक्का — आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर)
अमरावती

## जाहीर नोटीस

प्रो.नं.३०४३/२०२५
दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापुर
दि.०८/१०/२०२५

**वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**

किरकोळ अर्ज क्र.३८८/२०२५ — ने.ता.१३.१०.२०२५

**अर्जदार -**
१. **सुशिला लक्ष्मणराव आंबुसकर,** वय ७४ वर्षे, धंदा - घरकाम
२. **अतुल लक्ष्मणराव आंबुसकर,** वय ५० वर्षे, धंदा - मजुरी
दोन्ही रा.राजपुत पुरा, दर्यापुर, ता.दर्यापुर, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **नारायण बळीरामजी आंबुसकर** हे दिनांक ०१.०३.२०१४ रोजी मरण पावले आहेत. **चंद्रभागा नारायण आंबुसकर** हे दि.१६.०७.२००९ रोजी मरण पावले आहेत. **लक्ष्मणराव नारायणराव आंबुसकर** हे दिनांक १०.०२.२०१५ रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन - मयत नारायण बळीरामजी आंबुसकर व हरिभाऊ बळीरामजी आंबुसकर** यांचे नावे मौजे दर्यापुर, ता.दर्यापुर, जि.अमरावती येथे सामाईक मिळकत असून त्याचा नझुल शिट क्र.११, प्लॉट क्र.२४८३,असुन एकुण क्षेत्रफळ १०४.७३ चौ.मी.आहे. या मिळकतीमध्ये मयत नारायण बळीरामजी आंबुसकर हे अर्ध्या हिस्याचे मालक होते. सदर मालमत्तेची अंदाजे किंमत रुपये २०,०००/- इतकी आहे.

आज दि.**०८.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक (प्रशा.)**
दिवाणी न्यायालय (व.स्तर), दर्यापूर

## जाहीर नोटीस

प्रोसेस नं.९९१/२०२५
दिनांक १२.०९.२०२५

अंजनगांव सुर्जी जि.अमरावती येथील (श्री.एस.बी.बहिरट) दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.४१६/२०२५ — ने.ता. ०७.११.२०२५

अर्जदार - प्रिया वैभव नालट, वय ३२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.शिवाजी नगर, अकोला

--- विरुध्द ---

गैरअर्जदार - कुसूमताई अरुणराव नालट, वय ५५ वर्षे, धंदा-घरकाम
रा.अकोट रोड, लाडोळे प्लॉटस् शिक्षक कॉलनी, अंजनगांव सुर्जी, ता.अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती

ज्याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे पती व गैरअर्जदाराचा मुलगा नामे **वैभव अरुणराव नालट** यांचा दिनांक ०३.०३.२०२५ रोजी मृत्यू झाला आहे. अर्जात नमुद केल्याप्रमाणे त्यांचे वारस खालीलप्रमाणे आहेत

| अ.क्र. | वारसाचे नांव | वय | मयतांशी नाते |
|---|---|---|---|
| १. | प्रिया वैभव नालट | ३२ वर्षे | पत्नी |
| २. | कुसूमताई अरुणराव नालट | ५५ वर्षे | आई |

या व्यतिरिक्त इतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

**वैभव अरुणराव नालट** हे मरण पावल्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता वि.दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्दी तारखेपासून एक महिन्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरुन अर्जावर सुनावणी करुन अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल,

आज दिनांक १२.०९.२०२५ रोजी माझे सहीन`व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
सहाय्यक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, क.स्तर,
अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
## वि.श्री.एस.एस.बिंगरदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.२२५८/२०२५
श्रीमती आशावरी अधिक एक विरुध्द निरंक
पुढील तारीख १८.११.२०२५

**अर्जदार :**
1. Sou.Asavari Shripad Satpurkar
(Maiden Name : Asavari Vishnu Thombare),
Age 55 Yrs. Occu.: Household
R/o Kannada Maruti Lane, Nashik-422001, Tq.Dist.Nashik
2. Sou.Manjiri Milind Sabnis, Age 53 Yrs. Occu.: Household
R/o 11/B, Sanchar Society, Mithbunder Road, Opp.State Bank of India,Chendani Koliwada, Thane (East) Tq. Dist. Thane.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **विष्णु लक्ष्मण ठोंबरे** हे दिनांक **३०.१०.२०१०** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. व मयत **अरुण विष्णु ठोंबरे हे** दिनांक **०५.०३.२०२१ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **आशावरी अधिक एक विरुध्द निरंक** रा.वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **आशावरीअधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## ई निविदा प्रकाशनाची सूचना

महानिर्मिती

[illegible]

| ई-निविदा क्रमांक | विषय | अंदाजित रक्कम / बयाणा रक्कम | ई-निविदा विक्रीचा कालावधी | ई-निविदा स्वीकृती (१२.०० पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |

[illegible]

मुख्य अभियंता

## डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग अमरावती

महाराष्ट्र शासन, इंडियन नर्सिंग कौन्सिल नवि दिल्ली, महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याशी संलग्न
Website :- drgion.ac.in | Email :- drgionamravati@gmail.com

शैक्षणिक सत्र २०२५-२६ प्रथम वर्ष पि.बी.बी.एस्सी नर्सिंग

**प्रवेश सुचना**

पी.बी.बी. एस्सी नर्सिंग अभ्यासक्रम प्रवेशासाठी अर्हताप्राप्त उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| वेळापत्रक | दिनांक |
|---|---|
| प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम दिनांक | १६/१०/२०२५ ते २५/१०/२०२५ |
| निवड यादी/मेरिट यादी/प्रतिक्षा यादी जाहीर करण्याचा अंतिम दिनांक | २६/१०/२०२५ |
| प्रवेश घेण्याचा अंतिम दिनांक | ३०/१०/२०२५ |

**Seat Matrix**

| Category Wise Seats | SC | ST | VJ | NI-1 | NT-2 | NT-3 | OBC | SEBC | EWS | OPEN | 15% Inst | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Constitutional Reservation Category | 03 | 02 | 01 | 01 | 01 | 01 | 04 | 04 | 04 | 22 | 7 | 50 |

शासन नियमा नुसार प्रवेश घेणे सुरु आहे

प्रवेशासाठी संपर्क :- प्राचार्य, डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग, अमरावती.
डॉ. राजेंद्र गोडे शैक्षणिक परिसर, मार्डी रोड, यावलीखेडा, अमरावती.
मो. नंबर :- 9511733784 / 8308167143 / 9970075861

प्राचार्य

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२१७४/२०२५
**श्री.पद्माकर अधिक चार -वि- निरंक**
पुढील ता.१०.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Padmakar Shriram Puri, Age 62 Yrs. Occu.: Pvt.Job
2. Ravindra Shriram Gosavi, Age 50 Yrs. Occu.: Pvt.Job
Both R/o Sutgirani Road, Near Hanuman Mandir, Gosavi Colony,Rukhmini Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati
3. Manorama Subhash Bharti, Age 60 Yrs. Occu.: Household
Near Prabhat Colony, Mahaveer Nagar, Rukhmini Nagar, Amravati.Tq. Dist. Amravati
4. Jyostana Sanjay Giri, Age 55 Yrs. Occu.: Household
R/o Near Hanuman Mandir, Ravi Nagar, Amravati. Tq.Dist.Amravati.
5. Sushama Kailaspuri Gosavi, Age 53 Yrs. Occu.: Household
R/o Gayatri Nagar, Survey No.24, Akola Rural Tq.Dist.Akola

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **श्रीराम बजाजी पुरी** हे दिनांक 09.02.2017 रोजी Amravati येथे मयत झाले. व मयत **सुमन श्रीराम पुरी** ही दिनांक **१८.०४.२०१८** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाली. अर्जदार **पद्माकर अधिक चार विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **पद्माकर अधिक चार विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २५.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
## वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.२३००/२०२५
श्रीमती अलका अधिक दोन विरुध्द निरंक
पुढील तारीख १०.११.२०२५

**अर्जदार :**
1. Smt.Alka Arvind Gaurkhede, Age 64 Yrs. Occu.: Household
R/o Near Chintamani Apartment, Gajanan Housing Society, State Bank Colony, Amravati. Tq. Dist. Amravati
2. Akshay Arvind Gaurkhede, Age 36 Yrs. Occu.: Pvt. Job
R/o Flat No.503, B Building Prato, Puranik Abitante, Near Crystal Honda Showroom, Bavdhan Bk., Pune City, Tq.Dist.Pune
3. Rucha Shrirang Salway, Age 40 Yrs. Occu.: Household
R/o Flat No.D-205, Puraniks Abitante, Behind Crystal Honda Showroom, Bavdhan Bk., Pune City, Tq.Dist.Pune

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अरविंद माणिकराव गौरखेडे** हे दिनांक **०५.०३.२०२५** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अल्का अधिक दोन विरुध्द निरंक** रा.वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अल्का अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०८.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट क्र. बी-५०,सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय,रेल्वे पुलाजवळ राजकमल चौक अमरावती ४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३८**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@ymail.com

## संक्षिप्त



### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत

**अमरावती-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आज दुपारी १२ वाजता अमरावती विमानतळ येथे आगमन झाले. त्यांच्यासमवेत पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे होते. मुख्यममंत्री फडणवीस यांचे आगमन झाल्यानंतर विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल, विशेष पोलिस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, मनपा आयुक्त सौम्या शर्मा, पोलिस आयुक्त अरविंद चावरीया, जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी त्यांचे स्वागत केले. त्यानंतर मुख्यमंत्री नियोजित कार्यक्रमासाठी रवाना झाले.



### धम्मच जगाला तारू शकतो-प्रताप गोंडाणे

**पूर्णानगर-** आज समाजात, देशात तसेच जगात अराजगता, सांप्रदायीकता वाढत चालली आहे, एकमेकांप्रति, द्वेष, भेदभाव वाढल्याने माणसातलं माणुसपण हरविल्या गेले आहे. त्यासाठी सर्वत्र शांती, करुणा, व विज्ञाननिष्ठ विचार साधून सर्वांचा विकास करायचा असेल व जगात शांतता निर्माण करायची असेल तर बुध्दाचा धम्मच जगाला तारू शकतो,, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते धम्म ग्रंथाचे वाचक प्रताप गोंडाणे यांनी पोहरा पूर्णा येथे वर्षववासानिमित्त समारोपीय कार्यक्रमात केले. सर्वप्रथम डॉ. भन्ते संघपाल व भन्ते सुमन्नो यांनी उपासकांना त्रिशरण, पंचशील देऊन विधिवत कार्यक्रम घेतला. त्यानंतर आयोजकांतर्फे सर्व गावकरी तसेच उपासक, उपासिका यांना भोजनदान देण्यात आले.या तीन महिने चाल लेल्या ग्रंथवाचनाचे वाचक प्रताप गोंडाणे यांचा गावाकऱ्याकडून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सरपंच गजानन लांजेवार,रमण पाटील, दिलीप वासनिक, सतीश पहाडण, मंगेश वाहने,पत्रकार संजय सरवटकर, गंगाधर इंगळे, कैलास घोडेस्वार, सतीश गोंडाणे, अमोल बोरकर, महेंद्र लांजेवार, ऋषिक हिंगणे, यश लांजेवार मानव मेश्राम, वैभव लांजेवार तसेच बौद्ध अनुयायी उपस्थित होते.



### सत्यपाल महाराज बंडोपंथ उमरकर पुरस्काराने सन्मानित

**अमरावती-**सप्त खंजिरीचे चे जनक सुप्रसिद्ध राष्ट्रीय प्रबोधनकार,महाराष्ट्राचे भूषण सत्यपाल महाराज यांना कृषी-विकास प्रतिष्ठानतर्फे दिला जाणाऱ्या स्व,बंडोपंथ उमरकर स्मृती सामाजिक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.थडीपवणी येथे कृषी-विकास प्रतिष्ठाण स्व.बंडोपंथ उमरकर स्मृती सामाजिक कार्य पुरस्कार खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.स्व.बंडोपंथ उमरकर हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचाराचे परमभक्त होते.त्यांनी अनेक वर्षापासून थडीपवणी गावामध्ये सप्ताह सुरू केला.सत्यपाल महाराजांचे सहकारी हार्मोनियम वादक गजानन भाऊ चिंचोळकर, सोशल मीडिया ऑपरेटर राजेश भाऊ काइंगे, तबलावादक रोशन राऊत, सहकारी सुनील चिंचोळकर यांना सुद्धा या वेळी सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमाला राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे,खासदार अमरकाळे,माजी गृहमंत्री अनिले देशमुख,आमदार अभिजीत वंजारी,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सुनिलजी देशमुख,शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धनजी देशमुख व तसेच थडीपवनी गाव-पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### राज्य राखीव पोलीस दलाचा सर्वांगीण विकास-सुशांत सिंह

**अमरावती -** राज्य राखीव पोलीस दल कॅम्पचा सर्वांगीण विकास करणे आणि पोलिस अंमलदारांच्या कल्याणासाठी उपयुक्त अशा योजना राबविणे हेच आमचे मुख्य उद्दिष्ट आहे, असे प्रतिपादन भा.पो.से. सुशांत सिंह यांनी केले. ते एस.आर.पी.एफ वेलफेअर पेट्रोल पंपाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक ९, अमरावती येथे नव्याने उभारण्यात आलेल्या एस.आर.पी.एफ वेलफेअर पेट्रोल पंपाचे उद्घाटन राज्य राखीव पोलीस दलाचे समादेशक सुशांत सिंह यांच्या हस्ते नुकतेच पार पडले. या प्रसंगी सहायक समादेशक सुरेश काराळे, सहायक समादेशक बलराम रोठे, पोलीस निरीक्षक मारोती नेवारे आणि पोलीस निरीक्षक अजय कालसर्पे यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले यावेळी एस.आर.पी.एफ बल गट क्र.९ चे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १००टक्के मतदान आणि मतदार,सोबत शिक्षकच आमदार

## अमरावती विद्यापीठ उच्च शिक्षण आणि महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेची संयुक्त सभा

**अमरावती/का.प्र.**

आगामी काळात महाराष्ट्र विधान परिषदेच्या अमरावती शिक्षक मतदार संघाच्या निवडणुका पार पडणार आहेत. याकरिता मतदार नोंदणीचे अभियान निवडणूक आयोगाने सुरू केले आहे. या मतदारसंघातून अनेक वेळा शिक्षक आमदार निवडून देण्याची प्रथा पाडणारा अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ यावेळी देखील ताकदीने निवडणुकीची तयारी करण्यासाठी सज्ज झाला आहे. शैक्षिक महासंघ संघटनेच्या संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ उच्च शिक्षण शाखा तसेच महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद अमरावती विभाग यांचे नुकतीच समन्वय सभा शैक्षिक महासंघाच्या जलाराम नगर स्थित विभागीय कार्यालयात पार पडली. उच्च शिक्षण संवर्गाच्या विभागीय अध्यक्ष प्राचार्य डॉ मीनल भोंडे यांच्या अध्यक्षतेत पार पडलेल्या या बैठकीत शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुक निमित्ताने मतदार नोंदणी विषयी रणनीती ठरविण्यात आली.

संघटनेच्या मूळ तत्वानुसार शिक्षक मतदार संघातून शिक्षकच आमदार निवडून यावा आणि शंभर टक्के शिक्षकांची मतदार नोंदणी होऊन शंभर टक्के शिक्षकांनी मतदान करून आपला सक्षम शिक्षक असलेला प्रतिनिधी विधान परिषदेत पाठवावा याकरिता विशेष अभियान राबवण्याचा निर्णय घेण्यात आला.या बैठकीत मतदार नोंदणी करण्यासाठी आवश्यक पात्रतेवर देखील चर्चा करण्यात आली. निवडणूक निर्णय आयोगाच्या नियमानुसार पात्रता धारण करणाऱ्या सर्व शिक्षकांची मतदार म्हणून नोंदणी करण्याची जबाबदारी स्वीकारण्यात आली.

त्याचप्रमाणे बोगस मतदार नोंदणी आणि मतदान टाळण्यासाठी विशेष टास्क फोर्स गठित करण्याचे ठरले. ६ नोव्हेंबर पर्यंत मतदार नोंदणी करण्यासाठीचा पहिला टप्पा सर्वाधिक नोंदणी होण्यासाठी संघटनेच्या यंत्रणा कार्यान्वित करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी अमरावती विभागीय मतदार नोंदणी अभियान प्रमुख म्हणून डॉ मीनल भोंडे तसेच डॉ सुमित पवार यांची निवड करण्यात आली. महासंघाच्या उच्च शिक्षण क्षेत्रातील रचनेप्रमाणे अमरावती विभागातील सहा जिल्ह्यांकरिता प्रत्येक जिल्ह्याच्या मतदार नोंदणी प्रमुखांची घोषणा देखील यावेळी करण्यात आली.यामध्ये उच्च शिक्षण क्षेत्रातून अमरावती (शहर),डॉ ओमप्रकाश मुंदे, अमरावती (ग्रामीण),डॉ प्रमोद गारोडे, अकोला,डॉ शिवाजी नागरे, बुलडाणा,डॉ मनोज व्यवहारे, वाशिम, डॉ ठकसेन राजगुरे आणि यवतमाळ डॉ राधेश्याम चौधरी यांना मतदार नोंदणी अभियानाची जबाबदारी सोपविण्यात आली. त्याचप्रमाणे उच्च शिक्षण आणि शालेय अशा दोन्ही स्तरावर सहाही जिल्ह्यांच्या तालुकाप्रमुखांची घोषणा यावेळी करण्यात आली.

सभेकरिता शैक्षिक महासंघाच्या अमरावती विभाग उच्च शिक्षण शाखेचे विभागीय महामंत्री डॉ मंगेश अडगोकर, विभागीय कोषाध्यक्ष डॉ दिनेश खेडकर, अमरावती शहर महामंत्री डॉ अरुण हरणे, प्राचार्य डॉ डी टी इंगोले, प्राचार्य डॉ स्मितताई देशमुख आदी उपस्थित होते. तर महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्यकारिणी सदस्य श्री रमेशराव चांदूरकर आणि श्री राजेंद्र वडनेरकर यांच्यासह विभागीय कार्यवाह डॉ सुमित पवार, अमरावती महानगर अध्यक्ष सुरेशकुमार पाटील, अमरावती जिल्हा ग्रामीण अध्यक्ष डॉ आशिष निमकर, अमरावती शहर कार्यवाह डॉ संजय रामावत, अमरावती जिल्हा ग्रामीण कार्यवाह डॉ निलेश बोडखे, अमरावती महानगर कार्याध्यक्ष श्री रामानंद पुरसानी, अमरावती महानगर कोषाध्यक्ष श्री योगेश बुधवानी, अमरावती महानगर उपाध्यक्ष श्री दिलीप इखार, अमरावती महानगर कार्यालय मंत्री श्री सुधीर अवघड, अमरावती महानगर सहकार्यवाह श्री उमेश लाखे, अमरावती महानगर संघटन मंत्री श्री भास्कर इंगोले, इत्यादि पदाधिकारी उपस्थित होते.या समन्वयातून अमरावती शिक्षक मतदार संघातून राष्ट्रवादी विचारसरणीचा शिक्षक आमदार नक्कीच शिक्षकांचा आवाज विधान परिषदेच्या सभागृहात बुलंद करेल असा विश्वास या निमित्ताने व्यक्त करण्यात आला.

# पंचायत समिती गणांचे आरक्षण जाहीर : १२ गणांपैकी ६ गण महिलांसाठी राखीव

**चांदूरबाजार/वार्ताहर**


चांदूरबाजार तालुका पंचायत समिती साठी,आज १३ ऑक्टोबरला १२ गणां साठी आरक्षण काढण्यात आले.सदर आरक्षण सोडत तहसील कार्यालयाचे सभागृहात संपन्न झाली.यावेळी उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव, तहसीलदार सोनल सुर्यवंशी व तालुका निवडणूक विभागाने नायब तहसीलदार मनिष एम्बलवार उपस्थित होते.तर इच्छुक उमेदवारांची ही गर्दी होती. यावेळी धैर्य सुनील हिवराळे वय वर्ष ७ शिरजगांव बंड या चिमुकल्याच्या हस्ते,आरक्षण सोडत काढण्यात आली. पंचायत समिती एकूण १२ गणांपैकी,सहा गण महिलांसाठी राखीव करण्यात आले आहे.तसेच १२ गणांपैकी २ गण अनुसूचित जाती साठी,पैकी एक गण महिले साठी राखीव आहे.तसेच एक गण अनुसूचित जमाती साठी राखीव करण्यात आला आहे.नामाप्र साठी ३ गण राखीव करण्यात आले आहेत. पैकी दोन गण महिलांसाठी राखीव ठेवण्यात आले आहे. सर्वसाधारण जागेसाठी ६ गण असुन, पैकी ३ गण महिलांसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. तालुका निवडणूक विभागाने जाहीर केल्याप्रमाणे,गण निहाय आरक्षण या प्रमाणे आहे.कारंजा बहिरम-सर्व साधारण, करजगांव-सर्वसाधारण, शिरजगांव कसबा-नामाप्र महिला, देऊरवाडा-सर्वसाधारण महिला, ब्राम्हणवाडा थडी-नामाप्र, घाटलाडकी-अनुसूचित जमाती, कुर्हा-नामाप्र महिला, थुगांव(पिंपरी)-अनुसुचित जाती महिला, शिरजगांव बंड- सर्वसाधारण, बेलोरा-सर्वसाधारण महिला, आसेगाव-अनुसूचित जाती,तळवेल-सर्वसाधारण महिला. या प्रमाणे आरक्षण घोषित करण्यात आले. इच्छे प्रमाणे आरक्षण निघालेल्यांनी गणात जाऊन फटाक्यांची आतिषबाजी केली.

# सुशील रघुवंशी वर केलेली कारवाई संशयाचा भोवऱ्यात

## आ.प्रवीण तायडे यांनी उपोषण स्थळी दिली भेट

**अचलपूर/वार्ताहर**

शहरातील बुंदेलपुरा येथील न.प.हद्दीतील एका जागेवर त्रिशूल रोवण्यावरून दोन गटातील वादविवाद गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे.या संदर्भात स्थानिक प्रशासन व पोलीस प्रशासनाने कारवाई केली होती. नगर परिषदे प्रशासनाने केलेली कारवाई संशयाचा भोवऱ्यात सापडल्याने याबाबत सुशील रघुवंशी या तरुणाने विविध निवेदन सादर करून ठोस कारवाई करण्याची मागणी केली होती. यासाठी अचलपूर उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयात प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्या तरुणाचा आक्षेप असताना त्या तरुणाने अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दाद केली पाहिजे होती. एकीकडे प्रतिबंधात्मक कारवाईचे उल्लंघन केल्यामुळे सुशील रघुवंशी याच्यावर गुन्हा सुद्धा नोंदविण्यात आल्याची माहिती ठाणेदार गजानन मेहत्रे यांनी दिलेली आहे.



सुशील रघुवंशी या तरुणाने नीरज बँकेच्या गलथान कारभार विरोधात सुद्धा उपोषण केले होते. यावेळीही अचलपूर पोलीस स्टेशन समोर सुरू असलेल्या त्या तरुणाच्या उपोषण स्थळी आ.प्रवीण तायडे यांनी भेट दिली. एका कार्यक्रमात उपस्थितीत असताना आमदार प्रवीण तायडे यांना दिली.

# आत्मविश्वासाने पावले उचला-कुलगुरू

## रसायनशास्त्र विभागात रासायनिक सोसायटी 'एक्यम'चे उद्घाटन

**अमरावती/क्रा.प्र.**

आज जगात नवनवे संशोधन, तंत्रज्ञान वेगाने वाढत आहे. अशा परिस्थितीत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी संशोधन क्षेत्रात पुढे जाण्यासाठी आत्मविश्वासाने पावले उचलावीत, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यार्थ्यांना केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागाच्यावतीने एकदिवसीय विद्यापीठस्तरीय कार्यशाळा व रासायनिक सोसायटी 'एक्यम-२०२५-२६' चे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी डॉ. गिरीश हतनापुरे, डॉ. अविनाश रामटेके, डॉ. स्वाती शेरकर,डॉ. प्रशांत गावंडे, डॉ. मनिषा कोडापे, डॉ. जागृती बारब्दे उपस्थित होते. मागील वर्षीच्या सोसायटीचा वार्षिक अहवाल सचिव श्रावणी ठाकरे, अध्यक्ष प्रांजली चव्हाण यांनी सोसायटीच्या संभाव्य योजना मांडल्या. यावेळी सोसायटीचे नवे पदाधिकारी घोषित करण्यात आले. अध्यक्ष प्रांजली चव्हाण, उपाध्यक्ष नंदिनी वनवे, सचिव श्रावणी ठाकरे, संयुक्त सचिव वैष्णवी क्षीरसागर, खजिनदार प्रांजली नंदनवार, सहखजिनदार गायत्री निवाळ, संपादक हकीम नवशाद, सहसंपादक सुमित लोण, श्रावणी चौधरी तसेच एम.एस्सी.नेट-सेट उत्तीर्ण अश्विनी दरसवार, आरती कुंभारे, हर्षद शेरकी, स्नेहल साबळे, शुभम कु-हाडे, अभिषेक शेळके (नेट-जेआरएफ पात्र) आणि अंकिता शेंडोकार यांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. संचालन श्रेया चव्हाण व कोमल सावके आभार नफिसा चव्हाण हिने मानले. कार्यक्रमाला अधिसभा सदस्य डॉ. जयंत वडतकर, श्रीराम सातव, व्यवहारे, कल्पना बैस, विद्यापीठातील सीएचबी शिक्षकवर्ग डॉ. स्वाती गडाखे, पायल जाधव, आदेश नवघरे, स्मिता नंद, डॉ. प्रिती ठाकरे, पृथा शर्मा, वैष्णवी बंड, आरती कुंभारे, अभिषेक सगने, शिक्षक तसेच विविध महाविद्यालयांमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# विभागीय लोकशाही दिनात १० प्रकरणांवर सुनावणी

## दाखल प्रकरणांवर तत्काळ अंतिम अहवाल सादर करा-डॉ.श्वेता सिंघल

**अमरावती/का.प्र.**

विभागीय लोकशाही दिनात दाखल होणाऱ्या प्रकरणांवर विहीत कालमर्यादेत कार्यवाही करुन अंतिम अहवाल सादर करावा. मागील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनी येवू नये, पुढच्या लोकशाही दिनाच्या अगोदरच शेवटचे निराकरण करुन प्रकरण नस्तीबध्द करण्यात यावे, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी संबंधित विभागप्रमुखांना आज दिले. लोकशाही दिनात दाखल एकूण १० प्रकरणांवर चर्चा करुन त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित विभागाला दिल्या.



विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात श्रीमती सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही दिनाचे कामकाज पार पडले. अपर आयुक्त रविंद्र हजारे, उपायुक्त संतोष कवडे, तहसीलदार प्रज्ञा काकडे यांच्यासह महसूल, पोलीस, महापालिका, सहकार, कृषी, जलसंधारण व ऊर्जा विभागाचे अधिकारी तसेच पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून यावेळी बैठकीला उपस्थित होते.यावेळी विभागीय लोकशाही दिनात दाखल एकूण १० प्रकरणांवर चर्चा करण्यात आली असून दोन प्रकरणे निकाली काढण्यात आली. तर उर्वरित प्रकरणांवर पंधरा दिवसांत आवश्यक कार्यवाही करुन अंतीम अहवाल सादर करण्याच्या सूचना सिंघल यांनी संबंधित विभागप्रमुखांना केल्या.

यावेळी लोकशाही दिनासाठी अमरावती विभागातून उपस्थित राहिलेल्या तक्रारदारांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. मागील लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनात सुनावणीसाठी येवू नये. न्यायप्रविष्ट किंवा अर्धन्यायिक प्रकरणांसंदर्भात तत्काळ अहवाल सादर करण्यात यावा. लोकशाही दिनासाठी दाखल होणाऱ्या तक्रार अर्जावर वेळेत कार्यवाही होण्यासाठी संबंधित विभागाने जबाबदारीपूर्वक प्रयत्न करावे, अशा सूचना श्रीमती सिंघल यांनी यावेळी केल्या.

# पिसाळलेल्या श्वानाचा विद्यार्थी व शिक्षिकेवर हल्ला

**मोर्शी/वार्ताहर**

तालुक्यातील हिवरखेड नजीक असलेल्या बेलोना येथील जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात एका पिसाळलेल्या श्वानाने प्रवेश करून इयत्ता पहिल्या कक्षेतील शिकणारा विद्यार्थी सुशांत राऊत व नितीन उईके यांच्यावर हल्ला करून चावा घेतला. विद्यार्थ्यांना श्वान चावत असल्याचे शिक्षिका उज्वला पोकले हिला दिसले असता तिने कुत्र्याला हाकलण्याचा प्रयत्न केला असता पिसाळलेल्या कुत्र्याने शिक्षिकेवर हल्ला करून चावा घेतल्याची घटना १० ऑक्टोंबर रोजी दुपारच्या दरम्यान घडली होती. श्वानाने चावा घेतलेल्या विद्यार्थी व शिक्षिकेला नजीकच्या हिवरखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टरांनी औषध उपचार करून पुढील उपचारासाठी तिनही रुग्णांना अमरावती येथील जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले.

पिसाळलेल्या श्वानाने गावात हौदोस घातला असून रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या मोटर सायकल स्वाराच्या मागे सुद्धा धावत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तरी ग्रामपंचायत प्रशासनाने पिसाळलेल्या कुत्र्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी ग्रामस्थ करीत आहे.

# संघ म्हणजे व्यक्ती निर्माण करण्याचा कारखाना-डॉ.दत्तात्रेय रत्नपारखी

**मोर्शी/वार्ताहर**

संघ म्हणजे व्यक्ती निर्माण करण्याचा कारखाना आहे. संघाने शाखा नावाची अभिनव कार्यपद्धती संघटनेने संपूर्ण जगाला दिली. भगव्या ध्वजाखाली एक तास एकत्र येऊन त्यामधून रोज संस्कार दिले जाते देशभक्तीचे समाज भक्तीचे भारत मातेला मोठे करण्याकरिता आपसुक संस्कार मिळतात असे उद्बोधन प्रमुख वक्ते म्हणून अमरावती विभाग कार्यवहा डॉ. दत्तात्रेय रत्नपारखी यांनी विजयादशमीच्या शताब्दी महोत्सवानिमित्त बोलताना व्यक्त केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला शंभर वर्षे पूर्ण झाले असल्यामुळे शताब्दी वर्षाचे औचित्य साधून रामजी बाबा नजीक असलेल्या पंजाब बाबा सभागृहा पासून भव्य दिव्य पथसंचनाला सुरुवात करण्यात आली होती. या पथसंचलनात शेकडो स्वयंसेवक काळी टोपी, पांढरा शर्ट, खाकी पेंट आणि हातामध्ये काठी असा स्वयंसेवकाचा गणवेश धारण करून पथ संचलनात सहभागी स्वयंसेवक गणवेशात शिस्तबद्ध दिसून आले होते. सूर्योदय चौक, गुजरी बाजार, गांधी चौक, प्रभात चौक, आंबेडकर चौक, मंत्री मार्केट, जयस्तंभ चौक, अमरावती रोड शिवाजी शाळा येथील मैदानावर विजयादशमी व शस्त्र पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले होते. स्वयंसेवकांनी विविध प्रात्यक्षिके सादर केली. त्याचप्रमाणे संघिक गीत अंकित हरदास, अमृत वाचन आदर्श लांडे, वैयक्तिक गीत चिराग टेंभे या स्वयंसेवकांनी सादर केले. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून अमरावती विभाग कार्यवाह डॉ. दत्तात्रेय रत्नपारखी यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सावित्रीबाई फुले महामंडळ तसेच गुरुदेव सेवा मंडळाचे तालुका प्रचारक डॉ. प्रतिभा घाटोळ उपस्थितांना मार्गदर्शन केले. मोर्शी तालुका संघचालक मनोहर घुलेक्षे व्यासपीठावर उपस्थित होते. या पथ संचनानाचा भव्य दिव्य सोहळा पाहण्याकरिता मार्गक्रमण मार्गावर नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. पथ संचलनात सहभागी स्वयंसेवकावर विविध ठिकाणी फुलाचा वर्षाव करण्यात आला होता. प्रास्ताविक व आभार प्रदर्शन अजय काळे यांनी केले. यावेळी भारतीय किसान संघाचे सुरेश श्रीराव,सहकार भारती चे संजय गारपवार,पूर्व सैनिक अशोक भुयार, ओम शांतीच्या दीदी, माजी नगराध्यक्ष, उपाध्यक्ष नगरसेवक, तसेच मोर्शीतील गणमान्य प्रतिष्ठित व्यावसायिक व मातृशक्ती या उत्सवाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मोर्शीत संघाचा शताब्दी महोत्सव

# स्थानिक पातळीवर होणार युतीचा निर्णय -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## पश्चिम विदर्भ स्थानिक संस्था व शिक्षक निवडणूक पूर्वतयारी बैठक




**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी युती करण्यासंदर्भात आम्ही स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याचे अधिकार दिले आहेत. पण, ज्या ठिकाणी शक्य आहे, तिथे युती केली पाहिजे, अशा प्रकारच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच एखाद्या ठिकाणी युती झाली नाही, तरी मित्र पक्षांवर टीका करू नये, अशा प्रकारचे निर्देश देण्यात आले आहेत. महायुती म्हणून या निवडणुकांमध्ये चांगले यश तीनही पक्षांना मिळेल, हा विश्वास आम्हाला आहे. स्वबळावर निवडणुका लढण्याची कार्यकर्त्यांची इच्छा नेहमीच असते. परंतु, स्थानिक परिस्थितीचा विचार करून निर्णय घ्यायचा असतो. केवळ सगळ्यांना निवडणूक लढता यावी, एवढा मर्यादित निर्णय घेता येणार नाही, ज्या ठिकाणी शक्य आहे, त्या ठिकाणी मित्र पक्षांसोबत युती करूनच निवडणूक लढविली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

शहरातील राम मेघे कॉलेज परिसरात पश्चिम विदर्भ स्थानिक स्वराज्य संस्था आणि शिक्षक मतदारसंघ निवडणूक पूर्वतयारी पदाधिकारी बैठकीचे आयोजन करण्यात आज सोमवार १३ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की,भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी संपूर्ण राज्यात विभागनिहाय बैठकांचे नियोजन केले आहे. महापालिका, जिल्हा परिषदा, नगर पालिका, नगर पंचायती यांच्या निवडणुकांच्या निमित्ताने आढावा घेण्यासाठी या बैठका घेण्यात येत आहेत. यापुर्वी मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र अशा चार विभागांचा आढावा घेण्यात आला आहे. आज अमरावती विभागाचा आढावा घेण्यात येत आहे. कार्यकर्त्यांची मानसिकता आणि तयारी चांगली आहे. आम्ही निवडणुकीसाठी सज्ज आहोत. बैठकीमध्ये जिलाध्यक्ष रविराज देशमुख, प्रभुदास भिलावेकर, शहर जिलाध्यक्ष डॉ. नितिन धांडे, महिला अध्यक्ष सुधा तिवारी, उपाध्यक्ष सुरेखा लुंगारे, गंगा खारकर,लवीना हर्षे, महासचिव बादलकुलकर्णी, चेतन पवार, आमदार हरीश पिंपले, वसंत खंडेलवाल,दादाराव केचे, रणधीर सावरकर,संजय कुटे, जिलाध्यक्ष सचिन देशमुख, सभापति शिवचंद्र तायडे,माजी आमदार डॉ. रणजीत पाटिल, वसंतराव खोटरे, रमेश बुंदिले, जिलाध्यक्ष जयंत म्हसने,संजय गोटफोडे, एड. देवाशीश काकड, रमेश अतकरे, माजी आमदार (पान २ वर)

### निवडणुकीसाठी भाजपा सज्ज-

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, निवडणुकीसाठी यंत्रणा म्हणून पक्ष सज्ज आहे. कार्यकर्त्यांना दिशानिर्देश देऊन या निवडणुका जिंकण्यासाठी वातावरण निर्मिती करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

### प्रियांक खरगेवर साधला निशाना-

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचे पुत्र प्रियांक खरगे यांनी मुख्य सचिवांना पत्र पाठवून सार्वजनिक उद्याने आणि धार्मिक संस्थांशी संबंधित ठिकाणी संघाच्या कार्यक्रमाच्या आयोजनावर बंदी घालावी अशी मागणी केली आहे. दरम्यान यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्रियांक खरगे हे प्रसिद्धीकरिता असल्या गोष्टी करत असतात. त्यांना काहीच स्टैंडिंग नाही. ते वडिलांच्या भरवशावर राजकारण करणारे आहेत. त्यांना एवढंच सांगू इच्छितो की, अनेक वेळा संघावर बंदी घालण्याचा प्रयत्न झाला, नव्हे बंदी घातली. ज्या इंदिरा गांधींनी संघावर बंदी घातली होती त्यांना सत्तेतून पायउतार व्हावे लागले.

# अंजनगाव पंचायत समिती गणाचे आरक्षण जाहीर

## आरक्षणामुळे स्थानिक पुढाऱ्यांत कही खुशी कही गम



**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधीः-** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अंजनगाव सुर्जी पंचायत समितीच्या सहा गणासाठी आरक्षण तहसील कार्यालयाच्या सभागृहात दि.१३ ला उपविभागीय अधीकारी व तहसीलदार यांच्या उपस्थितीत जाहीर करण्यात आली. अनुसुचित जातीची सर्वाधीक लोकसंख्या असलेल्या निर्वाचक गणांपासुन उतरत्या समितीनिहाय स्वतंत्र उमेदवार क्रमाने जाहीर पैकी जागा विविध प्रवर्गासाठी आरक्षित झाल्या असून, पंचायत समिती सभापती पद अनुसुचीत जाती महीला करीता राखीव आहे .या आरक्षणात महिलांसाठी ०३ जागा राखीव ठेवण्यात आल्या असून, ०२ जागा महीला सर्वसाधारणसाठी खानमपुर (पांढरी) व कापुसतळणी गणात प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. अनुसूचित जातीसाठी ०१ महीला कोकर्डा करीता तर ०१ जागा नागरीकांच्या मागास प्रवर्गात सातेगाव गण राखीव आहे.०१ जागा चौसाळा या गणचा सर्वसाधारण (पान २ वर)

# दर्यापूर तालुक्यातील जि. प. व पं. स. गणातील आरक्षण जाहीर

## निवडणूकीत महिलांराज, राजकीय दिग्गज नेत्यांना घरीच बसावे लागणार



**खल्लार** - दर्यापूर तालुक्यात चार जिल्हा परिषद व आठ पंचायत समिती गणांमधील आरक्षण आज जाहीर झाले असून जिल्हा परिषदचे चारही सर्कल अनुसूचित जाती करीता राखीव झाले आहेत चार पैकी तिन जिल्हा परिषद सर्कल हे महिला करीता राखीव आहेत यात येवदा अनुसूचित जाती महिला , खल्लार अनुसूचित जाती महिला थिलोरी अनुसूचित जाती महिला तर पिंपळोद अनुसूचित जाती करीता राखीव झाले आहे. तर दर्यापूर पंचायत समिती गणामधिल खल्लार अनुसूचित जाती महिला येवदा नामाप्र महिला , इटकी अनुसूचित जाती , वडनेर गंगाई सर्वसाधारण महिला , शिंगणापूर नामाप्र , थिलोरी सर्व साधारण , पिंपळोद सर्व साधारण (पान २ वर)


# दिवाळी खरेदीसाठी बाजारपेठ फुलली

## -शहरात नागरिकांची गर्दी



**अमरावती/प्रतिनिधीः-** शनिवार १८ ऑक्टोंबर धनतेरस पासून दिवाळी सणाला सुरुवात होणार असल्यामुळे शहरातील सर्व ठिकाणच्या लहानमोठ्या बाजारपेठांमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होऊ लागली आहे. फराळ, कपडे, तोरणं, रांगोळी, दिवे अशा वस्तूंच्या खरेदीसाठी बाजारपेठा गर्दीने फुलल्या आहेत. यामुळे वाहतूक कोंडीतही भर पडते आहे.दिवाळी आणि खरेदी यांचे एक वेगळेच नाते आहे. ऑनलाईन खरेदीचा सध्याचा काळ असला तरी प्रत्यक्षात बाजारपेठांमध्ये जाऊन खरेदी करण्याची सवय या काळातही कायम असल्याचे दिवाळीच्या निमित्ताने जिकडे तिकडे दिसून येत आहे. येत्या शुक्रवारी वसुबारस व शनिवारी धनतेरस असून दिवाळीला सुरुवात होणार आहे. त्यामुळे खरेदीचा प्रचंड उत्साह नागरिकांमध्ये दिसून पडत आहे. आता पुढचे काही दिवस खरेदीसाठी सर्वत्र अशीच झुंबड उडणार आहे. सर्वत्र खरेदीसाठी ग्राहकांची मोठी गर्दी दिसत आहे.शहरातील राजकमल चौक, गांधी चौक ,चित्रा चौक ,बापट चौक, मोची गल्ली, सक्करसाथ, इतवारा बाजार सह इतर ठिकाणी नागरिकांची गर्दी दिसत आहे. शहरातील गांधी चौक परिसरात पारंपरिक वस्तूंच्या जत्रेचे स्वरुप आले आहे. फेरीवाल्यांच्या संख्येतही मोठी वाढ झाली असून रस्त्यावर दुकान थाटून त्यात रांगोळीचे रंग, पणत्या, फराळ, बांगड्या, नकली दागिने, तोरणे, विजेची तोरणे, कंदिल, फटाके विकणाऱ्यांची संख्या मोठी आहे. रस्त्यांवर विक्रीसाठी (पान २ वर)

# दीड वर्षानंतर चांदूर रेल्वे स्टेशनवरील सफाईचे कंत्राट पुन्हा सुरू -प्रवाशांना दिलासा



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** दीर्घकाळापासून वाईट अवस्थेत असलेल्या चांदूर रेल्वे स्थानकाचा चेहरामोहरा बदलू लागला आहे. स्थानकावर अस्वच्छता, अंधार, पाण्याचा अभाव आणि अपूर्ण कामांमुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. या सर्व समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी रेल्वे रोको कृती समितीने वेळोवेळी निवेदनाद्वारे पाठपुरावा केला. परिणामी दीड वर्षानंतर रेल्वे स्टेशनवरील सफाईचे कंत्राट पुन्हा सुरू झाल्याची माहिती मिळाली आहे.

स्थानकाची विदारक स्थिती, शौचालयात पाण्याचा अभाव, प्लॅटफॉर्मवर साचलेली घाण, परिसरात पसरलेला दुर्गंध, तसेच अपूर्ण पडून असलेली विविध कामे, प्लॅटफॉर्मवर अंधार यामुळे प्रवासी व नागरिक त्रस्त झाले होते. या सर्व गोष्टींबाबत रेल्वे रोको कृती समितीने अलीकडेच नागपूर विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) यांना निवेदन सादर केले होते. दरम्यान, समितीच्या विनंतीनंतर स्थानकाच्या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी मागील महिन्यात खासदार अमर काळे यांनी प्रत्यक्ष भेट देऊन स्टेशन परिसराचा आढावा घेतला होता. यावेळी त्यांनी स्थानकाची झालेली दयनीय अवस्था पाहून तीव्र नाराजी व्यक्त केली होती. त्यांनी तत्काळ रेल्वे विभागास आवश्यक ती दुरुस्ती व स्वच्छतेच्या उपाययोजना करण्याच्या सूचना देणार असल्याचे आश्वासन दिले होते. या (पान २ वर)

# रतनगंजात अवैध तलवारींचा साठा जप्त

## गुन्हे शाखेची धडक कारवाई; एक जण अटकेत



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील रतनगंज परिसरात अवैध शस्त्रसाठा लपवून ठेवण्यात आल्याची माहिती मिळताच गुन्हे शाखेने रविवारी धाड टाकून मोठा शस्त्रसाठा जप्त केला. पोलिसांनी १२ तलवारींसह सुमारे २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून रहीम खान युसुफ खान उर्फ रहीम गोटीवाला (वय ४२, रतनगंज) यास अटक केली आहे. त्याच्याविरुद्ध नागपुरीगेट पोलीस ठाण्यात आर्म्स अ?क्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी रतनगंज येथील गोटीवाला यांच्या घरावर छापा मारला असता मोठ्या आकाराच्या १२ तलवारी सापडल्या. प्राथमिक चौकशीत आरोपीकडे या शस्त्रास्त्रांचा परवाना नसल्याचे स्पष्ट (पान २

# वडाली येथील अवैध दारू अड्ड्यावर धाड

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात वाढणाऱ्या अवैध धंध्यांवर नियंत्रण लावण्याचे निर्देश देण्यात आले आहे. त्यानुसार पोलीस विभाग कार्य करत आहे. तरीपण अशा घटना समोर येत आहे.

अशाच एका अवैध दारू अड्ड्यावर पोलिसांनी धाड मारून आरोपीला ताब्यात घेतले आणि ४९ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. माहितीनुसार फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना त्यांना अवैध दारू विक्रीबद्दल गुप्त माहिती मिळाली. त्यावरून पोलिसांनी वडाली येथील परिहारपुरा मध्ये आरोपी दिनेश माणिकराव नेमाडे (वय ३९ रा. भोईपुरा जवळ देवी नगर) याच्या अड्ड्यावर धाड मारून ५० लिटर गावरानी हातभट्टी दारू कि. ६ हजार व ८० लिटर मोहवाच सडवा कि. ३६ हजार रू ,गावरानी हातभट्टी दारू करिता लागणारे साहित्य ड्रम, घमेले, नळी, नवरपट्टी, बकेट इत्यादी साहित्य असा एकूण ४९ हजार ८५० रूपयाचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी आरोपी विरुद्ध कलम ६५ (क) (फ) (ड) महाराष्ट्र दारूबंदी कायद्या प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# १४ गोवंशांची सुटका, ४ ठार

## ट्रक चालक व क्लिनर घटनास्थळावरून पसार



अमरावती/प्रतिनिधीः- मध्य प्रदेशातून अमरावती येथे कत्तलीसाठी आणण्यात येत असलेल्या मिनी मालवाहू ट्रकमधून पोलिसांनी १४ गोवंशांची सुटका करून, त्यांना जीवनदान दिले आहे. या कारवाईत ४ गोवंश मृत अवस्थेत आढळले. मोर्शी पोलिसांनी रविवारी रात्री साडेनऊ वाजता नाकाबंदी करून ही कारवाई केली. दरम्यान, ट्रक चालक व क्लिनर घटनास्थळावरून पसार झाले. पोलिसांनी ट्रक जप्त करून मृत गोवंशांचे अंत्यसंस्कार केले.

मोर्शी पोलिसांना माहिती मिळाली की अंबाडा, सायवाडा येथून घाटलाडकी मार्गावरून एक मिनी मालवाहू ट्रकद्वारे १४ जनावरे अवैधरित्या कत्तलीसाठी नेण्यात येत आहेत. त्यानुसार खेड़ टी-पॉइंटजवळ पोलिसांनी नाकाबंदी केली. ट्रक थांबविण्याचा प्रयत्न करताच चालकाने वाहन सुमारे १०० मीटरवर थांबवून स्वतः व क्लिनरसह पळ काढला. ट्रकची तपासणी केली असता त्यामध्ये १४ गायी अतिशय क्रूर पद्धतीने दोऱ्यांनी बांधलेल्या आढळल्या. ट्रकच्या पुढील बाजूस नंबर प्लेट नव्हती, तर मागे एमपी ५१/०५२९ असा नंबर होता. मोर्शी येथील पशुधन विकास अधिकाऱ्यांनी घटनास्थळी येऊन सर्व गोवंशांची तपासणी केली. त्यानंतर जिवंत गोवंशाची काळजी घेण्यासाठी व चारा-पाण्याच्या सोयीसाठी त्यांना येरला येथील गौरक्षण संस्थेत हलविण्यात आले. मृत चार गोवंशांचे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# अचलपूर तालुक्यात पंचायत समिती गणांचे आरक्षण जाहिर



**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर तालुक्यातील पंचायत समिती निवडणुकांसाठी आज अचलपूर तहसील कार्यालय येथे निर्वाचक गणांचे आरक्षण निश्चित करण्यात आले. अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव आणि तहसीलदार संजय गरकल यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या बैठकीत तालुक्यातील एकूण १२ गणांचे आरक्षण जाहीर करण्यात आले.यामध्ये २८ - कविठा बु.अनुसूचित जाती महिला,३५ - बोपापुर अनुसूचित जाती ,२६ - खरपी अनूसूचित जमाती,२५ - धामणगाव गढी अनूसूचित जमाती महिला,२७ - कांडली सर्वसाधारण महिला, २९ - धोतरखेडा सर्वसाधारण महिला ,३० - वडगाव फत्तेपूर ना.मा.प्र महिला,३१ (पान २ वर)

# प्रविण पोटे यांच्या द्वारा मराठवाडा पूरग्रस्तांसाठी जीवनावश्यक वस्तूंचे ट्रक रवाना

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ट्रकला हिरवी झेंडी



**अमरावती/प्रतिनिधीः-** मराठवाड्यातील परिसरात झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली आहेत. या संकटग्रस्त बांधवांच्या मदतीसाठी माजी राज्यमंत्री प्रविण पोटे पाटील आणि श्रेयश पोटे पाटील यांनी पुन्हा एकदा सामाजिक बांधिलकी जपत मोठा मदतीचा हात पुढे केला आहे.

याआधी त्यांनी अमरावती जिल्ह्यातून सर्वप्रथम पुढाकार घेत मराठवाडा पूरग्रस्तांसाठी २५ लाख रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री सहायता निधीस सुपूर्त करत मोठी आर्थिक मदत केली होती. त्यानंतर आता आणखी पुढाकार घेत, जीवनावश्यक (पान २ वर)

